
# प्रॅक्टीकल सोशॅलिझम

म. ग्रं. सं. ठाणें
विषय भू-प्रवास
सं. क्र. ६८०



FBK-0024071

वियत रशियाच्या देशातील चित्र

नीलकंठ खाडिलकर
संपादक नवाकाळ दैनिक

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र
संग्र. शाखा (स्थळ प्रत)

संदर्भ भू प्रवास
६४०
२४०७१
१०।१२।८३

# प्रॅक्टीकल सोशॅलिझम

सोविएत रशियाच्या दौऱ्यातील चिंतन

नीलकंठ खाडिलकर
संपादक, दैनिक 'नवाकाळ'

REFBK-0024071

शलाका प्रकाशन, मुंबई-२८.

प्रकाशक :

सौ. स्मिता बोरकर

शलाका प्रकाशन
३२, हाजी इ. पी. ट्रस्ट
बिल्डींग
गोखले रोड–रानडे रोड
जंक्शन,
दादर, मुंबई–४०००२८

मुद्रक :

दिनानाथ म्हात्रे

विजया प्रिंटींग प्रेस
झिराड–अलिबाग,
जिल्हा:रायगड

किंमत १२ (बारा) रुपये

प्रथम आवृत्ती :

७ नोव्हेंबर १९८३

© नीलकंठ खाडिलकर

मुखपृष्ठ :
स्मिता आर्ट्स
मुखपृष्ठ मुद्रण :
बिंदू आर्ट्स
मुंबई –४०००११

# प्रस्तावना

## कॉ. श्रीपाद अमृत डांगे

सुप्रसिद्ध ' नवकाळ ' दैनिकाचे संपादक श्री. नीलकंठ खाडिलकर यांनी सोविएत युनियनला जाऊन आल्यानंतर लिहीलेल्या अभ्यासपूर्ण संपादकीय लेखांचा आणि नवीन लेखांचा संग्रह या पुस्तकरुपाने प्रसिद्ध होत आहे. गेल्या पधरा-वीस वर्षांत अनेक क्षेत्रातील लोक सोविएत रशियाला जाऊन आले. निरनिराळया दृष्टीकोनांतून पुस्तके लिहिली गेली. साधक बाधक टीकाही झाली. काहींनी ' रशियाचा पोलादी पडदा ' भक्कम केला तर काहींनी हुकुमशाहीची पकड घट्ट होत चालल्याची ग्वाही दिली आणि लोकशाहीच्या बंडाची ' ज्वाळा ' रशियात लवकरच भडकेल अशी ' भविष्यवाणी ' केली. पण तसे घडले नाही व घडणारही नाही.

आम्ही भारतीय कम्युनिस्ट या देशात रशियन राज्यपद्धती म्हणजे रशियन कम्युनिझम आणण्याचे कट रचतो या आरोपाखाली पूर्वी शेकडो कम्युनिस्टाना तुरुंगात डांबण्यात येत असे. मी स्वतः कम्युनिस्ट सर्व लोकांपुढे मांडल्याच्या आरोपाखाली ब्रिटीश अमदानीत तसेच मुरारजी देसाई या प्रख्यात कॉंग्रेस मंत्र्यांच्या राज्यात मिळून अठरा वर्षे तुरुंगवास भोगला आहे पण प्रत्यक्षात सोविएत देशाचे दर्शन मला व्हायला अनेक वर्षे वाट पहावी लागली.

श्री. निळूभाऊंचे लेख वाचल्यावर वाटले की, पूर्वग्रह बाजूला ठेऊन ते सोविएत रशियाला गेले. जे दिसले तेच त्यांनी लिहिले आहे. सत्यावर ' भाष्य '

लिहिण्याचा अट्टाहास त्यांनी केलेला नाही सर्वसामान्य जनतेला रुचतील अशा शब्दांत त्यांनी समाजवादाची प्रत्यक्ष फळे चाखायला दिली.

श्री. निळूभाऊंनी मला प्रस्तावना लिहायला का सांगितले कोण जाणे. मला तर गेली साठ वर्षे सोवियत युनियनचा ' भाट ' असा शिक्का लागला आहे. मॉस्कोत पाऊस पडला तर भारतात छत्र्या उघडणारे आम्ही असे अनेक उपरोधाचे बाण व राजकीय हल्ले सहन करूनही समाजवादाच्या शास्त्रावरची आमची निष्ठा ढळली नाही.

मी प्रथम सोविएत रशिया पाहिला १९४६ साली ट्रेड युनियन परिषदेला गेलो असताना. पण त्यापूर्वी पचवीस वर्षे सोविएत रशियात कामगार शेतकऱ्यांचे राज्य आले आहे, तेथे उपासमार, बेकारी नाही, जमिनदार किंवा भांडवलदार नाहीत, स्त्रियांचे दास्यत्व नाही हे आम्ही सांगत होतो. त्याचा आधार होता मार्क्सवादी लेनिनवादी तत्त्वज्ञान. त्या तत्वज्ञानावरच सोविएत रशियाची आर्थिक व राजकीय रचना झाली आहे. तेव्हा तेथे खराखुरा समाजवाद स्थापन झाला आहे या विश्वासाने आम्ही बोलत होतो. कामगार शेतकऱ्यांचे असे राज्य आपल्या हिंदुस्थानात यावे म्हणून आम्ही कम्युनिस्ट पक्षाची स्थापना करून लढा उभारला व त्यासाठी अनेक वर्षांचा तुरुंगवासही भोगला. बोलघेवड्या समाजवाद्यांना अथवा कम्युनिस्टांना आपआपसात थारा नसे. पक्षात मतभेद झाले तरीसुद्धा.

उत्पादनाची साधने देशाच्या मालकीची झाली की खाजगी मालमत्ता व नफेखोरी नष्ट होते. यामुळे सबंध देशाचे नियोजन होऊन भरभराट होते हे सांगताना श्री निळूभाऊंनी परखड शब्दात आपल्या देशाच्या नियोजनावर, पचवार्षिक योजनांवर टीका केली आहे ते म्हणतात, " अति प्रचंड प्रकल्पांची, कारखान्यांची, यंत्रांची आवश्यकता असल्याने एका टोकाला गेल्याशिवाय भारत अन्य राष्ट्रांशी बरोबरीने उभा राहू शकणार नाही. सरकार व खाजगी हितसंबंध यांना एकमेकांच्या पायात पाय अडकवून भारताला जगाच्या बरोबरीने प्रगती करता येणार नाही. रशियात कोणत्याही प्रकल्पाची राष्ट्रीय दृष्टीकोनातून अत्यंत बारकाईने आखणी केली जाते. दूरगामी परिणामाचा विचार केला जातो. " नाहीतर उत्तर प्रदेशात मथुरेला रिफायनरी बांधायची व तिचा परिणाम जवळ असलेल्या ' ताजमहाल सारख्या जगातील एका आश्चर्यावर होऊ लागताच साफसफाईची धावपळ करायची हे कुठले नियोजन ! आपल्या देशात प्रत्येक राज्यातील सत्ताधारी आपल्या हितसंबंधानुसार प्रकल्पाची मागणी करतात.त्यात देशाचा वा राज्याचा विचार अगोदर केलेला नसतोच. खाजगी हितसंबंधांचे ' नियोजन ' चालू आहे.

राज्याराज्यातील हेवेदावे हेदेखील वर्गाधिष्ठीत व खाजगी हितसंबंध व त्यातून निर्माण होणारे राजकीय संबंध यातूनच वर येतात तेथे देशाचा विचार नसतो की त्यातील लोकांच्या सुखाचा नसतो.शेकडो शतके वहाणाऱ्या रावी बियास नद्यांचे पाणी

हरियाणाला अधिक की पंजाबला अधिक यावर वाद होऊन त्यांचे स्वच्छ पाणी रक्तरंजित होण्याची वेळ या देशात येते. अशा घटना सोविएत देशात होत नाहीत.

मध्य आशियातील राज्याचे श्री. निळूभाऊंनी विशेष निरीक्षण केलेले दिसते. तेथे काही राज्यांच्या भाषांना लिपी नव्हती. तेथे खास भाषा तज्ञ पाठवून लिप्या तयार झाल्या व पुस्तके छापली गेली. या राज्यांची पातळी उचावण्याचे सर्वतोपरी प्रयत्न सुरू झाले. कोणत्याही राज्याला इतरांपेक्षा कमी लेखणे किंवा मागासलेले ठेवणे समाजवादाच्या तत्त्वज्ञानात बसत नाही. सोविएत क्रांती होण्यापूर्वी स्त्रिया अत्यंत दडपल्या गेल्या होत्या समान हक्काच्या नुसत्या घोषणा न करता सरकारने शिक्षण व समान नोकरीची संधी देऊन स्त्रियाना आपल्या पायावर उभे केले. हे करताना जे आड आले त्यांचा मुलाहिजा ठेवला नाही.

सोविएत रशियात क्रांतीपूर्व मशिदी, चर्च ही सर्व धर्मस्थाने होती व आजही आहेत. समाजवादाची बांधणी सुरू होताना धर्म आपापल्या घरात ठेवा असे लेनिनने व सोविएत पार्टीने नुसते प्रवचन केले नाही,तर तशी परिस्थिती निर्माण केली शिक्षण, नोकरी,घरे, औषधोपचार या सर्व सामाजिक क्षेत्रात सर्व जनतेला समान संधी व वागणूक दिली एखाद्या धर्माच्या किंवा जातीच्या लोकांनी ओरड केली की,निवडणुकीतील मतांसाठी त्यांच्यापुढे मान तुकविण्याचे त्यांनी निकराने झिडकारले. अनेक धर्मगुरूंनी या सोविएत राज्याविरुद्ध बंड केले धमक्या दिल्या पण सोविएत कम्युनिस्ट पक्षाचे कार्यकर्ते व पुढारी यांनी हे असिधारा व्रत सोडले नाही. धर्मांधतेचा पराभव झाला, कारण धर्माला राजकारणात व देशबांधणीचे कार्यात ढवळाढवळ करताच येऊ नये, अशी सामाजिक व आर्थिक परिस्थिती निर्माण करण्यात आली याला लागणारे तत्त्वनिष्ठ शिस्तबद्ध कार्यकर्ते कम्युनिस्ट पक्षाने व तत्त्वज्ञानाने तयार केले.म्हणूनच अत्यंत क्रूर व शक्तीशाली हिटलरी हल्ल्याविरुद्ध एकट्याने तोंड देऊन स्वतःचा व इतर देशांचा सोविएत संघाच्या लष्करी ताकदीने बचाव केला भारताला स्वातंत्र्य दिल्याची ब्रिटीश साम्राज्यशाहीची घोषणा त्यानंतरच दुमदुमली.

सोविएत रशियाने नवा माणूस जन्माला घातला. मानवतेवर प्रेम करणारा, आपदकाली इतर देशांतील जनतेला मदत करणारा, स्वातंत्र्य चळवळीच्या लढ्यात इतरांचे पाठीशी उभा राहणारा व जागतिक शांततेसाठी आत्मीयतेने झटणारा असा मानव रशियात घडविला गेला.

माणसाचा स्वभाव, रुढी, धर्म, स्वार्थ, सुबत्तेची व श्रीमंतीची कल्पना व हव्यास हे सारे त्या त्या कालखंडातील उत्पादन साधने व आर्थिक संबंध यावर अवलंबून असते. पूर्वकाळात आपल्या येथे 'गोधन' होते. आज कारखाने व पैसा हे धन आहे महाभारतात भीष्म पितामहांना विचारले की माझ्या रक्त संबंधितांना मी कसा मारू ? पण आज संपत्तीसाठी माता-पित्याची देखील हत्या होत आहे. नियोग

प्रकाशक :

सौ. स्मिता बोरकर

शलाका प्रकाशन
१२, हाजी इ. पी. ट्रस्ट बिल्डींग
गोखले रोड–रानडे रोड जंक्शन,
दादर, मुंबई–४०००२८

मुद्रक :

दिनानाथ म्हात्रे

विजया प्रिंटींग प्रेस
शिराड–अलिबाग,
जिल्हा:रायगड

किंमत १२ (बारा) रुपये

प्रथम आवृत्ती :

७ नोव्हेंबर १९८३

© नीलकंठ खाडिलकर

मुखपृष्ठ :
स्मिता आर्टस
मुखपृष्ठ मुद्रण :
बिंदू आर्टस
मुंबई –४०००११

# प्रस्तावना

## कॉ. श्रीपाद अमृत डांगे

सुप्रसिद्ध 'नवाकाळ' दैनिकाचे संपादक श्री. नीलकंठ खाडिलकर यांनी सोविएत युनियनला जाऊन आल्यानंतर लिहीलेल्या अभ्यासपूर्ण संपादकीय लेखांचा आणि नवीन लेखांचा संग्रह या पुस्तकरूपाने प्रसिद्ध होत आहे. गेल्या पंधरा-वीस वर्षांत अनेक क्षेत्रातील लोक सोविएत रशियाला जाऊन आले. निरनिराळ्या दृष्टीकोनांतून पुस्तके लिहिली गेली. साधक बाधक टीकाही झाली. काहींनी 'रशियाचा पोलादी पडदा' भक्कम केला तर काहींनी हुकूमशाहीची पकड घट्ट होत चालल्याची ग्वाही दिली आणि लोकशाहीच्या बंडाची 'ध्वजा' रशियात लवकरच फडकेल अशी 'भविष्यवाणी' केली. पण तसे घडले नाही व घडणारही नाही.

आम्ही भारतीय कम्युनिस्ट या देशात रशियन राज्यपद्धती म्हणजे रशियन कम्युनिझम आणण्याचे कट रचतो या आरोपाखाली पूर्वी शेकडो कम्युनिस्टांना तुरुंगात डांबण्यात येत असे. मी स्वतः कम्युनिस्ट तत्त्वे लोकांपुढे मांडल्याच्या आरोपाखाली ब्रिटीश अमदानीत तसेच मुरारजी देसाई या प्रख्यात कॉंग्रेस मंत्र्याच्या राज्यात मिळून अठरा वर्षे तुरुंगवास भोगला आहे. पण प्रत्यक्षात सोविएत देशाचे दर्शन मला व्हायला अनेक वर्षे वाट पहावी लागली.

श्री. निळूभाऊंचे लेख वाचल्यावर वाटले की, पूर्वग्रह बाजूला ठेऊन ते सोविएत रशियाला गेले. जे दिसले तेच त्यांनी लिहिले आहे. सत्यावर 'भाष्य

लिहिण्याचा अट्टाहास त्यांनी केलेला नाही सर्वसामान्य जनतेला रुचतील अशा शब्दांत त्यांनी समाजवादाची प्रत्यक्ष फळे चाखायला दिली.

श्री. निळूभाऊंनी मला प्रस्तावना लिहायला का सांगितले कोण जाणे. मला तर गेली साठ वर्षे सोविएत युनियनचा ' भाट ' असा शिक्का लागला आहे. मॉस्कोत पाऊस पडला तर भारतात छत्र्या उघडणारे आम्ही असे अनेक उपरोधाचे बाण व राजकीय हल्ले सहन करूनही समाजवादाच्या शास्त्रावरची आमची निष्ठा ढळली नाही.

मी प्रथम सोविएत रशिया पाहिला १९४६ साली ट्रेड युनियन परिषदेला गेलो असताना. पण त्यापूर्वी पचवीस वर्षे सोविएत रशियात कामगार शेतकऱ्यांचे राज्य आले आहे, तेथे उपासमार, बेकारी नाही, जमिनदार किंवा भांडवलदार नाहीत, स्त्रियांचे दास्यत्व नाही हे आम्ही सांगत होतो. त्याचा आधार होता मार्क्सवादी लेनिनवादी तत्त्वज्ञान. त्या तत्त्वज्ञानावरच सोविएत रशियाची आर्थिक व राजकीय रचना झाली आहे. तेव्हा तेथे खराखुरा समाजवाद स्थापन झाला आहे या विश्वासाने आम्ही बोलत होतो. कामगार शेतकऱ्यांचे असे राज्य आपल्या हिंदुस्थानात यावे म्हणून आम्ही कम्युनिस्ट पक्षाची स्थापना करून लढा उभारला व त्यासाठी अनेक वर्षांचा तुरुंगवासही भोगला. बोलघेवड्या समाजवाद्यांना अथवा कम्युनिस्टांना आमच्यात थारा नसे. पक्षात मतभेद झाले तरीसुद्धा.

उत्पादनाची साधने देशाच्या मालकीची झाली की खाजगी मालमत्ता व नफेखोरी नष्ट होते. यामुळे सबंध देशाचे नियोजन होऊन भरभराट होते हे सांगताना श्री. निळूभाऊंनी परखड शब्दांत आपल्या देशाच्या नियोजनावर, पंचवार्षिक योजनांवर टीका केली आहे. ते म्हणतात, " अति प्रचंड प्रकल्पाची, कारखान्याची, यंत्रांची आवश्यकता असल्याने एका टोकाला गेल्याशिवाय भारत अन्य राष्ट्राशी बरोबरीने उभा राहू शकणार नाही. सरकार व खाजगी हितसंबंध यांना एकमेकांच्या पायात पाय अडकवून भारताला जगाच्या बरोबरीने प्रगती करता येणार नाही. रशियात कोणत्याही प्रकल्पाची राष्ट्रीय दृष्टीकोनातून अत्यंत बारकाईने आंखणी केली जाते. दूरगामी परिणामांचा विचार केला जातो. " नाहीतर उत्तर प्रदेशात मथुरेला रिफायनरी बांधायची व तिचा परिणाम जवळ असलेल्या ताजमहाल सारख्या जगातील एका आश्चर्यावर होऊ लागताच साफसफाईची धावपळ करायची हे कुठले नियोजन ! आपल्या देशात प्रत्येक राज्यातील सत्ताधारी आपल्या हितसंबंधानुसार प्रकल्पाची मागणी करतात.त्यात देशाचा वा राज्याचा विचार अगोदर केलेला नसतोच. खाजगी हितसंबंधांचे ' नियोजन ' जास्त असते.

राज्याराज्यातील हेवेदावे हेदेखील वर्गाधिष्ठीत व खाजगी हितसंबंध व त्यातून निर्माण होणारे राजकीय संबंध यातूनच वर येतात. तेथे देशाचा विचार नसतो की त्यातील लोकांच्या सुखाचा नसतो.शेकडो शतके वहाणाऱ्या रावी बियास नद्यांचे पाणी

हरियाणाला अधिक की पंजाबला अधिक यावर वाद होऊन त्यांचे स्वच्छ पाणी रक्त-रंजित होण्याची वेळ या देशात येते. अशा घटना सोविएत देशात होत नाहीत

मध्य आशियातील राज्यांचे श्री निळूभाऊंनी विशेष निरीक्षण केलेले दिसते तेथे काही राज्याच्या भाषांना लिपी नव्हती तेथे खास भाषा तज्ञ पाठवून लिप्या तयार झाल्या व पुस्तके छापली गेली. या राज्याची पातळी उचावण्याचे सर्वतोपरी प्रयत्न सुरू झाले. कोणत्याही राज्याला इतरांपेक्षा कमी लेखणे किंवा मागासलेले ठेवणे समाजवादाच्या तत्त्वज्ञानात बसत नाही. सोविएत क्रांती होण्यापूर्वी स्त्रिया अत्यंत दडपल्या गेल्या होत्या. समान हक्काच्या नुसत्या घोषणा न करता सरकारने शिक्षण व समान नोकरीची संधी देऊन स्त्रियांना आपल्या पायावर उभे केले. हे करताना जे आड आले त्यांचा मुलाहिजा ठेवला नाही.

सोविएत रशियात क्रांतीपूर्व मशिदी, चर्च ही सर्व धर्मस्थाने होती व आजही आहेत. समाजवादाची बांधणी सुरू होताना धर्म आपापल्या घरात ठेवा असे लेनिनने व सोविएत पार्टीने नुसते प्रवचन केले नाही,तर तशी परिस्थिती निर्माण केली.शिक्षण, नोकरी,घरे, औषधोपचार या सर्व सामाजिक क्षेत्रात सर्व जनतेला समान संधी व वागणूक दिली एखाद्या धर्माच्या किंवा जातीच्या लोकांनी ओरड केली की,निवडणुकीतील मतासाठी त्यांच्यापुढे मान तुकविण्याचे त्यांनी निकराने झिडकारले. अनेक धर्मगुरूंनी या सोविएत राज्याविरुद्ध बंड केले. धमक्या दिल्या पण सोविएत कम्युनिस्ट पक्षाचे कार्यकर्ते व पुढारी यांनी हे असिधारा व्रत सोडले नाही. धर्मांधतेचा पराभव झाला, कारण धर्माला राजकारणात व देशबांधणीचे कार्यात ढवळाढवळ करताच येऊ नये, अशी सामाजिक व आर्थिक परिस्थिती निर्माण करण्यात आली याला लागणारे तत्त्वनिष्ठ शिस्तबद्ध कार्यकर्ते कम्युनिस्ट पक्षाने व तत्त्वज्ञानाने तयार केले.म्हणूनच अत्यंत क्रूर व शक्तीशाली हिटलरी हल्ल्याविरुद्ध एकट्याने तोंड देऊन स्वतःचा व इतर देशांचा सोविएत संघाच्या लष्करी ताकदीने बचाव केला भारताला स्वातंत्र्य दिल्याची ब्रिटीश साम्राज्यशाहीची घोषणा त्यानंतरच दुमदुमली.

सोविएत रशियाने नवा माणूस जन्माला घातला. मानवतेवर प्रेम करणारा, आपदकाली इतर देशांतील जनतेला मदत करणारा, स्वातंत्र्य चळवळीच्या लढ्यात इतरांचे पाठीशी उभा राहणारा व जागतिक शांततेसाठी आत्मीयतेने झटणारा असा मानव रशियात घडविला गेला.

माणसाचा स्वभाव, रूढी, धर्म, स्वार्थ, सुबत्तेची व श्रीमंतीची कल्पना व हव्यास हे सारे त्या त्या कालखंडातील उत्पादन साधने व आर्थिक संबंध यावर अवलंबून असते. पूर्वकाळात आपल्या येथे 'गोधन' होते. आज कारखाने व पैसा हे धन आहे. महाभारतात भीष्म पितामहांना विचारले की माझ्या रक्त संबंधितांना मी कसा मारू ! पण आज संपत्तीसाठी माता-पित्यांची देखील हत्या होत आहे. नियोग

पद्धतीने पुत्रप्राप्ति करणे हे तेव्हा धर्मविरोधी नव्हते आज चालेल का ! पाच पांडवाची द्रौपदी पतिव्रता ठरते. तेव्हा तिच्या भावना काय होत्या ! षड्रिपुचे काय झाले ? याचा अर्थ गुलामगिरी, जमिनदारी, भांडवलशाही या प्रत्येक अवस्थेत जसे उत्पादन संबंध बदलले तशा धर्मांच्या कल्पनाही बदलल्या.

तेव्हा समाजवादातून कम्युनिझमच्या अवस्थेकडे गेल्यावर माणूसच बदलेल. रक्षित राज्याची गरज रहाणार नाही ही अवस्था एके काळी होती असे भीष्मानी महाभारतात धर्माला सांगितले.

'नैव राज्यं न राजा सीत्
न च दण्डो न दण्डिकाः
धर्मेणैव प्रजाः सर्वा रक्षन्ति स्म परस्परम '

हे घडले जेव्हा वर्ग, वर्ण नव्हते. अतिरिक्त उत्पादन होण्याइतकी उत्पादन साधने नव्हती. तेव्हा अत्यंत मागासलेल्या जीवनमानात हे झाले हेवेदावे, स्वार्थ हे निर्माण केव्हा झाले ? जेव्हा उत्पादनाची वाढ झाली व उत्पादन संबंधातून व संपत्तीची वाढ होऊन एका वर्गाने दुसऱ्यावर हुकूमत प्रस्थापित केली तेव्हा. समाजवादानंतर कम्युनिझमच्या अवस्थेत इतकी सुबत्ता होईल की कोणत्याही स्वरुपाचे कायदेकानू लागणार नाहीत. कारण उत्पादनाची साधने व उत्पादन समाजाचे मालकीचे राहील. 'षड्रिपुशी' लढाई करावी लागणार नाही 'रक्षन्ति स्म परस्परम्' अशी विचार-सरणी होईल. नवा मनुष्य घडेल आणि षड्रिपुचे अस्तित्व नाहीसे होईल.

हे यासाठी सांगितले की, श्री खाडिलकरानी लिहिलेल्या लेखातील काही विचाराशी मी सहमत नाही पण याची खोलवर चर्चा करण्यासाठी ही प्रस्तावना नाही.

तसेच लेनिनने मार्क्सवादाची पोथी 'गाडली' व नवा व्यवहारी समाजवाद अवलंबला या मताशी मी कधीच सहमत होऊ शकत नाही. श्री. निळूभाऊ खाडिलकर एका अतिशय सुंदर बागेत गेले. झाडावरची फळे फुले पाहून आनंदित झाले. मोहित झाले या झाडाचे बीज जमिनीखाली होते व त्यातूनच झाड उगवले. ते बीज 'गाडले' गेले नाही. त्याला लेनिनने व कम्युनिस्ट पक्षाने खतपाणी घातले. त्यातूनच ही मनोहर रम्य अशी सदा बहार फुलबाग जन्माला आली. तेव्हा आधी बीज एकले बीज अंकुरले रोप वाढले ! समाजवादी सोवियत रशियासारखे आणखी कितीतरी देश त्या अवस्थेत पोचले आहेत. आणखी पोचत आहेत. त्याच रस्त्यावर हिंदुस्थानही जाणार आहे हे नक्की. एका बीजा पोटी तरु घेती सुमने फळे ! असा आहे हा समाजवाद मार्क्सने सांगितलेला.

१७ सप्टेंबर १९८३
मुंबई

# मनोगत

सोविएत रशियाचा २५ जुलै १९८३ पासून जवळजवळ एक पंधरवडा दौरा करण्याचा योग आला. ताश्कंदपासून दौरा सुरू झाला आणि सर्वात शेवटी लेनिनग्राड मॉस्को पाहून संपला.

या दौऱ्यात मी कमीत कमी झोप घेतली आणि सारखा फिरत राहीलो. रशियाच्या दर्शनाने मला धक्का बसला. यासाठी नव्हे की, रशियाने अफाट प्रगती केली आहे. तशी प्रगती अमेरिकेनेही केली आहे. पण जे प्रश्न भारताला छळत आणि ग्रासत आहेत तेच प्रश्न रशियासमोर १९२० साली होते असे मला पदोपदी दिसले. आमच्या समस्या आमच्या उरावर बसल्या आहेत तर रशियात या समस्या साफ केल्या आहेत.

१९१७ साली क्रांती झाली आणि त्यानंतर पहिली पाच वर्षे ब्रिटन आदि चौदा देशाच्या सैन्याचा तसेच अंतर्गत बंडाळीचा पराभव करण्यात गेली. १९४१ ते १९४५ या चार वर्षांत रशियाच्या भूमीवर दुसरे महायुद्ध लढले गेले आणि त्यात दोन कोटी रशियन जवान ठार झाले किमान दहा वर्षांची आर्थिक प्रगती उध्वस्त झाली आणि चार वर्षे या लढाईत गेली. म्हणजे जवळजवळ वीस वर्षे विदेशी आक्रमणाना तोंड देण्यात गेली. १९४७ साली स्वतंत्र झालेल्या भारताच्या दृष्टीने विचार करायचा तर प्रगतीसाठी त्यांना आमच्यापेक्षा दहाचवर्षे अधिक मिळाली.पण रशिया आज एवढा बलाढ्य झाला आहे की, दक्षिण कोरियाचे प्रवासी विमान रशियाने

पाडल्यावर अमेरिकेचे प्रेसिडेंट रिगन यांनी डोंगराएवढ्या शिव्या दिल्या आणि कृतीचा फक्त उदीर काढून दाखविला!

भारतात जशा अनेक भाषा तशाच रशियात अनेक भाषा आणि भाषिक राज्ये आहेत. आमच्याकडे मुस्लीम धर्म दुसऱ्या क्रमाकाचा तसाच रशियातही! किंबहुना संपूर्ण मध्य आशिया तसेच अझरबैजान, आर्मेनिया आणि कॉकेशस पर्वताच्या उत्तरेकडील तार्तार मुस्लीम, मंगोलियाच्या सीमेवरील मोंगल असे कडवे धर्मांध रशियात असताही रशियाने त्यांचे धर्मवेड साफ नष्ट केले आहे. धर्म घरात नि मशिदीत चर्चमध्ये राहिला आहे. तेराव्या आणि चौदाव्या शतकात तार्तार-मंगोल टोळ्यांनी मॉस्कोही उध्वस्त केले होते. मध्य आशिया तर त्यांचाच. शिवाय सीमेवर अफगाणिस्तान- इराण–इराक–तुर्कस्थान! पण तरीही धर्मवेडाचा खातमा केला

नियोजन म्हणजे चमत्कारच आहे नद्या वळवून वाळवटात शेती-मच्छीमारी सुरू आहे तेल गॅस मिळत आहे.रशियाचा विस्तार अफाट असून, मध्य आशिया, सैबेरिया आदि प्रदेशात आणखीही प्रचंड विकास होऊ शकेल या उलट अमेरिकेची स्थिती आहे तिथे विकास 'ऑप्टीमम' होऊन चुकला आहे. यामुळे जर रशियाला आणखी पचवीस वर्षे शांततेची मिळाली तर जगातील तो सर्वात बलाढ्य व संपन्न देश होईल.

निसर्ग रशियाला सर्वथा प्रतिकूल आहे. भारताला निसर्गाचे वरदान आहे मग भारत मागे का? योजकस्तत्र दुर्लभ. हेच माझे उत्तर आहे. रशियासारखी 'सिस्टीम' आमच्या देशात 'प्रॅक्टीकल सोशॅलिझम' अमलात आणण्यासाठी आली तर तीस वर्षांत भारत असाच समर्थ संपन्न होईल. 'सुपर पॉवर बनेल.

दुर्दैवाची गोष्ट म्हणजे रशिया जसा आहे तसा आजवर कुणी सांगितलाच नाही जे साम्यवादाचे विरोधक आहेत ते अमेरिकन वृत्तपत्रातील बातम्या छापून आणि पसरवून अपप्रचार करीत राहिले. जे कम्युनिस्ट आहेत ते मार्क्सवादाचे पोथीप्रामाण्य सभाळत आणि 'पक्षाची लाईन' पहात नुसती आकडेवारी देत राहिले. पोथीनिष्ठ भाषा किचकट भाषांतर करीत वापरत राहिले रशियाचे निमन्त्रण मला कसे आले हे आजही मला कोडे आहे. मी कुठल्या पक्षाचा नाही. कुठल्याच वकिलातीत कधीही जात नाही जसे दिसेल तसे मांडायचे आणि जसे मनात तसे लिहायचे हा आमचा तीन पिढ्यांचा धर्मच यथाशक्ती चालवित आलो. पण निमन्त्रण आले खरे.

निमन्त्रणावरून परदेशी जाणाऱ्याचे तीन वर्ग असतात. पहिले बाटलीवाला! ते परदेशात मोफत दारू येथेच्छ पित आणि कॅबरे पहात बसतात त्याची वर्णने साहित्यपूर्ण चघळतात. परदेशात जाऊन आलो म्हणून स्वत वरच खूष असतात. दुसरे असतात पालखीवाला! ते नानी पालखीवालाप्रमाणे अमेरिकन पालखी खांद्यावर घेऊन फिरत असतात. रशियाची निंदा करणे हा त्यांचा धंदाच असतो. त्याना

बुद्धिमंत असे म्हटले जाते–म्हणजे तेच एकमेकाला बुद्धिमंत म्हणत असतात! 'केसरी'चे संपादक चंद्रकांत घोरपडे यांना मी म्हणालो की, काही संपादकांना नि बुद्धिमतांना रशिया म्हणताच सर्व काही वाईट दिसू लागते. जरी रशियात एकादी सुंदर रशियन युवती पाहिली तरी ते तिला कुब्जा म्हणतील! यावर चंद्रकात घोरपडे उद्गारले, "या बाबतीत मात्र ते अपवाद करतील!" तिसरा वर्ग असतो पोथीवाल्याचा–ज्याचे धर वर्णन केलेच आहे. स्वतंत्र निरीक्षण–चिंतन करणारे असतात ते लिहीत नाहीत किंवा त्यांचे लेखन प्रसिद्ध होण्यास स्वतंत्र विचारसरणीमुळेच साधन मिळत नाही. पण यामुळे रशियाच्या आजच्या वाटचालीचे यथार्थ वर्णन समोर आले नाही ती उणीव या पुस्तकाने दूर केली आहे. श्री. पां. वा. गाडगीळ यांनी या लेखमालेवर लिहीताना म्हटले आहे— "नीलकंठ खाडिलकरांनी आपले आजोबा काकासाहेब खाडिलकर व वडिल अप्पासाहेब खाडिलकर यांचे पल्लेदार लेखन व पल्लेदार वक्तृत्त्व हे गुण आत्मसात केले ते या लेखात ओतप्रोत आहेत. जिव्हाळ्याने लिहीणे हाही दोन पिढ्यांचा गुण त्यांच्या अंगी मुरलेला आहे. त्यांनी रशियाचे गौरवपूर्ण चित्र रेखाटले असून ते सर्व अतिशय खरे आहे इतके चागले नि खरे चित्रण रशियाला जाऊन आलेले कम्युनिस्ट तसेच कम्युनिस्टेतर यांनी भारतात आजवर सादर केलेले नाही."

रशियात राष्ट्रवाद कट्टर आहे.खाजगी मालकीची घरे नि छोटी शेते-बागा आहेत जादा उत्पादनासाठी बोनस आहे. रशियन नेते अत्यंत व्यवहारी आहेत आणि प्रत्यक्ष अनुभव हाच त्यांना निर्णायक आहे. मार्क्सवादाच्या ग्रंथात 'चीनने आक्रमण का केले?' या प्रश्नाचे उत्तर ते शोधत नाहीत चिनी सैनिक रशियन हद्दीत शिरताक्षणी रशियनांनी त्यांच्यावर तत्काळ गोळ्या झाडल्या! त्यानंतर देशभर चीनविरोधी प्रचाराची बावटळ आली.

मार्क्सचे ग्रंथ समाजवादाच्या प्रारंभापर्यंत उपयोगी आहेत आणि त्यानंतर अनुभव नि परिस्थिती हेच निर्णायक आहेत. माझे हे मत रशिया पाहून भक्कम झाले. पण असे का? त्याचे सैद्धांतिक उत्तर मला या दौऱ्यात चिंतन करताना अचानक सांपडले.मी कुठल्या शिष्टमंडळात नव्हतो–एकटाच माझ्या पत्रकार मार्गदर्शकाबरोबर-ओलेग स्मिरनोव्हबरोबर फिरत होतो. यामुळे मनन चिंतन सहजसुलभ झाले.

विख्यात विचारवंत श्री.पां.वा. गाडगीळ,ज्यांनी मार्क्सवादाचा सखोल अभ्यास वर्षानुवर्षे केला आहे, यांनी मला मुद्दाम बोलावून घेऊन सांगितले की, 'मार्क्स-वादावरील तुमचा सिद्धांत पूर्णपणे ओरिजिनल आहे. मला तो आवडला. तुमच्या लिखाणाने मी फार आनंदित झालो.' शिवसेना प्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे यांनी जाहीरपणे सांगितले की, हीच रशियन धर्तीची सिस्टीम आणि प्रॅक्टीकल सोशॅ-लिझम आम्हांला हवेत असे 'नवाकाळ' मधील रशियाविषयक लेखमालेने माझे ठाम मत झाले शेकडो लोकाची पत्रे आली. अनेक कम्युनिस्ट कार्यकर्त्यांनी भेटून सांगितले

आहे की, आमच्या नेत्यांनी आम्हाला रशियाचे असे दर्शन घडविलेच नाही. त्याच्यामुळे आमचे नुकसान झाले ! पण त्यांना उघडपणे तसे म्हणावयाचे नव्हते, म्हणून नावे देत नाही. सध्या निवडणुकीच्या तोंडावर मुस्लीमांसाठी रिझर्व्हेशन मागणारे उजव्या कम्युनिस्ट पक्षाचे अध्यक्ष कॉ. राजेश्वर राव याचे मत कळल्याशिवाय महाराष्ट्रातील कम्युनिस्ट तोंड कसे उघडणार ?

जगातील पहिली समाजवादी क्रांती लेनिनने केली आणि क्रांतीनंतर अत्यंत बिकट अशा सात वर्षांच्या काळात समाजवादाला व्यवहारी वळण देत समाजवादी क्रांती सुरक्षित केली. मार्क्सवादाच्या चरकातून माणसाला न नेता, माणसाच्या प्रत्यक्ष अनुभवाच्या चरकातून मार्क्सवाद नेला लेनिन म्हणतो–

'मार्क्सची सैद्धांतिक मांडणी [थिअरी] ही संपूर्ण आहे आणि अनुल्लंघनीय आहे असे आम्ही मानत नाही; उलटपक्षी आमची खात्री झाली आहे की मार्क्सने समाजवादी शास्त्राची फक्त कोनशिला बसविली आहे आणि जीवनाच्या गतीबरोबर धावण्यासाठी समाजवाद्यांनी सर्व दिशांनी मार्क्सवादी शास्त्र विकसित केलेच पाहिजे. आम्ही असे मानतो की, मार्क्सच्या सिद्धांताचा स्वतंत्र विस्तार विशेषतः रशियन समाजवाद्यांना आवश्यक आहे; कारण मार्क्सचे सिद्धांत म्हणजे केवळ सर्वसामान्य मार्गदर्शक तत्त्वे आहेत आणि त्याचा अमल इंग्लंडमध्ये फ्रान्सपेक्षा वेगळा, फ्रान्समध्ये जर्मनीपेक्षा वेगळा आणि जर्मनीत रशियापेक्षा वेगळा होतो.'

[ कलेक्टेड वर्क्स, खंड ४, पाने २१०-२११ ]

'पूर्वेकडील राष्ट्रांच्या समस्या अशा आहेत की त्याची सोडवणूक तुम्हाला कोणत्याही कम्युनिस्ट पुस्तकात सापडणार नाही. ती सोडवणूक तुम्हाला रशियाने सुरू केलेल्या समाजवादी धडपडीत सांपडेल. तुम्हाला तुमची समस्या तुमच्या स्वतंत्र अनुभवाने सोडवावी लागेल. त्यासाठी रशियाचा अनुभव नि सहकार्य मदतरूप राहील.'

[ नव्हेंबर २२, १९१९ रोजी पूर्वेकडील राष्ट्रांच्या
कम्युनिस्ट प्रतिनिधींसमोर केलेले भाषण–
कलेक्टेड वर्क्स, खंड ३०, पान १६२

'कोणत्याही परिस्थितीत आपण निव्वळ आणि शुद्ध कम्युनिझमच्या कल्पनाचा ग्रामीण भागात यापुढे तांतडीने प्रचार करता कामा नये. जोपर्यंत कम्युनिझम अवतीर्ण होण्यासाठी आवश्यक ती विपुलता नाही तोपर्यंत कम्युनिझमच्या कल्पनाचा प्रसार करणे हे हितावह तर नाहीच पण प्रत्यक्षात कम्युनिझमला मारकच ठरेल.'

[ जानेवारी १९२३ मधील सदर लेखन
आहे– कलेक्टेड वर्क्स, खंड ३३–
पाने ४६२–४६६ ]

या उताऱ्यांची झणझणीत चपराक कर्मठ पोथीनिष्ठांना बसली म्हणजे लेनिनने लिहिले त्याचा शांतपणे विचार ते करू शकतील. यासाठीच हे उतारे दिले.

भारताला प्रचंड सामर्थ्यशाली व समृद्ध राष्ट्र बनविण्याचे मन्त्र व तंत्र या ग्रथात आहे. भारताला हाच एकमेव मार्ग आहे असे माझे मत आहे. वाचकांनाही तसेच वाटले किंवा त्यांच्या विचारांना पुरोगामी चालना मिळाली तर हे पुस्तक कारणी लागेल.

ही लेखमाला पुस्तकरूपाने सादर करताना मी एवढेच म्हणेन की, या पुस्तकातील वर्णन जसे पाहिले तसेच केले आहे. विचारांती जे पटले तेच मत सादर केले आहे. कुणी शेठजी किंवा कुणी नेता किंवा विदेशी मेहेरनजर यांची मुलाहिजा आजवर केली नाही तशीच याही लेखमालेत नाही.

**नीलकंठ खाडीलकर**
संपादक 'नवाकाळ'
गिरगाव मुंबई ४०० ००४

१ नोव्हेंबर १९८३

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | जगातील सर्वात अद्‌भुत स्मशानभूमी | १ |
| २. | रशिया आणि इस्लामी तलवार | ५ |
| ३. | इस्लामी धर्मवेड नष्ट केले | १० |
| ४. | भयाण वाळवंटात मासेमारी | १६ |
| ५. | रशियातील कामगारवर्ग | २० |
| ६. | सर्वात मोठा लाभ स्त्रियांचा झाला ! | २५ |
| ७. | रशिया आणि पोलादी पडदा | २८ |
| ८. | योजकस्तत्र दुर्लभः<br>नाहीतर कोकणात ' ताश्कंद ' दिसेल ! | ३३ |
| ९. | खूप काही शिकविणारी शिक्षण पद्धती | ३९ |
| १०. | सौंदर्यशालिनी वीरांगना–लेनिनग्राड ! | ४६ |
| ११. | इंडियन स्टालीनचा किस्सा | ५३ |
| १२. | ख्रिस्ती धर्म, इस्लाम आणि हिंदुधर्म | ५७ |
| १३. | पंचमहाभूतांवर रामबाण | ६३ |
| १४. | मार्क्सने माणसापुढे हात का टेकले ?<br>यक्षप्रश्न सोडविणारा ' षड्‌रिपु ' सिद्धांत | ७२ |
| १५. | प्रॅक्टीकल सोशॅलिझम म्हणजे काय ?<br>अकारण माजविलेला गोंधळ | ८२ |
| १६. | ९९ टक्के जनतेला लाभ देणारा<br>प्रॅक्टीकल सोशॅलिझमचा कार्यक्रम | ९२ |

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
४१०
दा. क्र. २८०७)
प्रवास ९०।१२५७
ग्रंथ, शाखा (स्थळ प्रत)

: १ :

# जगातील सर्वांत अद्‌भुत स्मशानभूमी

रशियात अनेक स्मारके आहेत. शानदार शिल्पकला आणि डोळे दिपविणारी भव्यता यामुळे ही स्मारके नजर खिळवून टाकतात तथापि लेनिनग्राडमधील पिस्कॅरोव्हस्कोये स्मशानभूमी हे जगातील अद्वितीय असे स्मारक आहे. पावाच्या एका तुकड्यालाही मोताद होऊन भुकेने आणि थंडीने मरण पावलेल्या लेनिनग्राडमधील चार लाख सत्तर हजार स्त्री-पुरुष मुलांची प्रेते या स्मशानभूमीत पुरली आहेत. ही प्रेते अनामिकांची आहेत सव्वीस हेक्टर जमिनीत ही स्मशानभूमी असून मध्यभागी ३०० मीटर लांबलचक मार्ग आहे त्याच्या दुतर्फा रांगेने थडगीच थडगी आहेत या थडग्यांवर नावेच नाहीत! १९४१ एवढाच नामनिर्देश असलेल्या रांगा, १९४२ एवढीच नोंद केलेल्या रांगा, १९४३ आणि १९४४–असे चार वर्षांचे नामफलक भुकेने, थंडीने मरण पावलेल्या जवळजवळ पाच लाख नागरिकांचा परिचय करून देतात!

हिरव्यागार वनराजीतील ही न संपणारी थडगी म्हणजे दुसऱ्या महायुद्धातील सर्वांत भीषण शोकांतिका आहे. सर्वांत शौर्यशाली लढ्याची ही गाथा आहे. हिटलरने दुसरे महायुद्ध १९३९ साली सप्टेंबरमध्ये सुरू केले, पण रशियावर तीन दिशांनी २२ जून १९४१ रोजी विद्युत्‌वेगाचा हल्ला चढविला. पोलंड, डेन्मार्क, नॉर्वे, नेदरलॅंडस्, बेल्जियम, लक्झेमबर्ग, फ्रान्स अशा देशांचा हां हां म्हणता स्वाहाकार केलेल्या नाझी सेना लेनिनग्राडच्या दिशेने, मॉस्कोच्या रोखाने आणि कीव्हच्या

वाटेने निघाल्या. दोन महिन्यात रशियाचा पराभव करावयाचा होता त्यात लेनिनग्राडचा पाडाव सर्वांत अधिक राजकीय महत्त्वाचा होता, कारण १९१७ ची कम्युनिस्ट क्रांती सर्वप्रथम लेनिनग्राडने पेटविली होती. लेनिनग्राडच्या वेशीजवळ सप्टेंबरमध्ये नाझी सैन्य आले,पण अत्यंत कणखर प्रतिकारामुळे लेनिनग्राडचा कबजा कधीही घेऊ शकले नाही तेव्हा हिटलरने हुकूम सोडला की, 'लेनिनग्राडला वेढा घालून सर्व पुरवठा बंद करा–बाँबफेक करून महत्त्वाची ठिकाणे उध्वस्त करा–भुकेने आणि भीतीने व्याकुळ झालेले लेनिनग्राडचे नागरिक एकमेकाला मारतील–' पण प्रत्यक्षात तसे घडले नाही. यमदूत फास आवळत असताही कुणी दुसऱ्याचा पावाचा तुकडाही हिसकावून घेतला नाही! नऊशे दिवसांच्या या वेढ्यातील उपासमारीचे, थंडीचे आणि बॉम्बहल्ल्याचे हे जवळजवळ पाच लाख बळी! प्रेते गाड्यांनी उचलून या स्मशानभूमीत पुरण्यात येत होती आणि उरलेले जिवंत लोक लढत होते —

तीनशे मीटर लांबीचा आणि फार मोठ्या रुंदीचा मध्यभागातील मार्ग पार करीत असतानाच समोरची भव्य शिल्पाकृती अधिकाधिक स्पष्ट दिसू लागते. ही एकच शिल्पाकृती या अफाट विस्तारात आहे देशाची माता खिन्न चेहऱ्याने उभी आहे–ब्रॉन्झ धातुने घडविलेल्या या मातेच्या चेहऱ्यावर खिन्नता पसरलेली दाखविण्यात शिल्पकाराने कमाल केली आहे तिच्या हातात ओक वृक्षाची पाने आहेत – ती विजयाची निशाणी आहे. शिल्पाकृतीसमोर अखंड तेवणारी ज्योत आहे, तर शिल्पाकृतीमागे भक्कम भिंत उभी आहे त्यावर त्या ९०० दिवसातील हालअपेष्टेचे आणि त्यावर मात करणाऱ्या प्रखर जिद्दीचे अगदी थोडे प्रसंग चितारले आहेत, आणि एकच एक कविता आहे! ती आहे ओल्गा बेरगोल्टस् या कवयित्रीची कविता! स्वतः त्या वेढ्यात सापडलेल्या या कवयित्रीने तितकीच साधी, पण पाषाणालाही पाझर फोडणारी जणू शिल्पाकृतीच मोजक्या शब्दांनी मूर्तिमंत घडविली आहे.

१९६२ च्या भारत–चीन लढाईनंतर लिहिले गेलेले सुप्रसिद्ध गीत भारतभर लताच्या नि महमद रफीच्या आवाजात फार गाजले—

ओ मेरे वतन के लोगो
जरा आँखो मे भरलो पानी
जो शहीद हुए है उनकी
जरा याद करो कुर्बानी!

त्याच्याशी बेरगोल्टस् या कवयित्रीच्या गीताची तुलना केली म्हणजे भावुकता आणि रंगेल कडवेपणा यातील भेद लक्षात येईल. जगातील त्या अद्वितीय स्मशानभूमीतील एकमेव गीताचा आशय असा —

इथे चिरनिद्रा घेत आहेत–
लेनिनग्राड ज्यांचे घर होते

पुरुष, स्त्रिया आणि बालक
आणि लाल लष्कराचे सैनिक
इथे चिरनिद्रा घेत आहेत

जिथे प्रथम क्रांती पेटली
त्या लेनिनग्राडच्या रक्षणासाठी
जीवाची आहुती त्यांनी दिली
येथे नांवेही देता येत नाहीत
इतके ते हजारो, लाखो होते

पोलादी भक्कम भिंतीपुढची
न संपणारी ही थडगी
त्याच्या शिला पहाणाऱ्यांनो,
मनावर पक्के कोरून ठेवा
आम्ही कुणालाही विसरलेलो नाही
आम्ही काहीही विसरलेलो नाही !

लेनिनग्राड ही रशियाची १९१८ पर्यंतची राजधानी आणि आज मॉस्कोनंतर दुसऱ्या क्रमांकाचे शहर ! संपूर्ण कफ परेडपेक्षाही अधिक विस्तार असलेल्या या भूमीत असे अत्यंत साधे आणि परिणामकारक स्मारक उभे आहे जर माणसाचे मोल वाटत नसते तर वृक्षराजीत धीरगंभीर संगीताच्या सुरात मृतांची स्मृती अखंड ठेवण्याऐवजी, बिल्डरांना शहरातील या मूल्यवान जमिनी देऊन सिमेंट कॉंक्रीटचे जंगल नसते उभारले ? कम्युनिस्ट तत्त्वज्ञान हे जडवादी ( मटेरिॲलिस्टीक) असल्याने तेथे माणसाची यंत्रे केली आहेत हा अपप्रचार धादांत खोटा आहे. भारतात असा पुतळा उभारतात की तो कुणाचा आहे ते त्याच्याखालील नांव वाचूनच लोकांना ओळखता यावे. असला प्रकार रशियात नाही. प्रत्येक पुतळा इतका उत्तम की, जणू प्रत्यक्ष ती असामीच डोळ्यासमोर उभी आहे असे भासते. अत्यंत स्वच्छ सुंदर ठेवलेले प्रत्येक स्मारक ! मृताचा पुतळा उभारून गंगेत घोडे न्हाल्यासारखे धन्य व्हायचे आणि वर्षातून एकदा सफाईला धावायचे या भारतीय रीतीचे दुसरे टोक रशियाने गाठले आहे. शहरात स्मारके आहेत आणि ती रात्रंदिवस स्वच्छ, सुंदर ठेवली जातात सव्वीस हेक्टर पसरलेल्या या स्मशानभूमीत कागदाचा कपटाही पडलेला नसतो. तेथील प्रत्येक थडग्यावरची शिला स्वच्छ सुंदर ! अवघी दोनच छोटेखानी म्युझियम आहेत त्यात ९०० दिवसांच्या वेढ्याच्या काळातील छायाचित्रे आहेत.

पण सर्वांत कमाल म्हणजे साचिएव्ह कुटुंबातील एका अकरा वर्षांच्या तान्या नामक मुलीच्या डायरीतील पाने ठेवली आहेत. डायरीत फक्त इतकेच लिहिले आहे की—

पहिले पान :

मोठी बहीण झेन्या दुपारी १२-३० वाजता मरण पावली—डिसेंबर १९४१.

° ° °

दुसरे पान :

आजी दुपारी ३ वाजता मरण पावली— २५ जानेवारी १९४२.

तिसरे पान :

लोक्या गेली ! सकाळी ६ वाजता— १७ मार्च १९४२.

° ° °

चौथे :

काका वस्यांनी डोळे मिटले— दुपारी ४ वाजता, १० मे १९४२


° ° °

पाचवे :

आई आम्हाला सोडून गेली— सकाळी ७ वाजता १३ मे १९४२
आता आमच्या कुटुंबात कुणीच नाही ! फक्त मी उरले !

उपासमारीने व थंडीने खचलेली तान्याही हॉस्पिटलात १९४३ मध्ये मरण पावली. तिच्या मृत्यूची नोंद कोण करणार ? या अकरा वर्षांच्या बालिकेच्या मृत्यूची नोंद करणारी अशी ही स्मशानभूमी !

ज्यांना खोटे लिहून लेखणी विटाळायची असेल त्यांनी तसे खुशाल करावे. पण रशियात माणसाचे यंत्र झालेले नाही असाच निर्वाळा द्यावा लागेल. सारे रशियन नियोजन माणसासाठी आणि माणसाभोवतीच फिरते आहे याच्या खुणा जागोजागी आहेत ! पण रशियन नियोजनात माणसाचे काय झाले आहे ते तपशीलवार पहाण्यापूर्वी रशियाने इस्लामी धर्मवेडाचे काय केले ते पुढील प्रकरणात पाहू या.



आर्क्टीक सागर
नॉर्वे
स्वीडन
फिनलंड
इंग्लंड
फ्रान्स
स्पेन
पश्चिम जर्मनी
पूर्व जर्मनी
बाल्टीक समुद्र
लेक लाडोगा
लेनिनग्राड
पोलंड
ऑस्ट्रिया
हंगेरी
युगोस्लाविया
रुमानिया
बल्गेरिया
अल्बानिया
ग्रीस
काळा समुद्र
तुर्कस्तान
भूमध्य समुद्र
इजिप्त
इझराएल
सिरिया
इराक
मॉस्को
कीव्ह
खार्कोव
व्होल्गोग्राड
सोव्हिएट रशिया
उरल पर्वत
सैबेरिया
बैकल सरोवर
जॉर्जिया
आर्मेनिया
अझरबैजान
कॅस्पियन समुद्र
कझाकस्तान
मंगोलिया
तुर्कमेनिया
उझबेक
ताश्कंद
किर्गिझ
अश्काबाद
फ्रुन्झे
ताजिक
तेहरान
इराण
सिकियांग
पेकिंग
चीन
अफगाणिस्तान
पाकिस्तान
बलुचिस्तान
कराची
सिंध
तिबेट
नवी दिल्ली
नेपाळ
भारत
बांगला देश
ब्रह्मदेश
लाओस
थायलंड
कांपुचिया
मलेशिया
आफ्रिका
तांबडा समुद्र
सौदी अरेबिया
येमेन
दक्षिण येमेन
ओमान
इथियोपिया
केन्या
सोमालिया
अरेबियन समुद्र
बंगालचा उपसागर
हिन्दी महासागर

: २ :

# रशिया आणि इस्लामी तलवार

सोविएत नियोजन माणसासाठी व माणसाभोवती कसे फिरत आहे ते पहाण्या-पूर्वी भारताला भिडलेल्या राजकारणाचा विचार करू या. रशिया हा जगातील सर्वात अफाट देश आहे. रशियाचा विस्तार भारताच्या सातपट आहे, एवढेच सांगितले तरी झटकन कल्पना येऊ शकते. रशियाच्या दक्षिणेचा विभाग म्हणजे मध्य आशिया होय भारताच्या दृष्टीने मध्य अशियाचे, विशेषतः कॅस्पियन समुद्र आणि चीन यातील तुर्कमेनिया, उझबेक, ताजिक व किर्घिज या राज्यांचे महत्त्व फार मोठे आहे. कारण मुस्लिमांचे एकेकाळी साम्राज्य असलेला तो भाग आहे.

भारतात जशा अनेक भाषा आहेत तशाच रशियातही आहेत भारतात केंद्रीय सत्ता असून विविध भाषिक राज्ये आहेत, त्याचप्रमाणे रशियात केंद्रीय सत्ता आहे आणि पंधरा राज्ये आहेत. या राज्यांना रशियात सोविएत सोशॅलिस्ट रिपब्लिक म्हणतात आणि त्याच्या संघराज्याला युनियन ऑफ सोविएत सोशॅलिस्ट रिपब्लिक्स (यूएसएसआर) हे नाव आहे. सोविएत युनियनच्या मध्य अशियातील राज्यांत मोठ्या प्रमाणात मुस्लिम असून पूर्वी तेथे मुस्लिम राजांची नि सरदाराची जी राज्ये होती त्यांच्या आपापसात लढाया चालत. इराणमधून आक्रमक येत असत व जाळपोळ, लुटालूट करीत. पूर्वे-कडील मंगोलियातून चेंगीझखानाची टोळधाडही मध्य आशियात येऊन गेली आणि सारा प्रदेश उजाड करून गेली.

अगदी पश्चिमेकडून म्हणजे काळ्या समुद्रापासून सुरुवात केली तर तेथील आर्मेनिया रिपब्लिकची सीमारेषा तुर्कस्तानला व इराणला भिडते. आर्मेनियालगत अझरबैजान रिपब्लिक असून त्याची सीमारेषा ओलांडली की, इराणची भूमी सुरू होते. नतर कॅस्पियन समुद्र असून तो ओलांडला की तुर्कमेनिया रिपब्लीक आहे या तुर्कमेनियाची राजधानी अश्काबाद येथे मी दोन दिवस होतो. कोपेत डाग (अनेक डोंगर) पर्वतानी तुर्कमेनिया आणि इराण यांची सीमा आंखली आहे. अश्काबादेत या सीमेच्या डोंगराजवळ मी उभा होतो तुर्कमेनियातील सर्वात दक्षिणेचे गांव कुश्क आणि ते अफगाणिस्तानच्या सीमेवर आहे तुर्कमेनियानतर उझबेकिस्तान रिपब्लीक असून त्याची राजधानी ताश्कद भारतीयाना चागलीच परिचित आहे. भारत पाक युद्ध १९६५ साली होऊन भारताचा विजय झाल्यानतर रशियन पुढाकाराने भारत पाक वाटाघाटी ताश्कदमध्ये झाल्या. भारताचे तेव्हाचे पतप्रधान लालबहादूर शास्त्री आणि सरक्षण मंत्री यशवतराव चव्हाण त्यासाठी ताश्कदला गेले होते. दुर्दैवाने लालबहादूर शास्त्री याचे ताश्कदमध्ये झोपेतच निधन होऊन भारताला जबरदस्त धक्का बसला. मध्य आशिया हा भूकंपाचा टापू आहे आणि योगायोग असा की, १९६६ साली ताश्कदमध्ये जबरदस्त भूकप होऊन सारे ताश्कदच उध्वस्त झाले! माझ्या रशियन दौऱ्याची सुरुवात ताश्कदमधील दोन दिवसांच्या मुक्कामाने झाली ताश्कदनजीकची समरकद आणि बुखारा ही मोंगली स्मृती जागविणारी शहरेही भारतीयांना माहीत आहेत. उझबेकिस्ताननतर ताजिक रिपब्लीक आणि किर्घीझ रिपब्लीक असून किर्घीजच्या सीमा पूर्वेला चीनला थडकल्या आहेत. उझबेकिस्तान व ताजिकीस्तान याची दक्षिण सीमा ओलांडली की अफगाणिस्तानात पाऊल पडते. रशियन सैनिकांचे पाऊल आता तेथे पडलेच आहे! विशेषतः तुर्कमेनिया, उझबेकिस्तान आणि ताजिकीस्तान या तीन राज्याचे महत्त्व भारताला फार आहे, कारण इराण–अफगाणिस्तानशी भिडलेली ही राज्ये असून इस्लामी साम्राज्य तेथे पूर्वकाळात पसरले होते.

१५२६ साली भारतात इब्राहिम लोदीचा पानिपत येथे पराभव करून ज्याने मोगल साम्राज्य स्थापन केले तो मोगल बादशहा बाबुर (१४८३ ते १५३०) उझबेकीस्तानचा! महान पराक्रमी आणि क्रूर मुसलमानी सम्राट तैमूरलग याचा बाबुर हा खापरपणतू. त्याची आई ही ताश्कदच्या युनुस खान नामक उमरावाची कन्या होती. बापाच्या निधनामुळे अल्पवयातच म्हणजे वयाच्या अवघ्या बाराव्या वर्षी त्याच्यावर राज्याची जबाबदारी पडली. बाबुरला आपले राज्य टिकविण्यासाठी आणि तैमूरलगच्या काळातील साम्राज्य पुनः मिळविण्यासाठी उझबेकमध्ये लढाया कराव्या लागल्या. पण प्रत्येक लढाईत त्याचा पराभवच होत गेला. समरकदवरील दोनही स्वाऱ्यात (१४९८ आणि १५००) त्याने सपाटून मार खाल्ला. अखेर बाबुरने

पलायन केले आणि तो अफगाणिस्तानातील काबुल येथे आला. बाबुरचे राज्य अफगाणिस्तानातही पसरले होते. तो आपल्याच राज्यात असहाय स्थितीत आला होता. नंतर काबुलमध्ये बाबुरने स्वतःचे सैन्य उभारले व बाबुर भारतात उतरला. भारतात त्याने जी मोगल बादशाही स्थापन केली ती दोनशे वर्षे वैभव उपभोगून औरंगजेबानंतर बुडाली बाबुर १५३० साली मरण पावल्यावर त्याचे दफन आग्रा येथे केले, पण नंतर त्याच्या अंतिम इच्छेनुसार काबुलला शव नेऊन बागी बाबुरी (बाबुरची बाग) येथे दफन केले आहे. ज्या अहमदशहा अब्दालीने खैबर खिंडीतून येऊन भारतात विध्वंस केला तो अब्दाली अफगाणिस्तानचा निर्माता समजला जातो। याच खैबर खिंडीत उभे राहून अमेरिकन परराष्ट्रमंत्री श्री शुल्झ यांनी अफगाण निर्वासिताना १९८३ च्या जुलै महिन्यात नव्या साम्यवादी अफगाण सरकारविरुद्ध लढण्याची चेतावणी दिली हे मोठे अन्वर्थक वाटते !

हा भूगोल आणि इतिहास सांगितला तो एवढ्यासाठीच की, उझबेकीस्तानची राजधानी ताश्कंद, तुर्कमेनियाची अश्काबाद आणि किरघिझची फ्रुन्झे ही सुंदर, हिरवीगार शहरे पहात असताना मला वेगळीच जाणीव होत होती जर सोविएत रशियात ही आक्रमक इस्लामी राज्ये सामील झाली नसती व कम्युनिझमने तेथील इस्लाम घराच्या दाराआड नि मशिदीपुरताच मर्यादित करून टाकला नसता तर भारताला या मुस्लिम राज्यांचा केवढा तरी धोका होता ! भारताच्या पश्चिमेला पाकिस्तान अफगणिस्तान इराण-इराक-सिरीया तुर्कस्तान अशी कडव्या इस्लामी राष्ट्रांची रांगच आहे. शिवाय या रांगेच्या दक्षिणेला अरब राष्ट्रांचा जथा आहे भारताची पश्चिम दिशा अशी हिरवी आहे ! पूर्वेलाही बांगला देशाचा इस्लाम आहेच ! जर कॅस्पियन समुद्र आणि चीन यामधील तुर्कमेनिया-उझबेकीस्तान किरझिघ येथे आज मुस्लिम राज्ये असती तर ? भारताच्या पश्चिम आणि पूर्वेप्रमाणे तेथेही हिरवा रंग असता तर ! उझबेकिस्तानच्या बाबुरने जी मोगली राजवट भारतात स्थापन केली ती दोनशे वर्षे भारतावर सत्ता गाजवीत होती, पण ज्या बाबुरने भारतात बादशाही स्थापन केली त्याला उझबेकीस्तानातून पळावे लागले असले लढवय्ये मध्य अशियात होते हेही लक्षात ठेवले पाहिजे. या मध्य अशियातील राज्यात अक्राळविक्राळ वाळवटच आहे. एका शतकापूर्वी पाण्यासाठी रक्त सांडणारा हा टापू होता. तेथील राजांची लोभी आणि इस्लामी आक्रमक नजर भारताच्या सुजला सुफला भूमीवर वखवखत राहिलीच असती यात संशय नाही. बाबर हुमायून-अकबर-जहांगीर-शहाजहान-औरंगजेब यांच्या अमाप ऐश्वर्याच्या कथा त्यांच्या कानात गुणगुणत राहिल्या असत्या अहमदशहा अब्दाली त्यांना आठवत राहिला असता. भारताच्या मस्तकावर ही तलवार सदोदित लटकत राहिली असती आणि पान-इस्लामच्या तोफा या विभागात दणाणल्या असत्या, कारण भारतावर आक्रमणाचा आणि राज्य करण्याचा त्यांना इतिहास आहे। तथापि ही राज्ये सोविएत युनियनमध्ये सामील झाली ही भारताच्या दृष्टीने शुभ घटना आहे.

तेथे संचार करणाऱ्या एकेकाळच्या कडव्या इस्लामी धर्मवेडाचा, महत्त्वाकांक्षेचा जहरी सर्प सोविएत युनियनच्या कम्युनिझमने विषारी दात पाडून खिशात खेळविला आहे. १९१७ नंतर अवघ्या पासष्ट वर्षांत धर्मवेड कबरीत खोल गाडले! कम्युनिझमच्या लाल रंगात इस्लामचा हिरवा रंग मिसळून दिसेनासा झाला आहे. ताश्कंदच्या हॉटेलात मी मध्य आशियातील इस्लामविषयी विचारणा करीत असतानाच समोरच एक वयस्क माणूस बसला होता इस्लामबद्दल त्याला प्रश्न विचारताच तो म्हणाला, " मी स्वतः मुस्लिमच आहे! पण मी प्रथम कम्युनिस्ट आहे! कम्युनिझमची धर्माला आडकाठी नाही, पण मानवी प्रगतीला नि समतेला धर्माचीही आडकाठी होता कामा नये असा कम्युनिझमचा साधा नियम आहे. "

मी त्याला मुद्दामच खोदून विचारले, ' पण इस्लामी लोक धर्मवेडाने माथेफिरू बनतात ना? '

तो उत्तरला, ' धर्म, सत्ता व संपत्ती यासाठी मुसलमान माथेफिरू बनतात हे सदैव लक्षात ठेवा! पण सोविएत युनियनच्या साम्यवादाने धर्म घरात आणि घरापुरताच केला आहे, सत्ता कामगारवर्गाची आहे आणि संपत्ती साऱ्या जनतेची आहे! आता मुसलमान माथेफिरू कशापायी होतील? ते साम्यवादी समतेच्या व प्रगतीच्या प्रवाहात सामील झाले आहेत. '

मध्य आशियात मी सहा दिवस फिरलो व तेथील अद्‌भुत प्रगती पाहिली. पण सोविएत युनियनमुळे भारतावरील केवढे मोठे संकट दूर झाले त्याचीच जाणीव मला सारखी होत होती. आजवर इतक्या लोकांनी इतक्यांदा कॅस्पियन समुद्रापासून मंगोलियापर्यंत प्रवास केला आणि लिहिलेही. मी अनेकांचे लिखाण वाचले, पण ही दृष्टी कुणाच्याच लिखाणात नव्हती याचाही अचंबा वाटला.

हा सर्व ऐतिहासिक, भौगोलिक संदर्भ लक्षात घेतल्यावर सोविएत युनियनच्या अफगाणिस्तानातील प्रवेशाचे आणि काबुलमध्ये इस्लामी धर्मवेड्यांशी लढणाऱ्या रशियन सैनिकांचे आपण स्वागतच केले पाहिजे. अमेरिकेचे हित साधणे आणि राखणे हाच ज्यांच्या बुद्धिवादाचा धंदा आहे त्याचे सोडा, पण भारताच्या दृष्टीने रशियाचे अफगाणिस्तानातील पाऊल अत्यंत उपकारक आहे. साम्यवादामुळे अफगाणिस्तानातीलही धर्मवेड प्रथम घरात आणि मशिदीपुरते बंदिस्त होईल,नंतर नाहीसे होईल आणि ऐहिक प्रगतीची भरभराट होईल. अफगाणिस्तानची सीमारेषा पाकिस्तानला भिडते आणि पाकिस्तानी धर्मवेड्या माथेफिरूपणाच्या छाताडावर अफगाणिस्तानातील साम्यवाद व ऐहिक प्रगती पाय रोवून उभे रहातील पाकिस्तानचे इस्लामी माथेफिरू हुकूमशहा प्रेसिडेंट झिया आज जीवाच्या आकांताने आक्रंदन करीत आहेत ते उगीच नव्हे. त्यांना खुशाल ओरडू द्या. भारताच्या दृष्टीने फार चांगले घडत आहे! रशियातील वृत्तपत्रांत, नभोवाणीवर,

दूरचित्रवाणीवर पाकिस्तानला शिव्याशाप मोजण्यात येत आहेत. कारण अफगाण आणि रशियन सैनिकांवर हल्ला करण्यासाठी पाकिस्तानात अफगाणी लोकांना शिक्षण देण्यात येत आहे, त्यांच्या हाती शस्त्रे दिली जात आहेत.पाठीवर रशियन वाघ आला असल्यामुळे प्रेसिडेंट झियांना बदूक उचलून भारतावर रोखता येणार नाही आणि अमेरिकेशी शस्त्रास्त्र दोस्तीही महाग पडणार आहे. भारताच्या हिताचेच हे राजकारण घडत असताना त्याविरुद्ध 'अमेरिकन आकांत' न करता, इस्लामी धर्मवेड सोवियत रशियाने मध्य आशियात कसे निपटले ते आपण समजावून घेतले पाहिजे. यापुढील लेखात ती किमया सादर केली आहे.

: ३ :

# इस्लामी धर्मवेड असे नष्ट केले

सोविएत रशियाच्या घटनेने प्रत्येक नागरिकाला कोणताही धर्म मानण्याचा, धार्मिक विधी करण्याचा आणि कोणताही धर्म नसण्याचासुद्धा अधिकार दिला आहे. त्याचवेळी बजाव्ले आहे की, धर्म ही सर्वस्वी खाजगी बाब आहे! यामुळे खानेसुमारी, सरकारी फॉर्म, माहितीपत्रके यात नागरिकाला आपला धर्म सागण्याची जरुरी नाही. रशियात मुस्लिम किती याची अधिकृत आकडेवारी कुठेही मिळणार नाही. म्हणजे सरकारी हिशेबात आणि धोरणात धर्माला काहीचेही स्थान नाही! ज्याने त्याने धर्म घरात पाळावा, पण घराबाहेर रशियन नागरिक म्हणून उभे रहावे! कोणत्याही धर्माच्या धुरिणाना कायद्याचे उल्लघन करण्यास आपल्या अनुयायाना सागता येत नाही. नागरी सार्वजनिक कर्तव्ये बजावू नका असे चिथावता येत नाही. सोविएत युनियनच्या कायद्यावर किंवा प्रस्थापित धोरणावर धर्माला कुरघोडी करता येत नाही. धर्म घरापुरताच रहावा यासाठी बारकाईने नजर ठेवणारे एका मन्त्र्याच्या अधिकाराखाली धर्मविषयक बाबींचे एक मडळच आहे

घटनेतील या तरतुदींचा अमल कडकपणे केला जातो आणि त्यामुळे धर्माला घराबाहेर किंवा प्रार्थनास्थळाबाहेर अस्तित्वच रहात नाही. सरकारी धोरणाच्या आड धर्म येऊच शकत नाही. जर कुणी धर्माच्या नावाने सरकारी धोरणाच्या, समतेच्या आणि समान कायद्याच्या आड आलाच तर तो तत्काळ गजाआड झालाच पाहिजे. १९१७ साली रशियात कम्युनिस्ट क्रांती झाली आणि १९२२ मध्ये सघराज्य

(यूएसएसआर) स्थापन झाले. मध्य आशियातील तुर्कमेनिया उझबेक-ताजिक-किरघिज आदि एकेकाळी मुस्लिम राजवटीखालील व मुस्लिम धर्माच्या पगड्याखालील राज्यात तत्काळ संघर्ष सुरू झाला. या सर्व राज्यात निरक्षरता होती मुस्लिम स्त्रिया गोषात होत्या आणि त्यांनी शिकणे हे तत्कालीन धर्मदृष्ट्या महापाप होते. पण कम्युनिस्ट पक्षाचे कार्यकर्ते घरोघरी गेले. त्यांत अनेक महिला होत्या. त्यांनी मुस्लिम स्त्रियाना बुरखा झुगारण्यास लावले शिक्षणासाठी त्याना शाळांत बोलावले. खेडोपाडी जाऊन शिकविणारी मोबाइल स्कूल चालविली. अर्थातच धर्मांध मुस्लिमाचा कडवा प्रतिकार झाला, पण हा कडवा प्रतिकार तितक्याच कडवेपणाने कम्युनिस्ट कार्यकर्त्यांनी मोडून काढला. किर्घिझ रिपब्लीकमध्ये ज्या कम्युनिस्ट मुस्लिम महिला नेत्याचा खून झाला तिचे स्मारक उभे केले आहे उझबेकिस्तानमध्ये मुस्लिम धर्मातील प्रगतीविरोधी कल्पनांवर हल्ला करणाऱ्या कवीचा खून झाला. त्याचेही शानदार स्मारक उभारले आहे. धार्मिक माथेफिरूपणा या स्मारकांखाली गाडला गेला आहे, असे मला ही स्मारके पहाताना वाटले ! रशियाचे क्रमांक दोनचे नेते के. यू. चेरनेन्को यांनी म्हटले आहे की, उझबेकीस्तान राज्यात नव्वद हजार स्त्रियांनी बुरखा झुगारण्यास दहा वर्षे लागली. त्याचा मुल्ला मौलवी व सनातनी यानी पाशवी छळ केला. प्रचारकाना गुरासारखे बडविले अनेकांचा खून झाला पण माघारीचा प्रश्नच नव्हता. चेरनेन्को यांनी सांगितलेले नाही की, दुसऱ्या बाजूला किती रक्तपात झाला ! माथेफिरू मुस्लिमानी ज्या कम्युनिस्टाना ठार केले ते हुतात्मे मानले जातात, पण कम्युनिस्टानी किती माथेफिरू मुस्लिम मारले याचा हिशेब कुठेही मिळणार नाही ! समरकंद, बुखारा, खिवा हे इस्लामी बालेकिल्ले होते. आज इराणात खोमेनी व पाकिस्तानात प्रेसिडेंट झिया जो तथाकथित इस्लामी कायदा अमलात आणून स्त्रियाना गुलाम बनवित आहेत व मध्ययुगीन राजवट चालवित आहेत तोच इस्लामी कायद्याचा वरवटा कम्युनिस्ट क्रांतीपूर्वी बुखारा आणि खिवा येथील मुस्लिम राज्यात फिरत होता पण लाल लष्कराने खिवाची सरंजामशाही इस्लामी सत्ता नोव्हेंबर १९१९ मध्ये उलथून टाकली. मागोमाग बुखारा एमिरेट-मधील एमीरची सत्ता चार दिवसांच्या घनघोर लढाईनंतर मोडून काढली. त्यानंतरही नवीन कल्पना प्रत्यक्षात आणताना अनेक संघर्ष झाले आणि कम्युनिस्टानी लाल लष्कराच्या सहाय्यानेच धर्मवेड आणि मध्ययुगीन कल्पना यांच्यावर विजय मिळविला. हा संघर्ष इतका विकट होता की, नोव्हेंबर १९१७ मध्ये मुस्लिमांसाठी रशियन सरकारने एक खास फतवा काढून आश्वासन दिले होते की, 'तुमच्या श्रद्धा आणि परंपरा, तुमच्या संस्था याना धक्का लावला जाणार नाही. तुमचे धार्मिक हक्क जोपासले जातील.' तसेच रशियन कायदे असताही मुस्लिमासाठी शरीयतचे कायदे. काझींची कोर्टे, मुस्लिम शाळा व मद्राशा यांना मान्यता देण्यात आली. पण त्याच वेळी कम्युनिस्ट प्रचाराची व संघर्षाची तयारी करण्यात आली. नंतर सोविएत सत्ता

भक्कम होताच, धर्माच्या नावाखाली चालू दिलेले वेगळे कायदे, कोर्टे, शाळा याची कबर बांधण्यात आली! त्यांना राष्ट्रीय समानतेत सामील करण्यात आले. एका बाजुला कडव्या कार्यकर्त्यांचा प्रचार, दुसऱ्या बाजूला सत्तेचा वापर आणि त्याच वेळी गरिबापर्यंत पोचणारा विकास असा तीन दिशानी हल्ला चढविण्यात आला. शराफ आर. रशिदोव्ह या प्रख्यात कम्युनिस्ट नेत्याने लिहिले आहे की, 'कुराणाच्या नांवाखालील कर्मठपणा, जुनाट मध्ययुगीन कल्पना, शरियतचे वेगळे कायदे यांना मूठमाती देऊन सर्व नागरिकासाठी समान कायदा, समान वागणूक, खाजगी मालकीचे उच्चाटन, देशभक्ती, स्त्रीमुक्ती या मार्गावर मध्य आशियाई जनतेला नेणे सहजसुलभ नव्हते कम्युनिस्ट पक्ष कार्यकर्त्यांच्या अनेक वर्षांच्या मतपरिवर्तनाच्या प्रयत्नानी ते शक्य झाले.' या प्रयत्नात किती रक्तपात झाला त्याचा तपशील याही लेखकाने दिलेला नाही. पण कल्पना करता येते. गमत अशी की, खिवा, समरकंद बुखारा येथील मुस्लिम राजवटीच्या मध्ययुगीन स्मारकांचे रशियाने जतन केले आहे! तथापि झारशाहीतील राजवाड्याप्रमाणे त्यांनाही दर्शनीय स्थळांचे स्थान असून धर्मकेंद्रे म्हणून कोडीचाही वापर करता येत नाही. शिवाय मध्य अशियात सर्व राज्यांतील लोक येऊन राहिले असून केवळ मुस्लिमांची पॉकेट ठेवलेली नाहीत मुस्लिमांना कर्मठपणे इस्लाम धर्म पाळण्यास प्रथम मुभा दिली, पण त्यानी तसे केल्यास न बोलता त्याना खड्यासारखे सर्व ठिकाणी वेगळे केले जायचे. अर्थात आता कुणी कर्मठपणा करीत नाही. शिवाय नवीन पिढीला व नव्या धर्मपंडितांनासुद्धा प्रथम कम्युनिस्ट तत्त्वज्ञान कसून शिकविले जाते! त्यानंतर धर्मवेडेपणाला वावच रहात नाही विख्यात लेखक रशिदोव्ह म्हणतात, 'स्त्रियांचा प्रश्न मध्यआशियात फार बिकट होता त्या पूर्णपणे निरक्षर होत्या पडद्यात असत. सूर्यप्रकाशही त्याच्या अंगावर अनेक दिवस पडत नसे. त्या आपल्या पतीच्या घरातच डाबलेल्या गुलाम होत्या.' पण आज तेथील स्त्रिया सुशिक्षित असून, डॉक्टर, इंजिनियर, मंत्री, अभिनेत्री, शेतीतज्ञ, पक्ष नेत्या अशा विविध भूमिकात समान हक्काने निर्धास्तपणे कार्य करीत आहेत. एकूण कामगारापैकी पन्नास टक्के कामगार स्त्रिया आहेत. पण त्यासाठी सरकार व कम्युनिस्ट पक्ष यांनी पराकाष्ठा केली मुल्ला मौलवींचा व कर्मठ लोकांचा प्रतिगामी विरोध मोडून काढला. समाजिक विषमता व धार्मिक अलगपणा नष्ट केला. 'टू रीड बिटविन दि लाईन्स असे इंग्रजीत म्हणतात. प्रतिगामी विरोध कसा मोडून काढला त्याचा तपशील रशिदोव्हनी दिला नसला तरी आपण हा तपशील ओळखू शकतो.

ज्या मध्य आशियात शभर टक्के निरक्षरता १९१७ च्या क्रांतीपूर्वी होती तेथे आज जवळजवळ शभर टक्के साक्षरता आहे. स्त्रियांचा गोषा तर गेलाच, पण त्या सुशिक्षित होऊन नोकऱ्या करीत आहेत. मध्य आशियातील भाषाना लिपीच नव्हती

आणि सर्व प्राचीन साहित्य तोंडीच होते, पण खास भाषातज्ञ पाठवून प्रत्येक भाषेसाठी लिपी तयार करण्यात आली. छपाई सुरू झाली. ग्रंथसंग्रहालये दिसू लागली. लेखक कलावंत यांना उत्तेजन देण्यात आले थिएटरे बांधली गेली. नवा जमानाच सुरू झाला.

धार्मिक माथेफिरूपणा हा सर्वत्र पसरलेल्या कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यकर्त्यांमुळे मोडला गेला. अर्थात सरकारचा पाठिंबा कम्युनिस्ट कार्यकर्त्यांना होताच, पण केवळ सरकारी फतव्यांनी हा माथेफिरूपणा आटोक्यात येणे शक्य नव्हते. कम्युनिस्ट पक्षाचे जाळे जिकडे तिकडे पसरलेले होते आणि धार्मिक माथेफिरूंना तोडीस तोड असा कम्युनिस्ट कडवेपणा त्यांच्यात भिनला होता. धर्माला प्रगतीच्या आड येऊ देणार नाही ही घटनेतील तरतूद त्यांनी अमलात आणली. एकादुसरा हमीद दलवाई हे काम करू शकत नाही, पण पूर्ण सरकारी पाठिंबा असलेल्या हजारो हमीद दलवाईपुढे धर्मवेड टिकाव धरू शकत नाही. किर्गिज रिपब्लीकच्या शिक्षण मंत्री आज एक मुस्लिम महिला आहेत. त्या मला म्हणाल्या की, ' मी त्या बिकट काळातच शिक्षण घेतले ! पण तो बिकट काळ म्हणजे आता इतिहास आहे आज प्रत्येक स्त्री सुशिक्षित आहे व उघडपणे निर्भयपणे वावरत आहे. आता त्यांना शिकू नका व घराबाहेर पडू नका, असे सांगणे अशक्य आहे !'

किर्गिज रिपब्लीकची राजधानी फ्रुन्झे, उझबेकची ताश्कंद आणि तुर्कमेनियाची अश्काबाद येथील रस्त्यात मी तासन् तास फिरलो. मुस्लिम स्त्रिया रुबाबात फिरत होत्या त्या विविध पदांवर काम करीत होत्या हे सर्व चित्र पाहून खात्री पटली की, मध्ययुगीन सरंजामशाही समाजाला आणि धार्मिक प्रतिगामी कर्मठ समाजाला झपाट्याने आधुनिक युगात आणायचे असले तर आधुनिक विचारांनी तितकेच कडवे बनलेले पक्षीय कार्यकर्ते हवेत व त्यांच्यामागे सरकार सैन्यासह उभे हवे. जर पक्ष मजबूत नसेल तर एकटा पुरोगामी हुकूमशहा काही करू शकणार नाही. तो लष्कराच्या जोरावर समाजाला दडपू शकेल, पण बदलू शकणार नाही आणि त्यामुळे तोच एक दिवस उखडला जाईल. भारताच्या सातपट ज्या देशाचा विस्तार आहे अशा सोवियत युनियनमध्ये कम्युनिस्ट पक्षाचे जाळे पसरले असल्याने आणि मार्क्स लेनिनच्या विचारांनी कार्यकर्ते तितकेच कडवे बनले असल्यामुळे सरकारी पाठिंबा लाभताच लढा देऊन कायापालट होऊ शकला. दुसऱ्या महायुद्ध काळात हिटलरच्या सैन्याचे कॉकेशसजवळील तातारांनी म्हणजे मुस्लीम लोकांनी स्वागत केले. या तातारांचे सात शतकापूर्वी मॉस्कोवरही राज्य होते आणि त्यांचे स्वप्न तसेच धर्मवेड संपले नव्हते ! पण युद्ध जिंकताच स्टालिनने या सर्व तातारांना उचलून सैबेरियात नेऊन सोडले ! देशहिताआड धर्म अथवा महत्त्वाकांक्षा आली की, कसलीही गय न करणारे रशियन सरकार आहे.

एका हातात कम्युनिस्ट सत्तेचा हातोडा आणि दुसऱ्या हातात कम्युनिस्ट प्रचाराचा विळा या दोन आयुधानी इस्लामी धर्मवेड साफ मोडले आहे. सोविएत युनियनने मशिदी तोडलेल्या नाहीत–त्या जगाला दाखविण्यासाठी सुरक्षित ठेवल्या आहेत! ताश्कदमध्ये तर खलिफा ओथमन याने लिहिलेली कुराणाची पवित्र प्रत मशिदीत ठेवलेली आहे! पण मुस्लिम धर्मपंडितांना बुखारा येथील मिर-अरब मद्राशा येथे आणि ताश्कदमधील इमाम अल-बुखारी धर्मशाळेत सहा वर्षे शिकावे लागते तेव्हाच मान्यता मिळते. तेथे धर्माखेरीज तत्त्वज्ञान, इतिहास, भूगोल, रशियन भाषा आदि विषय शिकावेच लागतात. सांगायलाच नको की या सहा वर्षांच्या अभ्यासात मार्क्सवादी दृष्टीकोन धर्मपंडिताच्याही मनात बिंबविला जातो! धर्माची जागा कोणती ते शिकवून मगच धर्मपंडित होऊ देण्याचा हा रशियन रस्ता आहे!

ज्या उझबेकिस्तानच्या बाबुरने भारतात मोगली साम्राज्य स्थापन केले त्याच्यावरील एक पुस्तक मी ताश्कदमध्ये घेतले. त्यात बाबुरच्या लढायांचे वर्णन नव्हते. त्या काळात मध्ययुगीन सरदारांच्या नि राजांच्या लढाया चालत, त्यांची वैभवशाली राज्ये निर्माण होत व बुडत, पण त्यांचे वैभव केवळ त्यांच्यापुरतेच होते आणि प्रजा निरक्षर, दरिद्री अनाथ होती हे सांगण्यावरच त्यात भर होता. बाबुरच्या लढायाऐवजी त्याच्या कलाप्रेमालाच भरपूर महत्त्व दिले होते. लेनिनग्राडमध्ये कॅथेराईन राणीचा अस्सल सोन्याच्या शिल्पाकृतींनी शृंगारलेला, ज्याचे वर्णन करता येणार नाही असा वैभवशाली भव्य राजवाडा मी पाहिला. त्यातील अप्रतिम कलाकृती बघितल्या. पण त्याबाबतच्या ग्रंथात लिहिले होते – ‘कॅथेराईन राणीचा हा वैभवशाली राजवाडा फक्त तिच्यासाठीच होता. खुद्द कॅथेराईन राणीच एकदा म्हणाली होती की, हे वैभव फक्त मी व उंदीर यानीच पाहिले आहे! तथापि ऑक्टोबर १९१७ च्या क्रांतीनंतर राजवाडा प्रत्येक नागरिकाला पहाण्यासाठी खुला झाला आहे। ‘विंटर पॅलेस जनतेचा झाला असून आता राष्ट्राची संपत्ती बनला आहे!’ अशा प्रकारे मध्ययुगीन इतिहासाची वैभवशाली स्मारके सोविएत रशियाने नष्ट केलेली नाहीतच, उलट ती जशीच्या तशी जतन करण्यावर अमाप खर्च केला आहे. पण त्याचे दर्शन घडवितानाच, सर्व वैभव फक्त राजांचे होते, प्रजा दरिद्र्यस्त होती आणि क्रांतीनंतर सर्व वैभव जनतेचे झाले आहे याकडे लक्ष वेधले आहे.

एका हातात कडवा कम्युनिस्ट प्रचार आणि दुसऱ्या हातात तलवार याद्वारे धर्माचा पगडा आणि पूर्वकालीन मुस्लीम राजेशाही वैभवाचे आकर्षण सोविएत रशियाने नाहीसे केले आहे. याच वेळी नियोजनबद्ध अशी अफाट आर्थिक प्रगती साधली असून त्यामुळे गरिबी नष्ट झालेले नव्या पिढीतील युवक नव्या युगाशी मनापासून समरस झाले आहेत. कम्युनिस्ट पक्षाचे कार्य आणि प्रचार यामुळे धार्मिक

माथेफिरूपणाला तोंड वर काढता आले नाही, पण लोकांपर्यंत पोचलेल्या अफाट प्रगतीमुळे हा माथेफिरूपणा आता खोलवर पुर गेला आहे. मशिदी अनेक आहेत, चर्च आहेत पण तेथे जाणाऱ्यांची संख्या नगण्य आहे मॉस्कोत क्रेमलीनसमोरच्याच हॉटेलात मी चार दिवस होतो क्रेमलीनसमोरच एक प्राचीन चर्च आहे पण लक्ष ठेवूनही चर्चमध्ये जाणारा कुणी आढळत नव्हता. हजारो लोकांची गर्दी लेनिनची शवभूमी पहाण्यासाठी चर्चजवळच सतत उभी असे! अनेक चर्चेस ही सरळसरळ म्युझियम बनली आहेत. रशियात विविध धर्मांची प्रार्थनास्थळे आहेत पण ती सारीच जणू म्युझियम बनविलेली आहेत 'इस्लाम खतरेमे अशी जर मशिदीत कुणी आरोळी ठोकली तर त्याला सैबेरीयात फेकले जाईल! त्याला रशियन समाजात रहाणेच शक्य होणार नाही.

याच मबघात एक आश्चर्यकारक प्रकार मी पाहिला. रशियात चार्लस डार्विन या उत्क्रांतिवादाच्या जनकाचा पुतळा मी पाहिला! एका विदेशी शास्त्रज्ञाचा मॉस्कोतील पुतळा पाहून मी चकित झालो असतानाच माझ्याबरोबर असलेला मार्गदर्शक ओलेग स्मिरनोव्ह म्हणाला, 'डार्विनच्या उत्क्रांतीवादाचे एक खास प्रदर्शनही आहे!' बरोबरच आहे, ईश्वराने एक दिवस मानव प्राणी निर्माण केला असे खिस्ती धर्मगुरु सांगतात, पण डार्विनने साधार शाबित केले की, अब्जावधी वर्षे प्राणीमात्राची उत्क्रांती होत माकड निर्माण झाले आणि माकडाची उत्क्रांती होत माणूस निर्माण झाला! डार्विनचा सिद्धांत हा धर्मग्रंथांना खोटे पाडणारा असल्याने डार्विनवर देशो-देशींचे धर्मपंडित तुटून पडले आणि आजही डार्विनला ते धिक्कारतात. पण रशिया फुले डार्विनवर उधळतो आहे........

: ४ :

# भयाण वाळवंटातील मासेमारी !

पंचवार्षिक योजना ही रशियाची जगाला देणगी आहे. भारताने पंचवार्षिक योजना आखून सुनियोजित विकासाची कल्पना रशियाकडूनच घेतली आहे. तथापि रशियन नियोजनाला भव्य यश लाभले, तर भारताला तुलनेने फारच अल्प लाभ झाला. रशियाचा विकास प्रत्यक्ष पहाताना त्याचे कारण अगदी स्पष्ट होते. रशियात खाजगी मालकीच नष्ट केली असल्याने आणि रशियन सरकारचे सर्वत्र शंभर टक्के नियंत्रण असल्याने योजना धडाक्यात पार पडली जाते. याउलट भारतात घेडगुजरी कारभार झाला आहे. सरकारने एखादा प्रकल्प पार पाडायचा ठरविले तर खाजगी मालकीचे व हितसंबंधाचे हक्क आड येतात आणि सन्माननीय कोर्टे मनाई हुकूम शेकड्यांनी देत रहातात. याउलट खाजगी व्यक्तीने काहीही करायचे ठरविले तर सरकारच्या शंभर परवानग्या मिळविण्यातच वेळ जातो. शिवाय नियोजनाचा फायदा भांडवलदारच उठवितात आणि महागाई वाढून गरीब मात्र नागविले जातात. सध्याच्या अशा संमिश्र अर्थव्यवस्थेत पायात पाय अडकून राहिल्याने व भांडवलवाल्यांच्याच पथ्यावर सरकारी योजना पडल्याने भारताची झपाट्याने प्रगती होत नाही— फक्त लाचलुचपत आणि भ्रष्टाचार झटपट वाढत आहे !

रशिया दर्शनानंतर मला असे मनोमन वाटले की, शास्त्रीय ज्ञानात सतत होणारी अफाट वाढ, विकासाची विलक्षण वेगवान स्पर्धा आणि अति प्रचंड प्रकल्पाची, कारखान्याची, यंत्राची आवश्यकता यामुळे एका टोकाला गेल्याशिवाय

भारत अन्य राष्ट्रांशी बरोबरीने उभा राहू शकणार नाही! सरकार आणि खाजगी हितसंबंध यांनी एकमेकांच्या पायात पाय अडकवून, जगाच्या वेगाने भारताला प्रगती करता येणार नाही.

रशियन नियोजनाचे वैशिष्ट्य कोणते? कोणत्याही प्रकल्पाची राष्ट्रीय दृष्टि-कोनातूनच अत्यंत बारकाईने आखणी केली जाते. दूरगामी परिणामाचा विचार केला जातो. प्रकल्प पार पाडण्याचे वेळापत्रक तयार होते साधनसामुग्रीची व्यवस्था होते. त्यानंतर तो प्रकल्प साकार करण्याचे काम सर्वस्वी तज्ञाच्या हाती दिले जाते. या तज्ञाच्या कामात कुणालाही ढवळाढवळ करता येत नाही खाजगी मालकीच नसल्याने जमीनमालक आडवे येण्याचा सवालच नाही. धर्म हा घरापुरताच असल्याने प्रार्थनास्थळही आडवे येऊ शकत नाही! योजनेच्या काळात मानवी अडथळे येऊच शकत नाहीत! योजनेचा फायदा फक्त मूठभर व्यक्तींनाच मिळत नाही, कारण सर्वच उत्पादन राष्ट्राचे असते. रशिया आज अमेरिकेशी स्पर्धा करीत आहे. सर्वत्र प्रचंड प्रकल्प उभे होत आहेत. केवळ भारताच्या दृष्टीने पहाता काराकुम योजना अत्यंत चित्तथरारक आहे, कारण पाण्याचा किती उत्तम उपयोग होत आहे त्याचे हे जागतिक विक्रमाचे चित्र आहे. तुर्कमेनियाच्या महाभयंकर वाळवंटात ही योजना पार पडली आहे. ग्रेट ब्रिटनमधील ईस्ट इंडिया कंपनीच्या एका संशोधकाने तुर्कमेनियाच्या काराकुम वाळवंटातून प्रवास केल्यावर लिहिले—" मानवाची वस्ती जेथे कधीही करू नये असा हा भयाण टापू आहे. भारतात व इतरत्रही वाळवंट आहे, पण तेथील लोकानाही काराकुम वाळवंटाच्या भीषणतेची कल्पनाही करता येणार नाही!" या भागात पाण्याच्या थेंबासाठी लोक पडत असत. मध्य आशियातील अशा वैराण राज्यामध्ये अमूर दर्या ही सर्वांत मोठी नदी आहे. तिचे पाणी अरल समुद्रात वाहून जाते या नदीचे पाणी फिरवून वाळवंटातून नेण्यासाठी तेराशे किलोमीटर म्हणजे मुंबई—दिल्ली अंतराएवढा अफाट लांब कालवा तुर्कमेनियाचे वाळवंट आरपार भेदून रशियन तज्ञांनी बांधला आहे. अश्काबाद ही तुर्कमेनियाची राजधानी असून या शहराजवळूनच हा कालवा गेला आहे. त्या कालव्यावर मी गेलो आणि वाळवंटातील नदीसारखा वाहणारा हा कालवा पहातानाच काही लोक तेथे मासे पकडण्यासाठी गळ टाकून बसलेले दिसले! काठावर बेडूक वाळूत उड्या मारताना पाहिले! भयाण वाळवंटातील ही मच्छिमारी म्हणजे एक अद्‌भुत चमत्कारच आहे! या वाळवंटात अजस्र यंत्रे नेणे हासुद्धा भगीरथ प्रयत्नच होता. तेथील महाभयंकर तप्त वाळूत काम करणेही कामगाराला शक्य नव्हते. म्हणून एक तास काम करताच तेवढाच वेळ शीतल हवेत विश्रांतीसाठी कृत्रिम केंद्रेही उभारावी लागत. तरीही ठरलेल्या मुदती-पूर्वीच सर्व काम करण्यात आले. योजना आखतानाच पूर्ण विचार केलेला असल्याने कुठेही अडथळा आला नाही. फक्त तांत्रिक प्रश्न उपस्थित होत असत तेव्हा वैज्ञानिक

मात करीत. जल वाहतुकीला उपयोगी पडेल अशी कालव्याची रचना केली आहे. जेथे पाण्याचा थेंब नव्हता तेथे पाणी मैलोन् मैल वहात आहे. जेथे हिरवा रंग माहीत नव्हता तेथे हिरवीगार वृक्षराजी डोलत आहे. भाज्या फळे कापूस याची पैदास होत आहे. वाळवटात शेती मच्छीमारी आणि जल वाहतुक सुरू झाली आहे. कालवा बांधताना आपोआपच रस्त्याचे जाळे पसरले आहे. हा कालवा कॅस्पियन समुद्रावरील कास्नोव्होडस्कपर्यंत नेण्यात येत असून अरल समुद्रात जाणारे पाणी वाळवंट भिजवून कॅस्पियन समुद्राला मिळणार आहे!

मध्य आशियातील राज्यात पाणी खेळवून जशी पिके घेतली जात आहेत त्याचप्रमाणे वाळवटातून तेल व गॅस याचे साठे हुडकून काढण्यात येत आहेत. यामुळे मोठमोठे वीज प्रकल्प, पेट्रो केमिकल कारखाने, त्यासाठी लागणारी यंत्रे तयार करणारे कारखाने उभे केले आहेत. प्रचड पाइप लाईन टाकून मॉस्को आदि परिसरात मध्य आशियाई तेलाचा व गॅसचा पुरवठा होत आहे. या कालव्याच्या प्रमुख तंत्रज्ञांशी माझी अर्धा तास बातचीत झाली. त्यानी सांगितले की, काराकुमसारख्या सर्वांत भयकर वाळवटातून कालवा बांधल्यानंतर आता आम्ही कोणत्याही वाळवटात असा कालवा बांधण्यास सज्ज आहोत.

बोलता बोलता ते म्हणाले की, 'सैबेरियातील नद्याचे पाणी फिरवून मध्य आशियात आणण्याच्या योजनेचाही विचार सुरू आहे. पण योजनेबाबत बऱ्याच अंगांची पाहणी करावी लागणार आहे.'

'आपल्या भागातील नदीचे पाणी मध्य आशियात नेणार याला सैबेरियातील स्थानिक जनतेचा विरोध असेल?'

या प्रश्नाचे त्या तज्ञाला आश्चर्य वाटले त्यांनी सांगितले, असा प्रश्न निर्माण होत नाही. जी संपत्ती निर्माण होते ती सर्व राष्ट्राची असते.समान काम करणाऱ्याला, मग तो कुठेही असो, समान वेतन असते आणि राष्ट्रीय संपत्ती वाढली की, सर्वांचेच वेतनमान वाढते! एकाद्याच ठिकाणचे किंवा एकाद्या शेतातील अथवा एकाद्या कारखान्यातील कामगारांचे वेतन वाढत नसते! तेव्हा व्यक्तिगत किंवा प्रादेशिक हितसंबंधाचा आमच्या देशात प्रश्नच नाही. सैबेरियातील परिस्थितीमुळे तेथील नदीच्या पाण्याचा उपयोग होत नाही म्हणून जिथे गरज आहे व उपयोग आहे तिथे ते पाणी न्यायचे आणि फायदा होईल तो साऱ्या राष्ट्राला मिळायचा.'

'मग प्रश्न कोणते आहेत!

'प्रश्न हा आहे की,त्यामुळे इकॉलॉजिकल इम्बॅलन्स निर्माण होईल काय? नैसर्गिक समतोल ढळला तर त्याचे दीर्घकालीन परिणाम काय होतील? अशा दीर्घकालीन परिणामांचा विचार सुरू आहे. असे परिणाम टाळण्याचा मार्ग निघाला की, सैबेरियातील नदीचे पाणीही मध्य आशियाच्या वाळवटात खळाळू लागेल.'

खाजगी हितसंबंध नष्ट झाले तर सर्वंकष दीर्घकालीन नियोजन कसे केले जाते आणि पूर्ण शास्त्रीय विचारानंतर बेफाट कल्पना धडाक्याने कशा साकार होतात ते काराकुम कालवा सांगतो. गंगेच्या पाण्याचा मिलाफ कृष्णा-कावेरीशी करण्याचे स्वप्न भारतातही आहे. पण प्रत्येक फर्लांगावर जमीनमालक मनाई हुकूम आणणार, प्रादेशिक हितसंबंध आडवे येणार, पक्ष कार्यकर्ते आपल्या गावाजवळून पाणी आणण्यासाठी धडपडणार आणि योजनेचा नकाशा मिळाला की, जिथून कालवा जाणार तेथील जमिनी काळाबाजारवाले खरेदी करीत सुटणार.. मग कालवा कसा व्हावा ? आजच्या स्थितीत फिरकीच्या तांब्यातूनच गंगेचे पवित्र पाणी इतरत्र न्यावे लागणार आणि ते डोळ्यांना लावून माणसे पवित्र होणार !

: ५ :

# रशियातील कामगारवर्ग

रशियात कामगार वर्ग, स्त्रिया आणि मुले तसेच विद्यार्थी यांचा अमाप फायदा झाला आहे. कामगाराला राहण्यासाठी जागा–अपार्टमेंट–जवळजवळ विनामूल्य मिळते. मुलांचे शिक्षण मोफत व सक्तीचे असते. हॉस्पिटलमध्ये उपचार अत्यंत उत्तम आणि मोफत होतात लेनिनग्राडमध्ये मला एक मध्यमवयीन भारतीय गृहस्थ भेटले. अमेरिकन स्कॉलरशिप मिळवून ते तीन महिन्यांच्या फिशरीजच्या अभ्यासक्रमासाठी रशियात आले होते ! त्यांनी सांगितले की, 'मी आजारी झालो आणि घाबरलो. हॉस्पिटलला फोन केला. दहा मिनिटात त्यांची गाडी आली. मला हॉस्पिटलमध्ये दाखल करून लगेच हॉस्पिटलचे कपडे देण्यात आले. सर्व अद्ययावत उपचार सुरू झाले. आठ दिवसात मी बरा झालो आणि घरी जातो असे सांगितले. पण त्यांनी परवानगी दिली नाही. पुनः सर्व तपासणी झाली पूर्ववत होईपर्यंत आणखी आठ दिवस विश्रांती घ्यायला लावली. शेवटी मी पूर्ण घट्टाकट्टा झाल्याची डॉक्टरांची खात्री पटल्यावर मला घरी पोचविण्यात आले. हॉस्पिटलात खाणेपिणे उत्तम होते. करमणूक साधने होती. मला रोज विशिष्ट व्यायाम करायला लावीत असत व तोच व्यायाम पुढे करीत रहा असे सांगण्यात आले. कुणी व्यायाम चुकवू नये म्हणून व्यायामाची शिफारस केलेल्या सर्वांना एकाच वेळी व्यायाम करावा लागे ! मी भारतात माझ्या ओरिसातील घरी असतो तर कमीत कमी दहा हजार रुपये खर्च आला असता.' अशी ही हॉस्पिटले आहेत.नाममात्र भाड्याने रहायला जागा, मुलांचे

मोफत शिक्षण आणि वैद्यकीय उपचार कामगाराला हक्काने लाभतात. सुटीत पर्यटन-स्थळी जाऊन येण्याचा बराच खर्चही कारखान्यातील ट्रेड युनियन करते. या सर्व सोयीं-व्यतिरिक्त पगार कमीत कमी ९० रुबल (सुमारे १२०० रु.) झाडूवाल्याला मिळतो! कामगाराचा पगार सर्वसाधारणपणे १७५ रुबल (सुमारे २४०० रुपये) असतो खाणेपिणे, कपडालत्ता आणि अन्य चीजा यावर त्याला सर्व खर्च करता येतो, कारण निवाराऔषध–उपचार–शिक्षण विनामूल्य आहे.

खरोखरीच रशियन कामगाराला चिंता कसलीच नसते! त्याची बायकोही नोकरी करीत असते. दोघाची कमाई तीनचार हजार रुपये होते. नोकरी कशी मिळेल या चिंतेचा प्रश्नच नाही, कारण प्रत्येकाला नोकरी द्यायलाच लागते. विकास इतका झपाट्याने सुरू आहे की, माणसे कमी पडतात. आपल्यानंतर बायकामुलांचे काय होईल याची काळजी कुणालाच नाही, कारण बायकोला नोकरी असते व शिक्षण पूर्ण केल्यावर मुलाला नोकरी लागतेच लहान मुलांसाठी नर्सरी-किंडरगार्टन पाळणाघरे असतात. तेथे मुलांची केवळ सोयच नव्हे तर त्यांचा बडेजाव असतो. खाणेपिणे, खेळणी, खेळ, शिक्षण या साऱ्यांची रेलचेल! रशियात सर्वत्र समानता आहे, पण मुलांना मात्र अधिक हक्क बहाल करून रशियाने समतेचे तत्त्व तोडले आहे! स्त्री-पुरुष घरी परतताना मुलाला घेऊन जातात आणि मग त्या मुलाचे लाड घरी सुरू होतात. रशियात सरकार मुलांना ताब्यात घेते असाही समज भारतात आहे, पण तो हास्यास्पद आहे कुटुंबव्यवस्था उत्तम आहे शनिवार-रविवार सारे कुटुंब मजेत सहल करीत असते.

रशियन कामगाराला कसलीच चिंता नाही असे मी म्हटले, पण एका बाबतीत त्याला सतत दक्ष रहावे लागते कामात कसूर बिलकूल खपवून घेत नाहीत! जर का काम नीट केले नाही आणि त्याला कामावरून काढून टाकले तर तो जाणार कुठे? कारण कुठेही गेले तरी सरकारीच नोकरी आणि ओळख-पत्रातील नोंद पाहिल्यावर त्याला नवी नोकरी मिळणार नाही! शनिवार-रविवार सुटी आणि कामाच्या दिवशी रोज आठ तास काम असते आणि या काळात बिलकूल कामचुकारपणा चालत नाही. याचा अर्थ असा नव्हे की, त्याच्यावर सारखी सुपरवायझरची नजर असते. लक्ष ठेवायला कुणीच सतत नसतो. पण वरिष्ठ केव्हाही येईल आणि जर कामचुकारपणा आढळला तर गय करणार नाही हे त्याला माहीत असते. शिवाय कारखान्यासाठी उत्पादनाचे जे उद्दिष्ट असते ते पार पाडून आणखी उत्पादन केले तर कारखान्यातील ट्रेड युनियनच्या अखत्यारीत असलेल्या कामगार कल्याण निधीला अधिक रक्कम मिळते व कामगाराला बोनस मिळतो. यामुळे कारखान्याच्या डायरेक्टरपेक्षाही ट्रेड युनियन नेते व कामगारच भरपूर उत्पादनासाठी आतुर असतात. कामचुकाराची गय कुणीच करीत नाही.

जे काम सतत केल्यास एकजण करू शकतो त्या कामासाठी भारतात दोनतीन माणसे असतात. पण रशियात एकच माणूस असतो! कामगारांना इतके लाभ द्यायचे तर त्यांनी भरपूर काम केलेच पाहिजे असे सर्वांचेच म्हणणे आहे. काम भरपूर होण्याच्या आड जी उणीव येते त्याबाबतच ट्रेड युनियन भांडण करते किंवा मागणी करते. तेथील ट्रेड युनियन पगारवाढीच्या मागण्या करीत नाही, कारण पगार राष्ट्रीय पातळीवर ठरलेला असतो. समान कामाचा पगार सर्वत्र समान—मग मॉस्को-लेनिनग्राड असो किंवा ताश्कद-अश्काबाद असो. किंबहुना मध्य आशिया, सैबेरिया येथे काम करणाऱ्यांना अधिक पगार दिला जातो. यामुळे मॉस्कोत बदलीसाठी लोक धडपडत नाहीत!

कामगाराचा दररोज प्रवासात जास्तीत जास्त एकच तास गेला पाहिजे याबाबत सरकार फार जागरूक आहे. भुयारी रेल्वे ( ज्याला मेट्रो म्हणतात ), ट्रॉली बसेस, ट्राम, टॅक्सी आदि वाहतूक साधने आहेत. बस व ट्राममध्ये कंडक्टरच नसतो रेल्वे स्टेशनवर तिकीट चेकर नाही व तिकीट देण्याच्या खिडक्या नाहीत. अंतर कितीही असो, भाडे एकच असते. जो तो नागरिक बसमध्ये बसल्यावर तेवढे नाणे पेटीत टाकून आपले तिकीट घेतो. लोकल रेल्वेसाठी एकच भाडे आहे. यंत्रात पांच कोपेक टाका आणि कुठेही जा. रेल्वे स्टेशनात जाण्यासाठी दरवाजा असतो व दरवाजाजवळ एक यंत्र असते. त्यात नाणे टाकून स्टेशनात गेल्यावर कुठेही जा, पण जर नाणे टाकले नाही तर दरवाजाजवळ पोचेपर्यंतच एक लोखंडी बार खाडकन पडतो! सुट्या नाण्याचीही काळजी नको, कारण स्टेशनवर सुटी नाणी देणारी यंत्रे बसविलेली असतात. गाड्या झपाट्याने येतात-जातात. स्टेशनवर थोडीफार गर्दी फक्त ऑफिस सुटण्याच्या वेळी असते, पण कसलाही गलका नसतो. गाडी सुरू होण्यापूर्वीच दारे बंद होतात व स्टेशन येण्यापूर्वी कोणते स्टेशन येत आहे ते दर डब्यात ऐकविले जाते! तिकीट घ्यायचे नाही आणि स्टेशनातून बाहेर पडताना द्यायचेही नाही! भुयारी रेल्वेची स्टेशने म्हणजे स्वच्छ सुंदर विस्तृत महालच असतात. प्रत्येक स्टेशनाचे आर्किटेक्चर वेगळे आणि फार आकर्षक असते. एखाद्या थिएटरात आल्यासारखेच प्रत्येक मेट्रो स्टेशनात वाटते.

मी चार कारखाने पाहिले त्यातील लेनिनग्राडचा कारखाना सर्वात महत्त्वाचा होता. या कारखान्याचा डायरेक्टर, ट्रेड युनियन नेता आणि कम्युनिस्ट पक्षनेता ठरलेल्या वेळी बातचीत करायला उपस्थित होते. त्यांच्याशी खुली प्रश्नोत्तरे झाली. त्यातील काही मुद्दाम देत आहे—

प्रश्न—तुम्ही ट्रेड युनियन नेते आहात. कामगार तुम्हाला निवडून देतात. तेव्हा त्यांच्यात लोकप्रिय होण्यासाठी तुम्ही त्यांच्या कामचुकारपणाकडे दुर्लक्ष करीत असणारच—

उत्तर--आमच्याकडे धंदेवाईक ट्रेड युनियन लिडर नसतात! ट्रेड युनियन लिडर त्या कारखान्यातीलच असतो. मी स्वतः मेकॅनिकल इंजिनियर आहे आणि ट्रेड युनियन नेता म्हणून माझी निवड झाल्यावर आता मला बोनस मिळत नाही! उद्दिष्ट पूर्ण करणे ही डायरेक्टरइतकीच माझी जबाबदारी आहे! मला जर कामगारांनी निवडले नाही तर मी आनंदाने माझ्या मेकॅनिकल इंजिनियरच्या पदावर परत जाईन! ट्रेड युनियन नेता झाल्यामुळे मला वरच्या जागेवर बढती मिळण्याचीही संधी नाही.

प्रश्न—तुम्हाला पगार किती मिळतो?

उत्तर—मला तीनशे रुबल (एक रुबल म्हणजे १३ रु. ९२ पैसे) मिळतात. पण मेकॅनिकल इंजिनियर असताना बोनस व इतर लाभ यामुळे जास्त मिळत.

प्रश्न—तुम्ही व डायरेक्टर यांनी एखाद्या कामगाराला काढून टाकले तर त्याला दुसरी नोकरी मिळणे दुरापास्त आहे. तेव्हा तुमच्या दुष्मनीत आलेल्यावर तुम्ही सूड उगवायचा ठरविले तर--

यावर ते सर्वजण हसत राहिले.मग त्यांनी सांगितले की,बडतर्फीचा निर्णय मी व डायरेक्टर घेत नाही. तीस जणांची कमिटी घेत असते. या कमिटीत निर्णय व्हावा लागतो पण कामचुकारपणा खरोखरीचा असेल तर, उत्पादनाचे उद्दिष्ट गाठण्याची आवश्यकता असल्याने सर्वजणच शिक्षेची शिफारस करतात. एकट्या दुकट्याला राग-लोभ उगविता येत नाहीत. शिवाय बडतर्फीची पाळी क्वचित येते इतर शिक्षांनी काम होते.

प्रश्न-- एकादुसरी शिक्षा सांगा.

उत्तर—बर्फ पडतो त्याच काळात रजा दिली तर ती शिक्षा जबरदस्त असते! सुंदर पर्यटनस्थळी स्वच्छ हवेत रहाण्याचा आनंद उपभोगता येत नाही. पर्यटनाला जाताना ट्रेड युनियन निधीतून खास रक्कम दिली जाते ती थांबविता येते.

प्रश्न–डायरेक्टर अथवा तुम्ही रजेवर जाता तेव्हा खास बंगला मिळत असेल ना?

यावर डायरेक्टर म्हणाले की, मी गेल्याच आठवड्यात रजेवरून आलो. मी जेथे गेलो तेथे माझ्या शेजारीच माझ्याएवढ्याच जागेत आमचा एक कामगार कुटुंबासह रहात होता. फरकच हवा तर एवढाच होता की त्या कामगाराला ट्रेड युनियनने खास रक्कम दिली होती,पण माझा कुणीच विचार केला नाही! यावर सर्वजण पुनः एकदा हसत राहिले.

प्रश्न–डायरेक्टरला फक्त पगार कामगारांच्या दुप्पट मिळतो.इतर सोयी त्याच असतात. मग डायरेक्टर होण्यासाठी एवढे शिक्षण व इतकी जबाबदारी कशाला घ्यायची!

डायरेक्टर– कारण तो मोठा सन्मान आहे. एक कारखाना चालविण्याचा आनंद

आहे महत्त्वाचे निर्णय घेता येतात. अत्युच्च चर्चेत सामील होता येते आणि आगळेच समाधान लाभते. कारखान्याचे उत्पादन उत्तम केले तर किताब मिळतो. देशाचे नेतृत्व जे करतात ते पैशासाठीच करतात काय ? आमच्या मन्त्र्यांपेक्षा आमचे काही कसबी कामगार जास्त मिळवितात. पण देशाचे भवितव्य घडविणे हा वेगळाच आनंद आहे.

रशियातील ही सर्व पद्धती भारतीयांच्या लक्षात यायला कठीण आहे. पण भारतीयांनी एवढे पक्के लक्षात घ्यावे की, तेथे बेकारी बिलकूल नसून प्रचंड विकास पार पाडण्यासाठी लागणारी मानव शक्ती अपुरी पडत आहे. यामुळे ब्रह्मचाऱ्याला तेथे दंड आहे तर दापत्याला तीन मुले झाल्यास खास अनेक सोयी सवलती दिल्या जातात ! बेकारी नाही. काळजी नाही. स्त्री-पुरुष कामगाराला निवारा, औषध उपचार, मुलांचे शिक्षण याबाबत कसलीच चिंता नाही. या व्यतिरिक्त पगार असतो. सर्वजण खाऊन पिऊन धष्टपुष्ट आणि मजेत असतात. मात्र काम चुकविणाऱ्याला आणि शिस्त मोडणाराला त्या देशात जगता येणार नाही.

: ६ :

# सर्वांत मोठा लाभ स्त्रियांचा झाला !

कम्युनिस्ट क्रांतीचा सर्वांत मोठा फायदा रशियातील स्त्रियांना मिळाला आहे घटनेने स्त्रियांना समान हक्क मिळाले आहेतच, पण प्रत्यक्षातही त्यांना खरीखुरी समानता लाभली आहे स्त्रिया सर्व प्रकारच्या नोकऱ्या करतात हॉटेलांत, कचेऱ्यांत स्त्रिया बहुसंख्य आहेतच, पण त्या बस ड्रायव्हर व टॅक्सी ड्रायव्हरही आहेत निर्भय-पणे, रुबाबात फिरत असतात. आपापले काम नीट करीत असतात. दुसऱ्या महा-युद्धात दोन कोटी रशियन जवान ठार झाले. २२ जून १९४१ रोजी जर्मनीच्या हिटलरने तीन दिशांनी रशियावर स्वारी केली आणि या युद्धात सर्वांत मोठी किंमत रशियानेच मोजली. त्याच्याही परिणामी स्त्रियांना अनेक नागरी कामे करावी लागली आणि आता नागरी नोकऱ्यांत त्या आघाडीवर आहेत. तसेच त्या आर्थिक दृष्ट्या पूर्ण स्वतंत्र आहेत. कुटुंबात एखादे मूल असते. दोन मुले असलेली कुटुंबे कमी आहेत आणि तीन मुलांची कुटुंबे अत्यल्प आहेत. शंभरात एखाद्याच कुटुंबात तीन मुले असतात. किंबहुना सोव्हिएट रशियातील प्रगतीसाठी माणसे कमी पडत असल्याने तीन मुले झाल्यास सरकार खास उत्तेजनपर आर्थिक सहाय्य देते ! तीन मुलांच्या मातेला नोकरीत कमी वेळ काम दिले जाते ! असे हे सरकारी धोरण म्हणजे बेकारी नष्ट झाल्याचाच पुरावा आहे तिथे कामासाठी आणखी माणसे हवी आहेत. मूल एखादुसरेच असते आणि सर्व शिक्षण मोफत असल्याने व शाळेत मुलांना जेवणही मिळत असल्याने घरकाम, मुलाचे संगोपन यात स्त्री अडकत नाही. लहान मुलासाठी नर्सरी, किंडरगार्डन मोफत असतात स्त्री-पुरुष

कामावरून परत येईपर्यंत मुले नर्सरीकिंडरगार्डन येथे एखाद्या युवराजासारखी मजेत असतात. रशियात या युवराजाचे महत्त्व आहे आणि सरकार त्याच्यासाठी जास्तीत जास्त खर्च करते.लहान मुलाना मोठ्या माणसापेक्षा जास्त हक्क बहाल केले आहेत व एवढ्यापुरता समानतेला फाटा दिला आहे! रशियाबद्दल फार मोठा अपप्रचार केला जातो. मुले सरकारजमा होतात हा असाच एक अपप्रचार आहे. ही गोष्ट साफ खोटी आहे. मुलाची किंडरगार्टन नर्सरी येथे बडदास्त असते आणि आईबाप कामावरून परतल्यावर त्याच्यावर प्रेमाचा वर्षाव करीत असतात रोज आठ तास काम आणि शनिवार-रविवार सुटी असते. या सुटीच्या दिवशी मुलांना घेऊन स्त्री पुरुष फिरत असतात व मुलांचे लाड चालू असतात. स्त्रियाना जितकी समता आणि जेवढा दर्जा रशियात आहे, तेवढा दर्जा जगात कुठेही नाही असे शाबित करण्यासाठी सोविएत सरकार सतत प्रयत्नशील आहे.त्यामुळे अवकाशवीर म्हणून व्हॅलेन्टिना तेरेश्कोव्ह हिने १६ जून १९६३ मध्ये अवकाशयानात उड्डाण केले आणि जगातील ती पहिली महिला अवकाशवीर ठरली. ती एअर फोर्समध्ये कर्नल आहे. कम्युनिस्ट पक्षाच्या सेन्ट्रल कमिटीची ती सदस्य आहे. एका मुलीची आई असून तिची मुलगी लीना ही मेडिकलची विद्यार्थिनी आहे. १९ ऑगस्ट १९८२ रोजी स्वेतलाना सवित्स्काया या दुसऱ्या महिलेने अवकाशात उड्डाण केले. ती वैमानिक आहे आणि व्यवसायाने विमानविषयक इंजिनियर आहे. तिला विचारण्यात आले, 'पुरुषाचे कोणते गुण तुला खास महत्त्वाचे वाटतात?' तिने तत्काळ उत्तर दिले, 'पुरुषात व स्त्रियांत गुणवत्ता विभागली आहे, असे मला वाटत नाही. मानवी गुण व अवगुण दोघांतही असतात!' पण व्हॅलेन्टीना व स्वेतलाना या केवळ अपवाद नव्हेत, कारण सुप्रीम सोव्हिएटमध्ये ३२ टक्के स्त्रिया आहेत.

ऑफिसे सुटण्याच्या वेळी जिकडे तिकडे स्त्रियाच बहुसंख्येने दिसतात. त्यांच्या एका हातात पिशवी असते आणि त्यात खरेदी केलेल्या वस्तू घेऊन त्या झटपट घरी चाललेल्या असतात. दुसऱ्या हातात आईस्क्रीमचे कोन किंवा कोणती तरी खायची वस्तू खात त्या जातात. बहुसंख्य स्त्रिया जाडजूड असतात. स्त्री-पुरुष यथेच्छ खात असतात आणि त्यात त्यांची फॅशन कधी आडवी येत नाही. इतर देशात जाड समजली जाणारी स्त्री रशियाच्या रस्त्यात उभी राहिली तर तिला आपण सडपातळ असल्याचे समाधान वाटेल! रशियातील गरिबीचे प्रश्न संपले आहेत आणि सुबत्तेच्या समस्या आज त्यांच्यासमोर आहेत. स्त्रीविरोधी विषमतेचा अन्याय पूर्णपणे संपला आहे, पण आता समतेच्या समस्या उभ्या ठाकल्या आहेत. उदाहरणार्थ, रशियात घटस्फोटाचे प्रमाण अलिकडे भरमसाट वाढले आहे घटस्फोटाचे कारण कोणते! तर घरी आल्यावर निम्मे घरकाम पुरुषाने केले पाहिजे असे स्त्रीचे म्हणणे असते! घटस्फोटाचा दावा बहुधा स्त्रीच सुरू करते! आपापल्या ऑफिसात आपल्या पदापुरती ती सर्वाधिकारी असते आणि घरी नवऱ्यासमोर दुय्यम भूमिका स्वीकारायला

ती तयार नाही. यामुळे दांपत्यांना योग्य सल्ला देणारी अनेक केंद्रे सोव्हिएट सरकारला काढावी लागली आहेत! स्त्रीला घरातही समान हक्क यापुढे पुरुषांनी दिले पाहिजेत असा प्रचार सुरू आहे. घटस्फोटानंतर काय याची स्त्रीला फिकीर नसते तिला नोकरी असते आणि प्रत्येकाला नोकरीचा हक्कही आहे. मुलाचे शिक्षण सरकारी खर्चाने चालते. आजारी पडल्यास सरकारी हॉस्पिटलात उत्तमोत्तम उपचार होतात एकट राहिल्यास समाजात कुणी छेड काढेल अशी बिलकूल भीती नाही, कारण कायदे कडक आहेत. शिवाय नोकरीमुळे वेगळे झाल्यावर रहाण्याच्या जागेची अडचण नाहीच. जागा सरकारला द्यावीच लागते.

स्त्रीचे उपभोग्य वस्तू म्हणून कुठेच चित्रण नसते. तथाकथित स्वतंत्र देशात स्त्रीचे बाजारी दर्शन घडविणारे पोस्टर भिंतींवर असतात. वृत्तपत्रातील जाहिराती व चित्रपट यात तेच मादक तांडव सुरू असते. पण रशियात स्त्रीचे असले चित्रण कुठेच कधीही दिसत नाही. कम्युनिस्ट क्रांतीने स्त्रिया शभर टक्के विमुक्त झाल्या आहेत व त्यांना दर्जा प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. तथाकथित स्वतंत्र देशात स्वातंत्र्याबरोबरच त्या भोगदासी होत असताना व भीतीग्रस्त वावरत असताना रशियात वेगळेच चित्र असते स्त्रियांचा पोषाखही उत्तान भडक नसतो, तर कामगारासारखाच साधा सभ्य असतो. कामगारवर्गाचा फार मोठा आर्थिक फायदा झाला आहे, पण स्त्रियांचा तर सर्वथा लाभ झाला आहे. शिक्षण, आर्थिक कमाई, अधिकार, भयमुक्ती, प्रतिष्ठा व दर्जा या साऱ्याचा त्याना लाभ झाला आहे.

स्त्रिया पुरुषाच्या बरोबरीने आणि भयमुक्त कशा वावरत असतात याचे एक उदाहरणही पुरेसे आहे. मॉस्को विमानतळावर काही इराकी विद्यार्थी आपल्या मित्राला निरोप द्यायला आले होते. त्या प्रचंड विमानतळावर अत्यंत शांतता होती. कुणाची देखरेख नव्हती. हे इराकी विद्यार्थी प्रवाशांच्या विभागात येऊन उभे राहिले तेवढ्यात एक अधिकारी महिला आली व तिने या विद्यार्थ्यांना निघून जायला सांगितले, पण ते हसतच राहिले त्यावर तिने एका विद्यार्थ्याला पकडून सरळ बाहेर ढकलून दिले! हे पहाताच ते सर्वजण चपापून बाहेर गेले व मुकाट्याने थोड्या वेळात दिसेनासे झाले. 'त्यांनी आरडाओरड किंवा टिंगलटवाळी कशी केली नाही? ती महिला तर एकटीच होती!' मी माझ्या शेजारीच उभ्या असलेल्या बागला देशीय विद्यार्थ्याला विचारले. तो उत्तरला, 'ती महिला एकटी नव्हती! सर्व सरकार तिच्यामागे उभे होते! नंतर तो पुढे हळूच म्हणाला, गडबड केली तर या देशात रहाता येणार नाही हे सर्वांना माहीत आहे!' कडक पोलीस बंदोबस्त कुठेच नसूनही धाक सर्वत्र आहे. शिवाय लहानपणापासून समानता आणि श्रमप्रतिष्ठा शिकविल्यामुळे लोकांची प्रवृत्तीही पालटली आहे. जर कुणा भारतीय स्त्रीला कसलीही छेडछाड न होता निर्भयपणे केव्हाही कुठेही संचार करायचा असेल तर तिला रशियाच्या रस्त्यांवरच फिरले पाहिजे!

: ७ :

# रशिया आणि पोलादी पडदा !

सोव्हिएट रशियात पधरवडाभर रोज सोळा तास फिरलो. जिथे जायचे आहे असे सांगितले तिथे मला नेण्यात आले. टूरिस्टांना दाखवितात ती नुसती प्रेक्षणीय स्थळे मला पहायची नाहीत, तर समाजवादी राष्ट्रात माणसाचे काय झाले आहे ते रस्त्यात, कारखान्यात, रेल्वे बसमध्ये, ऑफिसात मला पहायचे आहे असे मी प्रथमच बजावले आणि कुठेही कुणीही आडकाठी केली नाही. खुद्द मॉस्कोत क्रेमलिनच्या लाल भिंतीभोवती मध्यरात्री फिरतानाही कसलीच अडचण नव्हती. लेनिनग्राडमध्ये रात्रीही सूर्यप्रकाश जून जुलैमध्ये असतो आणि आरामात फिरता येते. अशा सूर्यप्रकाशित रात्रींना 'व्हाईट नाईटस' (शुभ्र रात्री) म्हणतात व अशा रात्रीच्या वेळी लेनिनग्राड अधिकच सुंदर दिसते. स्वच्छंदपणे फिरल्यावर शंभर टक्के खात्री झाली की; भारतात इंदिराजींनी 'गरिबी हटाव' चा नारा पुकारला असला तरी 'गरिबी हटाव' याचा अर्थ पहावयाचा असेल तर सोव्हिएट रशियात फिरायला हवे. भिकारी नाही–टाकारी नाही. कुणी फूटपाथवासी नाही किंवा फूटपाथवर माल पसरून कुणी विकणारा नाही. बेकारी बिल्कूल नाही. प्रत्येकाला काम मिळतेच आणि आठ तास काम करावेच लागते. शनिवार–रविवार सुट्टीच्या दिवशी सहलींना जाण्याचा, रंगीत टेलिव्हिजन पहात बसण्याचा, असा काही ना काही कार्यक्रम लोकांचा ठरलेला असतो. यामुळे रिकामटेकडेपणा नसतोच. रस्त्यावर घोळका करून कुणीही गप्पागोष्टी करीत उभे नसतात. हजारो माणसे पाहिली, पण एकाचाही कपडा फाटका

नाही. कुठे कसला गोंधळ नाही, आरडाओरड नाही, गर्दी नाही. अगणित मोटारी धावत असतात, पण हॉर्न क्वचितच ऐकू येतो. जिकडे तिकडे माणसे कमी आणि झाडे अनेक असतात! गुंडगिरी सोडाच, पण निव्वळ दादागिरी करण्याचा किंवा तरुणीची छेड काढण्याचा प्रकारही दिसत नाही. दारू पिऊन शिमगा करणारा आड-रस्त्यालाही कुणी नसतो कारण एकीकडे प्रत्येक नागरिकाला–स्त्रीला व पुरुषाला–मोफत राहण्याची जागा, विनामूल्य औषध उपचार, मुलांना मोफत शिक्षण आदि सोयींखेरीज भरपूर वेतन दिले जाते आणि त्याच वेळी कामचुकारपणा किंवा बेशिस्त किंवा गुंडगिरी केली तर कसलीच गय केली जात नाही! रस्तोरस्ती पोलीस नसतात, पण गुन्हा केला तर आपण सुटू शकत नाही याची प्रत्येकाला खात्री असते. विविध प्रमुख रस्त्यावर गस्त घालणारी कम्युनिस्ट पक्षाची अधिकृत पथकेही असतात आणि काही झाले तर या पथकातील लोक धावून येतात. त्यांच्या अंगाला हात जरी लावला तरी जबर कडक सजा आहे! कुणी तरी पोलिसांना कळवितोच आणि गुन्हेगार पळण्यापूर्वीच पोलीस येतात! नागरिकही गुन्हेगाराला रोखतात, कारण गुन्हेगार जामिनावर सुटून येणार नाही हेही त्यांना माहीत असते. रशियात जामिनाची पद्धतच नाही! खटल्याचा निकाल अल्पकाळात लागून गुन्हेगाराला कडक सजा झालीच पाहिजे. एकदा का कुणी गुन्हेगार पोलिसांचे हाती गेला की गजाआड झालाच.

प्रत्येकाजवळ ओळखपत्र असते. त्याला ते 'पासपोर्ट' म्हणतात. कुणीही पोलिस केव्हाही 'पासपोर्ट' मागतो. त्यावर नाव, पत्ता, काम करण्याचे ठिकाण आणि छायाचित्र असते यामुळे तुम्हाला कुठे पळताच येणार नाही अशी पासपोर्ट पद्धती जर आसाममध्ये असती तर परकी नागरिक आसामात घुसून आज जी समस्या निर्माण झाली आहे ती समस्या उद्भवलीच नसती. प्रत्येक कामगाराचे कार्ड असते आणि प्रत्येक जण नोकरीत असल्याने प्रत्येकाचे कार्ड असतेच. त्यावर त्याच्या पहिल्या नोकरीपासूनचे सर्व टिपण असते. समजा, एखाद्याने आपल्या कारखान्यात चोरी केली तर त्याला सजा होणारच, पण कामावरून काढल्याचे कारण कार्डावर नोंदविले जाणारच. कुठेही गेला तरी सरकारी नोकरी आहे व कार्ड पाहिल्याशिवाय नोकरी मिळणार नाही. यामुळे एकादा गुन्हा केला तर माणूस बरबादच होणार! त्याला कुणी नोकरी दिलीच तरी पहिल्यासारखी नोकरी कधीही मिळायची नाही! शिवाय सर्व सोयी व भरपूर वेतन मिळत असताना असल्या बरबादीची अवदसा कुणाला सुचणार! दारू पिऊन गडबड करणे सोडाच, पण रस्त्याने झिंगत जाणेही फार धोक्याचे असते. एकदा एकजण झिंगत जात असता पोलिसाने त्याला धरले. त्याला नेऊन मारहाण केली नाही. तर एका आलिशान जागेत त्याला ठेवले भरपूर खायला प्यायला दिले. दुसऱ्या दिवशी त्याच्या हातात दोन कागद ठेवले. एक कागद होता त्याच्या-वरील आरोपाचा आणि दुसरा कागद होता खाण्यापिण्याच्या बिलाचा आणि ते बिल

होते भरमसाट पाचशे रुपयांचे ! नंतर कोर्टात तडकाफडकी सजा झालीच, पण शिवाय कार्डावर इशारा नोंदविला गेला ! यामुळे नंतर दारू प्याला तरी पुन्हा तो कधी झिंगायचा नाही. कुणा नगरसेवकाला किंवा पुढाऱ्याला किंवा वरिष्ठांना फोन करूनही उपयोग नाही, कारण पोलिसाने एखाद्याला पकडले तर कुणालाही हस्तक्षेप करण्याचा हक्क नाही—त्याच्या वरिष्ठालासुद्धा ! एकाच्या अधिकारात दुसरा कुणी हस्तक्षेप करीत नसल्याने जो तो आपल्या पदापुरता सार्वभौम ऐटीत असतो. पासपोर्ट व कार्ड पद्धतीमुळे कुणालाही पळणेसुद्धा शक्य नाही. फूटपाथवर रहाता येतच नाही. हॉटेलात गेला तरी पासपोर्ट दाखवायलाच हवा आणि त्यामुळे खोट्या नावाने वावरता येणारच नाही ! माझ्यासमवेत पत्रकार ओलेग स्मिरनोव्ह होता,पण त्यालाही पासपोर्ट दाखवावा लागतच होता त्याच्या ऑफिसात शिरताना व तेथून बाहेर पडतानाही त्याला पासपोर्ट दाखवावा लागत होता. आम्ही मॉस्कोतील हॉटेल सोडताना गमतच झाली. स्मिरनोव्हने कागदपत्र-हिशेब पुरे केले, सामान खांद्यावर नि दोन्ही हातांत घेतले नि म्हणाला, ‘ चला आता.’ मी शांतपणे उभाच होतो. मी म्हटले, ‘ माझा पासपोर्ट तू घेतला नाहीस ! ’ त्याने झटकन सामान खाली टाकून पासपोर्ट घेतला, माझ्याकडे दिला व म्हणाला, ‘ तुम्ही नीट लक्ष ठेवलेत म्हणून बरे.’

मी स्मिरनोव्हला सांगितले, ‘ रशियात सर्व सामान विसरले तरी चालेल, पण पासपोर्ट विसरता येणार नाही ! तथापि येथे समता आहे. माझ्या आंतरराष्ट्रीय प्रवासाचा पासपोर्ट तर सोडाच, पण तुझा पासपोर्ट (ओळखपत्र) जरी हरविला तरी कुठे हलता येणार नाही ’ यावर स्मिरनोव्ह भरपूर हसला, पण स्वतःचा पासपोर्ट नीट असल्याची त्याने पुन्हा खात्री करून घेतली !

सर्व नियम येथे काटेकोरपणे अमलात येतात याचे कारण म्हणजे त्या त्या खुर्चीवरील व्यक्तीला तेथे पूर्ण अधिकार असतात भारताच्या सातपट विस्ताराचा हा देश आहे आणि भारतापेक्षा कितीतरी अधिक केंद्रीय पकड व नियोजन आहे. पण गोंधळ होत नाही, कारण आपापल्या जागेवर प्रत्येक व्यक्ती सर्वाधिकारी असते. कुणाचीही रदबदली चालत नाही ताश्कंद विमानतळावर त्याचे दृश्य मी पाहिले.दहापंधरा इराणी श्रीमंत युवक कस्टममध्ये आपल्या सामानाचे वजन व तपासणी करायला आले. तेथील अधिकारी महिलेने त्यांना सर्व सामान वजनाच्या काट्यांवर ठेवायला सांगताच ते सामान दुरूनच तेथे फेकू लागले. त्या महिलेने बजावले, ‘ पुनः सामान उचला आणि नीटपणे एकेक वस्तू ठेवा. ’ ते युवक गिलका करू लागताच तिने बजावले, ‘ मी सांगते त्याप्रमाणे करा त्याशिवाय तुम्हाला जाता येणार नाही. ’ विमानाला थोडाच वेळ राहिल्याचे सांगत ते ओरडू लागले. धावत पळत वरिष्ठ अधिकाऱ्याकडे गेले. पण कुणीही पुढे आले नाही. मी चौकशी केली तेव्हा समजले की, ती महिला ड्युटीवर असून तिच्या सांगण्यानुसारच वागायला लागेल, नाहीतर

विमान चुकेल असे वरिष्ठांनी सांगितले. शिवाय बजावले की, गडबड करायला जाऊ नका. हा रशिया आहे. कुठे व किती महिने जाल ते सांगता येणार नाही! कोपऱ्यात फक्त एक पोलीस उभा होता! पण आमच्या भारत देशात हैदोस घालणारी ही श्रीमंत इराणी मुले मुकाट्याने एकेक वस्तू वजनाच्या काट्यावर ठेवू लागली. त्या महिलेने शांतपणे आणि कसलीही घाई न करता आपले काम केले व नंतर तिने परवानगी दिल्यावरच धावत पळत मुकाटपणे हे सारे तरुण विमान गाठायला गेले! हीच पद्धत जिकडे तिकडे आहे—

हुद्दा कोणताही असो, जो तो आपले काम अगदी प्रामाणिकपणे करून करीत असतो. प्रत्येकाला कामही भरपूर असते. एकाला करता येईल अशा कामासाठी तीन माणसे तेथे नसतात! जे काम करतात त्यांच्यावर कुणी देखरेख करतानाही दिसत नव्हता. एकतर काम मनापासून केले पाहिजे अशी तेथील माणसाची प्रवृत्ती झालीच आहे, पण त्याच वेळी धाक जबरदस्त आहे. काम नीट केले नाही असे जर अचानक आलेल्या वरिष्ठाने पाहिले किंवा कुणी तक्रार केल्याने पाहणी झाली तर गय होणार नाही हा धाक सर्वत्र आहे. मूलभूत सोयींसह चांगले वेतनमान, लहान-मोठ्या प्रत्येक कामाची प्रतिष्ठा, त्या त्या पदावरील माणसाला सर्वाधिकार आणि निश्चित शिक्षेचा धाक यामुळे प्रत्येक नियम काटेकोरपणाने शिस्तीत पाळला जातो. प्रत्येक गोष्ट योजनेप्रमाणे नीटस पार पाडली जाते.

कुणीही परदेशी नागरिक तिथल्या हॉटेलात गेला की, प्रथम त्याचा आंतरराष्ट्रीय प्रवासाचा पासपोर्ट काढून घेतला जातो. हॉटेल सोडतानाच तो त्याला परत दिला जातो. परदेशी नागरिकाला विमानतळावरच त्याच्याजवळ किती पैसे आहेत ते सांगायला लागते. डिक्लेरेशन फॉर्म भरून घेतला जातो जेवढे पैसे आहेत म्हणून सांगाल तितके मोजून दाखवायला लागतात! रशिया सोडून जाताना पुनः एकदा किती पैसे आहेत त्याचे डिक्लेरेशन करावे लागते. त्यांना वाटलेच तर खर्चाची खातरजमा करून घेतात. हे सारे कशासाठी! तर परकी पैसा आणून आपल्या देशात पेरला जाता कामा नये याबद्दल रशियन सरकार फार जागरूक असते. तसेच रशियातील पैसाही बाहेर जाता कामा नये. किती अरबी पैसा आणि अमेरिकन डॉलर आपल्या देशात येतात याची आपल्याकडे कुणालाच माहिती नसते. रशियात असे काही शक्य नाही. मॉस्कोत टेलिव्हिजन मनोरा प्रचंड आहे. त्या मनोऱ्यात ३२७ मीटर उंचीपर्यंत लिफ्टने जाता येते आणि तेथील फिरत्या हॉटेलात बसून संपूर्ण मॉस्कोचे सौंदर्य पहाता येते, पण हा मनोरा पहायला जाण्याआधी प्रत्येकाचा पासपोर्ट घेतला जातो व परतताना दिला जातो.

रशियात पोलादी पडदा आहे, अमुक ठिकाणी जाता येत नाही किंवा तमुक ठिकाणी मज्जाव असतो, असे अनेक समज भारतात आहेत. रशियात जाऊन आलेले

काही भारतीयही असेच सांगतात, पण त्यात काहीही तथ्य नाही. भारतात कुठेही जा, कुठेही रहा, केव्हाही कुठल्याही इमारतीत शिरा, कुणालाही अपरात्रीसुद्धा भेटायला जा, कुठल्याही कारखान्यात चला असा प्रकार आहे, पण रशियात ते कदापि शक्य नाही तथापि आपल्यासारखाच बेबंद आणि बेशिस्त कारभार तेथे असावा असे म्हणण्यात काय अर्थ आहे? कुठेही रशियात जाता येते, पण पूर्वसूचना देऊन आणि होकार घेऊन मगच जायला हवे! ठाण्याचे एक वकील महाशय शिष्टमंडळातून गेले होते शिष्टमंडळाचा सर्व कार्यक्रम ठरलेला होता.मध्येच ते म्हणाले की,'आपण आता कोर्टात जाऊ या.' तेव्हा त्यांच्या मदतनिसाने नकार दिला. कारण कार्यक्रम ठरवितानाच त्यात कोर्टात जाण्याचा उल्लेख करून घ्यायला हवा,असे तो म्हणाला. ऐनवेळी तोही बदल करू शकत नाही. त्यात काय चूक आहे! जाता जाता सहज कुणाच्या तरी घरी जाणे आणि 'गोविंदराव आहेत काय?' म्हणून ओरडणे ही पद्धत साऱ्या युरोपातच कुठे नाही. जे शिष्टमंडळातून जातात त्यांना कार्यक्रम बदलून घेणेही कठीण जाते यात नवल नाही, कारण अनेकजण असतात. पण तेथील शिस्तीचे गुणग्रहण करण्याऐवजी उगीच ओरड करण्यातच काहीजणांना महत्त्व वाटत असावे! अश्काबाद येथे मी फिरत असता वाटेत एका वृत्तपत्राची इमारत दिसली. तेथे मला जायचे आहे असे सांगताच दुसऱ्या दिवशीची सकाळची वेळ ठरविण्यात आली व त्यावेळी संपादक गफूर माझ्या स्वागताला हजर होते. आगाऊ ठरवून गेलात तर तुमच्या नावाचे प्रवेशपत्र तयार असतेच. त्यानुसार तुम्ही आत गेलात म्हणजे तेथील प्रमुख तुमचे स्वागत करून चहापानाला व चर्चेला नेतात. तिथे जितके चहाचे कप असतात त्यावरून कितीजण त्या हॉलमध्ये येणार आहेत ते नक्की समजते! दोन तास अगोदर सांगताच भेटीची वेळ ठरून मी लेनिनग्राडचा कारखाना पहायला गेलो. स्वागताच्या हॉलमध्ये सहा कप होते. मी स्मिरनोव्हला म्हणालो, 'चौघेजण आपल्या दोघांशी बातचीत करायला येणार!' स्मिरनोव्ह उद्‌गारला, 'कशावरून?' मी ते सहा कप दाखविले, तेवढ्यात डायरेक्टर, ट्रेड युनियन नेता, पक्षनेता आणि एक सहाय्यक ठरल्या मिनिटाला आले. सर्व प्रश्नांना त्यांनी मोकळेपणाने उत्तरे दिली. ठरल्यापेक्षा कुणीही आणखी एखादा माणूस आत शिरला नाही! रशियात पोलादी पडदा नाही, पण पोलादी शिस्त आहे! जितकी सुबत्ता आहे तितकीच शिस्त आहे. त्याचा राग येण्याऐवजी मला तर असे वाटते, की ही शिस्त आमच्याही देशात आवश्यक आहे. 'आव जाव घर तुम्हारा' अशा मुंबईचा जर काही वर्षांनी आसाम होऊ द्यायचा नसेल तर त्यांचीच 'पासपोर्ट पद्धत' येथे आणायला हवी! सुजाण वाचकांनाही असेच वाटले असेल!

: ८ :

# योजकस्तत्र दुर्लभः नाहीतर कोकणात 'ताश्कंद' दिसेल !

रशियातील माणसे आणि भारतातील माणसे यांची बौद्धिक दृष्ट्या तुलना केली तर रशियन लोक निश्चितच सरस ठरणार नाहीत. खरे तर भारतीयच अधिक तल्लख वाटतात. पण रशिया आणि भारत या दोन देशांची तुलना केली तर? अशी तुलनाच करता येणार नाही इतका आज रशिया जबरदस्त सामर्थ्यवान राष्ट्र बनला आहे रशियाची सर्वांत बलाढ्य अशा अमेरिकेशी भयानक स्पर्धा सुरू असून, उभय राष्ट्रे फक्त एकमेकांवरच नजर ठेवून राजकारण करीत आहेत. रशियात भारताबद्दल फार आत्मीयता आहे आणि त्याचे प्रमुख कारण राजकीय आहे. पाकिस्तान व चीन यांची अमेरिकेशी दोस्ती असून रशियाला चहू बाजूंनी घेरण्याच्या राजकारणात अमेरिका याच राष्ट्रांशी दोस्ती ठेवणार ! परिणामी चीन व पाकशी सीमा भिडणाऱ्या भारताची मैत्री रशियाला फार महत्त्वाची वाटत आहे आणि यापुढेही वाटणार आहे महत्त्वाचा मुद्दा हा आहे की, रशियाच्याच हिशेबात सर्व राजकारण आखण्याची अमेरिकेवर पाळी आली इतका रशिया आज बलशाली झाला आहे ! १९१७ साली रशियात कम्युनिस्ट क्रांती झाली आणि पहिली दहा वर्षे स्थिरस्थावर करण्यातच गेली. आजचे रशियाचे प्रमुख धुरी अँण्ड्रोपोव्ह यांच्यामागोमागचे दुसऱ्या क्रमांकाचे नेते के. यू. चेरनेन्को यांनी त्या काळाबाबत म्हटले आहे : "रशियाच्या आशियाई विभागातील स्त्रिया म्हणजे निव्वळ गुलामच होत्या. १९२७ साली संपूर्ण उझबे-

किस्तान राज्यात फक्त नव्वद हजार स्त्रियानी बुरखा झिडकारला, पण मुल्ला मौलवी, पूर्वीचे जमीनदार व सनातनी यानी त्याचा बेफाम छळ केला. कम्युनिस्ट महिला स्त्रियांत प्रचार करीत. त्यांना पाशवी मारहाण झाली. अनेकाचा खून झाला. पण केव्हाही माघारीचा प्रश्न नव्हता. आज सपूर्ण रशियात स्त्रिया पुरुषाबरोबरीने अनेक पदांवर काम करीत आहेत. निरक्षरता नष्ट झाली आहे. जिथे लाकडी नागरही नव्हता तिथे ट्रॅक्टर दिसत आहेत..." म्हणजेच पहिली दहापधरा वर्षे धार्मिक व आर्थिक हितसबध तोडण्यातच गेली. यानतर सुमारे बारा वर्षे विकासाला मिळाली तोच दुसऱ्या महायुद्धात रशिया सापडला. १९४१ ते १९४५ अशी चार वर्षे रशिया युद्धात होता. दोन कोटी जवान ठार झाले. दहा वर्षांच्या राष्ट्रीय उत्पन्नाइतके नुकसान झाले. याचाच अर्थ असा की, १९४५ नतरच रशियाच्या विकासाला प्रारभ झाला, कारण त्यापूर्वीचा दहाबारा वर्षांचा विकास युद्धात नष्ट झाला होता. मग अवघ्या चाळीस वर्षांत सोविएत रशिया अमेरिकेएवढा बलाढ्य कसा झाला ? सोविएत रशियाचा आकार भारताच्या सातपट आहे, पण वाळवट-पठार-बर्फमय प्रदेश आणि तीव्र हवामान यामुळे रशियात विकास साधणे फार कठीण आहे. एकच उदाहरण द्यायचे तर अफाट विस्ताराच्या सैबेरिया-बद्दल सर्वांनी ऐकलेलेच असते आणि रहाणेदेखील कठीण असा हा प्रदेश आहे ! 'सैबेरियात धाडले म्हणजे खतम केले' असा वाक्प्रचारच आहे ! भारतातील नैसर्गिक विविधता, सुपीकता आणि शेतीला अनुकूल हवामान याचा लाभ रशियाला झालेला नाही. मग जेटच्या वेगाने रशियाची प्रगती का झाली आणि भारताची गाडी रडत रखडत का चालली आहे ?

योजकस्तत्र दुर्लभः दुसरे काय ? रशियाची भरभराट करण्यास योजक उत्तम लाभला तर भारताला असा योजक अद्याप मिळत नाही. रशियातील योजकाने दोन गोष्टी केल्या. ज्या ज्या वेळी आवश्यक त्या त्या वेळी एका हातात तलवार आणि दुसऱ्या हातात कम्युनिस्ट पक्ष कार्यकर्त्यांचा प्रचार धरून,प्रगतीच्या आड येणाऱ्या सर्व हितसबधाचे उच्चाटन केले.त्यानतर विज्ञानाचा वापर करून बेफाट विकास करण्यासाठी एका हातात प्रत्येकाला सक्तीचे शिक्षण आणि दुसऱ्या हातात प्रत्येकाला म्हणजे प्रत्येक स्त्रीला व पुरुषाला काम ( जे केलेच पाहिजे ) दिले या सर्वांची गुफण राष्ट्रीय दृष्टी-कोनातून आखलेल्या नियोजनाने केली. एकाच वाक्यात सांगायचे तर तलवार, प्रचार, शिक्षण आणि प्रत्येकाला काम या चार हातांनी नियोजनाचे सुदर्शन चक्र गरगरा फिरविले आणि एक महान सामर्थ्यशाली राष्ट्र उभे केले आहे. इद शास्त्र इद शास्त्र । पक्षीय हुकूमशाहीवर आधारलेली 'सोव्हिएट सिस्टीम' हे त्याचे शस्त्र आणि 'प्रॅक्टीकल सोशॅलिझम' [ ज्याला ते 'ॲडव्हान्स्ड सोशॅलिझम' म्हणतात ] हे

त्यांचे शास्त्र आहे. भारतात या सर्वच आघाड्यांवर आनंद आहे. तलवारीचा प्रश्नच नाही-पाचदहा माणसेही सारी वाहतूक बंद पाडू शकतात! प्रचारंभ हणावा तर 'आम्ही इंदिराजींचे सैनिक आहोत' एवढेच वाक्य घोळून घोळून म्हणणारे कार्यकर्ते सत्ताधारी पक्षात आहेत! सर्वांना शिक्षण मिळत नाहीच, पण शिक्षण असमानही आहे ज्यांना शिक्षण मिळते त्यांना त्यांच्या शिक्षणाचा उपयोग करून घेणारी नोकरी नाही! बेकारी मुळातच भयानक आणि त्यात वाढ होत आहे. रशियात डॉक्टर किती हवेत, इंजिनियर किती लागतील, शास्त्रज्ञ, कसबी कामगार शेती तज्ञ, ट्रॅक्टर चालवणारे... या सर्वांची गरज अगोदर पक्की केली जाते आणि त्यानुसारच शिक्षण क्षेत्रात वेगवेगळ्या कोर्सना जागा असतात. यामुळे शिक्षण संपताच नोकरी वाट पहात असते कुठेही मानवशक्ती फुकट जात नाही. अखेर उत्पादन माणसांसाठी असते हे रशियन नियोजनाचे सूत्र आहे. यामुळे माणसाचा रशियात केवळ मजूर झालेला नसून प्रत्येकाच्या व्यक्तीमत्त्वाला सर्व दिशा मोकळ्या केल्या आहेत. दहावीपर्यंत प्रत्येकाला शिकावेच लागते, पण त्यानंतर कुठल्याही कोर्सला जाण्यासाठी परीक्षा असते. या परीक्षा अत्यंत कडकपणे घेतल्या जातात. नियंत्रणाकरिता दर परीक्षेसाठी एक बोर्ड असते आणि बोर्डात विद्यापीठाचा प्रतिनिधी, विद्यार्थ्यांचा प्रतिनिधी, पक्षाचा प्रतिनिधी असे अनेक जण असतात. यामुळे वशिलेबाजीला वावच नाही. अश्काबाद विद्यापीठाच्या उपकुलगुरूंशी माझी चर्चा झाली. त्यांचाच मुलगा उच्च शिक्षणासाठीच्या परीक्षेत नापास झाला व आज तो मोटर ड्रायव्हर आहे असे त्यांच्यासमवेत बसलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रतिनिधीने दाखवून दिले.

खाजगी मालकी व खाजगी नफेबाजी नष्ट झाल्याने शहराची रचना अत्यंत सुंदर झाली आहे. शहरात जवळ जवळ पन्नास टक्के जमिनीत हिरवीगार झाडे असतात. पचवीस टक्के जमिनीत सार्वजनिक उद्याने, म्युझियम, मैदाने, थिएटरे आदि असतात आणि पचवीस टक्के जमिनीत रहाण्याची घरे, दुकाने, कारखाने असतात. मॉस्को-लेनिनग्राड ही विख्यात शहरे हिरवीगार आहेतच, पण मध्य अशियातील वाळवंटाच्या विभागातील ताश्कंद-अश्काबाद फ्रुन्झे ही शहरेही अत्यंत हिरवीगार आहेत. यापैकी कुठल्याही शहरात गेले की, तेथील लोक म्हणतात— 'आमची नगरी ही सर्वात हिरवीगार आहे!' रस्ते मोठमोठे असतात आणि मोटारींच्या चार रांगा जाऊ शकतात व चार रांगा येऊ शकतात! मधोमध गिरगांव रस्त्याइतकी जागा झाडासाठी असते व उंच वृक्ष तेथे डोलत असतात. दोनही टोकांना पुन्हा झाडे आणि रुंद फुटपाथ असतात. फुटपाथवर चालणारी माणसे अगदी कमी, पण फुटपाथ मोठा व स्वच्छ! प्रत्येक शहरात माणसांपेक्षा झाडेच अधिक आहेत! मी आग्रह धरला की, मला मॉस्कोहून लेनिनग्राडला रेल्वेने जायचे आहे. हा सर्व

टापू पहायला मिळावा हा हेतू होता. त्यानुसार मी रेल्वेने निघालो, पण मॉस्को ते लेनिनग्राड या प्रदीर्घ अंतरावर दुतर्फा चारचार, सहासहा झाडे लावली आहेत. या प्रवासात मला झाडाखेरीज काहीच दिसले नाही! याच वनराजीचा उपयोग रशियन सैन्याला झाला आणि झाडात लपून रशियन सैनिकांनी दुसऱ्या महायुद्धात गनिमी काव्याची लढाई केली. ट्रेनमध्ये बिलकुल गर्दी नाही. मॉस्कोहून निघण्यापूर्वी अर्धा तास ट्रेन स्टेशनबाहेर येऊन बाहेरच्या प्लॅटफॉर्मवर थांबते. मागोमाग प्रत्येक डब्याबाहेर एक महिला थांबते. तिकीट व आरक्षण पाहूनच ती डब्यात जाऊ देते. स्टेशनात असूनही या महिलांची कुणीही साधी छेडाछेडी करीत नाही. एकादाही जादा माणूस गाडीत शिरू शकत नाही आणि तिकिटाशिवायही कुणी जाऊ शकत नाही. तसा कुणी प्रयत्नही करीत नाही. अर्थात डब्यात बसल्यानंतर खाली उतरविण्याचाही सवाल नाही. एकदा ट्रेनमध्ये बसले की, पुनः तिकीट तपासण्याचा किंवा लेनिनग्राडला दाखविण्याचाही सवालच नसतो. सर्व काही शांतपणे सुरळीत सुरू असते. गडबड नाही, गोंधळ नाही. प्रत्येक बाबतीत इतकी शिस्त आहे की, त्यातूनच काहीजण रशियात 'पोलादी पडदा' असल्याची ओरड करतात. प्रत्यक्षात तसे काहीही नाही. तुमच्याजवळ कागदपत्रे व्यवस्थित असली तर एक मिनिटही व्यर्थ जात नाही, पण जर जरूर ती कागदपत्रे नसतील तर मात्र एक पाऊल पुढे टाकता यायचे नाही! माणसाला चांगले घर, स्वच्छ हवा, उत्तम औषध उपचार, अद्ययावत मोफत शिक्षण, तत्काळ काम, शनिवार-रविवार रजा, म्हातारपणी भरपूर पेन्शन, निसर्गसुंदर स्थळी विश्रांती, हिरवेगार दृश्य, सुंदर रस्ते, जलद सुखकर प्रवास सारे काही देऊ करण्यात येते. पण त्याचवेळी कसल्याही बेबंदपणाला मज्जाव आहे. हा मज्जाव कसा साधला आहे ते यापूर्वीच्या लेखात सविस्तर सांगितले आहेच. पण पुनः सांगतो की, ती माणसे आपल्यापेक्षा तल्लख नाहीत—फक्त त्यांना योजक महान लाभला आहे. रशियन राज्ययंत्रणेने माणसासाठी जास्तीत जास्त सुविधा निर्माण केल्या आहेत आणि त्याच वेळी प्रत्येक माणसाकडून जास्तीत जास्त काम घेतले आहे. कुणाचीही मानवी शक्ती फुकट जाऊ दिली जात नाही कुणाचीही बेशिस्तीबद्दल गय होत नाही, पण कुणाचीही उपेक्षाही होत नाही!

उत्तम योजकतेचे सर्वांत हृदयस्पर्शी उदाहरण मला ताश्कंदमध्ये पहायला मिळाले. १९६६ च्या भूकंपात ताश्कंद शहर उध्वस्त झाले—जून-जुलै १९८३ मध्ये जसा महापुराने रत्नागिरी जिल्हा उध्वस्त झाला—पण रशियन योजकांनी काय केले! भूगर्भतज्ञांची आणि बांधकामतज्ञांची पथके तेथे आली. भूगर्भतज्ञांनी पाहणी करून हा विभाग भूकंपग्रस्त ठरविला. भूकंपावर मात करतील अशा इमारतींचे आराखडे

बांधकाम तज्ञांनी तयार केले. त्याचे शास्त्र बनविले आणि सतत नवनव्या संशोधना-साठी तेथेच एक इन्स्टीट्यूट स्थापन केली. दरम्यान ताश्कंद नगरीसाठी मास्टर प्लॅन तयार झाला. त्यानंतर योजना पार पाडण्यास सुरुवात झाली आणि हा हां म्हणता नवीन विलोभनीय नगरी उभी राहिली. बहुसंख्य इमारती दोनतीन मजली आहेत, पण काही सहासात मजलीही आहेत. भूकंपात या इमारतींना धोका नाही अशा शास्त्राने त्या उभारल्या आहेत. दरम्यान जे भूकंपग्रस्त होते त्यांना जवळ पासच्या केंद्रात रोजगार दिला होता आणि विलोभनीय नगरीत आता सर्वजण परतले आहेत. भूकंपग्रस्त विभागातील खास बांधकामाचे शास्त्र आता रशिया निर्यातही करतो! जेव्हा बांधकाम ताश्कंदमध्ये सुरू झाले तेव्हा सोविएत रशियाच्या अन्य राज्यांनी आपापले कसबी कामगार व आपल्या भागातील उत्तम बांधकाम साहित्य ताश्कंदला पाठविले. सर्व राज्ये अशी पद्धतशीर मदतीला आली आणि राष्ट्रीय एकात्मताही साधण्यात आली. याउलट पूरग्रस्त कोकणचा ताजा अनुभव पहा. कुणीतरी कसातरी निधी जमवितो, कुणाला तरी कसेतरी मदतीचे वाटप करतो, गावगन्ना पुढारी हजेरी लावतात व प्रसिद्धीचे नगारे वाजवायला ते धावल्यामुळे गावावर आणखीच ताणनिर्माण करतात. पुरात उध्वस्त झालेल्यांना पुढाऱ्यांच्या पुरातून वाचविताना नको जीव होतो. मंत्री आश्वासने देऊन परततात व आपापल्या राजकारणात मश्गुल होतात. नंतर सर्व शांत होते आणि मूलगामी संकट तसेच भेडसावत राहते. याउलट, ताश्कंदमध्ये भूकं-पाच्या संकटाचा मूलगामी मुकाबला केला आहे. या हिरव्यागार प्रशस्त नगरीत मध्य-भागी एक अतिसुंदर प्रतीक उभारले आहे. मानवाच्या श्रमशक्तीचा डौलदार पुतळा उभा केला आहे. शेजारीच एक चौथरा असून तो १९६६ च्या भूकंपात दुभंगला आहे आणि तो दुभंगलेला चौथरा भूकंपाची आठवण देण्यासाठी तसाच ठेवला आहे. पण तशाच दुसऱ्या चौथऱ्यावर पुतळा उभारला आहे आणि पुनः भूकंप झाला तर हा दुसरा चौथरा व त्यावरील पुतळा जसेच्या तसे रहातील अशी तज्ञांची ग्वाही आहे! पंधराही राज्यांच्या मुद्रा वर्तुळाकार दाखविल्या असून संपूर्ण राष्ट्रानेच ताश्कं-दच्या पुनर्वसनात हातभार लावल्याची स्मृती जागती ठेवली आहे! योजकस्तत्र दुर्लभः याचे हे हृदयस्पर्शी उदाहरण नाही का? महाराष्ट्र सरकारने महापुरानंतर कोकणात 'ताश्कंद' का निर्माण केले नाही? पुराच्या धोक्याचा संपूर्ण शास्त्रीय विचार करून आणि योजना आखून ती धडाक्याने का पार पाडली नाही? त्यानंतर पुरावर आरूढ झालेल्या श्रमशक्तीचा भव्य पुतळा तेथे का दिसू नये? नुसते जुजबी मदतीचे आकडे जाहीर करून मूलगामी समस्या सुटत नाही, तर गोंधळ नि बजबजपुरी माजते ताश्कंद आणि कोकण यात कोणते अंतर आहे? योजकस्तत्र दुर्लभः एवढेच!

रशियन विकासाच्या विराट दर्शनाने मला आनंद झाला नाही. रशियाला निसर्ग फारसा अनुकूल नाही. भयानक वाळवंटे, बर्फमय प्रदेश, लागवडीला निरुप-

योगी प्रचड पठारे, अफाट विस्तार आणि कडक उन्हाळा-हिवाळा यामुळे सोविएत रशियाला प्रगतीसाठी फार झगडावे लागते. याउलट भारताला निसर्गाचे वरदानच आहे. सुजला-सुफला अशी ही भूमी आहे. केवळ योजक दूरदृष्टीच्या आणि कडव्या ध्येयवादी नेत्यांच्या अभावी भाग्यशाली भारत दारिद्र्यात आणि दैन्यात, बेकारीत आणि बेशिस्तीत, विषमतेत आणि विघटनात खोलवर रुतत आहे याचा विषाद रशियाचे सामर्थ्य व संपन्नता जिथे तिथे पहाताना वाटला !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. २२८७१
क्र. १०१२५३
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

: १ :

# खूप काही शिकविणारी शिक्षण पद्धती

रशियातील शिक्षण पद्धतीचे पहिले वैशिष्ट्य असे की, प्रत्येकाला एस. एस. सी. पर्यंतचे शिक्षण मोफत आहे आणि सक्तीचे आहे.

खाजगी शाळा आणि मिशनरी शाळा क्रांतीनंतर लगेचच बंद करण्यात आल्या. आता फक्त सरकारी शाळा आहेत. अभ्यासक्रम सर्वत्र समान आहे. खाजगी शाळा आणि कॉन्व्हेन्ट शाळा यामुळे बाल्यपणापासूनच मुलामुलात जी विषमता सुरू होते ती रशियात नाही श्रीमंताच्या मुलांना पैशाच्या जोरावर अधिक चांगले शिक्षण मिळण्याचा रशियात सवालच नाही. म्हणजेच सर्वांना समान शिक्षणाची संधी मिळते हे रशियन शिक्षण पद्धतीचे दुसरे वैशिष्ट्य आहे.

जून जुलै-ऑगस्ट असे तीन महिने मुलांना सुटी असते या सुटीत मुलांसाठी निसर्गाच्या सान्निध्यात निरनिराळे कॅम्प असतात आणि तेथे करमणुकीबरोबरच मुलांचे व्यक्तिमत्त्व विविध अंगानी फुलविले जाते. त्यासाठी नांवापुरतीच फी असते. दररोज शाळा सुटल्यावर मुलांना आपापल्या आवडत्या छंदात मशगुल होता यावे म्हणून अनेक सोयी असलेले 'पायोनिअर पॅलेसीस आणि 'छंद क्लब' ठिकठिकाणी असतात शाळेतील अभ्यास करून घेतला म्हणजे इतिकर्तव्य संपले असे मानले जात नाही, तर मुलामध्ये कोणती खास 'टॅलेन्ट' आहे त्याचा आवर्जून शोध घेऊन या टॅलेन्टला हवा तितका वाव दिला जातो. एस. एस. सी. पर्यंतचा सर्वसाधारण व्यापक अभ्यासक्रम पूर्ण करून घेतानाच

प्रत्येकाची खास गुणवत्ता हेरणे आणि विकसित करणे हे रशियन शिक्षण पद्धतीचे तिसरे आगळे वैशिष्ट्य आहे. हे काम पायोनियर पॅलेस, विविध छंदाचे खास क्लब आणि सुटीतील कॅम्प येथे सहजसुदर होते

एस. एस. सी पर्यंतचा अभ्यासक्रम दहा वर्षांचा असतो. मुलाना क्रमिक पुस्तकेही मोफत दिली जातात. जेवणही जवळजवळ विनामूल्य मिळते. शिक्षण मातृभाषेतच दिले जाते आणि त्यासाठी ५६ भाषांमध्ये शिक्षणाची सोय क्रमिक पुस्तकांसहित केली आहे. रशियन भाषा ही राष्ट्रभाषा आहे आणि शिक्षणाचे माध्यम मातृभाषेचे असले तरी रशियन भाषा शिकावीच लागते. जगात विज्ञानाची आणि तंत्रज्ञानाची इतक्या वेगाने प्रगती होत आहे की, त्याचा पूर्ण उपयोग करून घेण्यासाठी प्रत्येक मुलाला विविध विषयाचे मूलभूत ज्ञान आणि व्यावसायिक शिक्षण एस. एस. सी. पर्यंत दिले पाहिजे असे रशियन शिक्षण तज्ञांचे मत आहे. यामुळे मुलाचा दृष्टिकोन व्यापक होतोच, पण पुढील आयुष्याची दिशाही त्याना ठरविता येते. सोबतच्या तक्त्यावरून कोणत्या विषयाची ओळख प्रत्येक मुलाला होते ते दिसेल.

| विषय | दर आठवड्यात नेमलेले तास | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| इयत्ता | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| मातृभाषा | १२ | १० | १० | ६ | ६ | ३ | ३ | २ | १ | — |
| साहित्य | — | — | — | २ | २ | २ | २ | ३ | ४ | ३ |
| गणित | ६ | ६ | ६ | ६ | ६ | ६ | ६ | ६ | ५ | ५ |
| इतिहास | — | — | — | २ | २ | २ | २ | ३ | | ३ |
| समाजशास्त्र | — | — | — | — | — | — | — | — | — | २ |
| निसर्ग अभ्यास | — | २ | २ | २ | — | — | — | — | — | — |
| भूगोल | — | — | — | — | २ | ३ | २ | २ | २ | — |
| जीवशास्त्र | — | — | — | — | २ | २ | २ | २ | १ | २ |
| फिजिक्स | — | — | — | — | — | २ | २ | ३ | ४ | ५ |
| खगोलशास्त्र | — | — | — | — | — | — | — | — | — | १ |
| ड्राफ्टस्मनशिप | — | — | — | — | — | १ | १ | १ | — | — |
| विदेशी भाषा | — | — | — | — | ४ | ३ | ३ | २ | २ | २ |
| केमिस्ट्री | — | — | — | — | — | — | २ | २ | ३ | ३ |
| कला | १ | १ | १ | १ | १ | १ | — | — | — | — |
| गायन व संगीत | १ | १ | १ | १ | १ | १ | १ | — | — | — |
| शारीरिक शिक्षण | २ | २ | २ | २ | २ | २ | २ | २ | २ | २ |
| व्यावसायिक शिक्षण | २ | २ | २ | २ | २ | २ | २ | २ | २ | २ |
| | २४ | २४ | २४ | २४ | ३० | ३० | ३० | ३० | ३० | ३० |
| ऐच्छिक विषय | — | — | — | — | — | — | २ | ४ | ६ | ६ |
| एकूण | २४ | २४ | २४ | २४ | ३० | ३० | ३२ | ३४ | ३६ | ३६ |

आठव्या इयत्तेनंतर व्यावसायिक शिक्षण शाळांमध्ये किंवा विशिष्ट विषयावर भर देणाऱ्या स्पेशल स्कूलमध्ये प्रवेश घेता येतो, पण तेथेहि सर्वसाधारण शाळातील एस. एस सी. पर्यंतचा अभ्यासक्रम पूर्ण करून घेतला जातोच. काही विद्यार्थी शिक्षण न संपविता शेतावर किंवा अन्यत्र कामावर लागले तरी त्यांना सायंकालीन शाळात जाऊन शिक्षण पूर्ण करावेच लागते. त्यासाठी कामाचे कमी तास आणि खास रजा यांची सवलत त्यांना देण्यात येते. म्हणजे रशियातील प्रत्येक व्यक्ती केवळ साक्षरच नसते तर तिला दहावीपर्यंतच्या सक्तीच्या शिक्षणामुळे आधुनिक जगातील ज्ञानाची मूलभूत ओळख झालेली असते! अशी ही मानवशक्ती उभी होताच तिचा पुरेपूर उपयोग करण्यासाठी उच्च शिक्षण संस्था आणि अर्थव्यवस्था सिद्धच असतात.

एस एस. सी नंतर विद्यापीठाचे शिक्षण पाच वर्षांचे असते. हे शिक्षण संपण्यापूर्वीच त्या त्या शिक्षणाशी संबंधित औद्योगिक कारखाने वा संस्था विद्यार्थ्यांकडे नोकरी घेऊन येतात आणि विद्यापीठीय शिक्षण संपण्यापूर्वीच पगारही द्यायला लागतात! जर नोकरी स्वीकारली तर कोणते काम आहे त्याची त्याला वारंवार कारखान्यात बोलावून घेऊन माहितीही करून दिली जाते! शिक्षण संपवून कामावर रुजू होण्यापूर्वीच एक महिन्याची रजा विश्रांतीसाठी भर पगारी दिली जाते!

दररोज शाळा संपल्यानंतर विद्यार्थ्यांच्या विविध आवडत्या छंदासाठी केलेली 'पायोनियर पॅलेस' ची सोय आणि तीन महिन्याच्या सुटीतील पायोनियर कॅम्प ही रशियन शिक्षणाची सर्वांत विलोभनीय आकर्षणे आहेत. येथे टॅलेन्टचा शोध आणि त्याला उत्तेजन सहजसुंदर साधले जाते. भारतातही हल्ली 'टॅलेन्ट सर्च' योजना आहे, पण करतात काय? तर पुस्तकी परीक्षेत किंवा क्रीडास्पर्धेत किंवा कलास्पर्धेत उत्तम यश मिळविणाऱ्यांना दरमहा स्कॉलरशिप देतात. म्हणजे विशिष्ट गुणवत्ता विकसित करण्यासाठी प्रशिक्षणाची कसलीच सोय न करता फक्त पैसे दिले जातात! अशी रक्कम तर रशियात प्रत्येक मुलावर खर्च होते!

या पायोनियर पॅलेसीस रशियात पाच हजारांहून अधिक आहेत. तेथे सरकारने नेमलेले शिक्षक असतात. अर्थात विद्यार्थ्याला सक्तीचे वर्ग नसतात, पण त्याच्या आवडीच्या विषयात त्याला हवे असेल तर उत्तम मार्गदर्शनाचीही सोय असते जीवशास्त्र, स्टॅम्प गोळा करण्याचा छंद, इतिहासाची आवड, खेळ, विमानाची बांधणी, यंत्राची बांधणी, अंतराळ प्रवास अशी वेगवेगळी दालने या पॅलेसमध्ये असतात नृत्य, संगीत, नाट्य आदि कलांचीही दालने असतात. कुठल्याही दालनात जा आणि आपल्या आवडत्या छंदात गुंगून जा. मार्गदर्शन हवे असेल तर शिक्षक सेवेला उभे आहेत. फी काहीही नाही. अट फक्त एकच, की तुम्हाला खरोखरीच छंद असला पाहिजे. नुसत्या टिवल्या बावल्या करायला मिळणार नाहीत.

दरवर्षी असे पायोनियर पॅलेसीस आणि अन्य छंद क्लब यांच्या प्रमुखांची

बैठक भरून विचारविनिमय होतो. ज्यांना विशिष्ट विषयात अपवादात्मक टॅलेन्ट असल्याचे दिसून आले असेल त्यांची नावे या बैठकीत सादर केली जातात. मग त्यांच्यासाठी खास सोयी सवलती व मार्गदर्शन यांची व्यवस्था होते. जगविख्यात विमान बांधणीतज्ञ याकोलेव्ह, जागतिक बुद्धिबळ चॅम्पियन अनातोली कार्पोव्ह, विख्यात कलाकार तमारा सिन्याव्हस्काया यांची खास बुद्धिमत्ता या पायोनियर पॅलेसमध्ये लहानपणीच प्रगट झाली आणि तेव्हापासून खास तज्ञाचे मार्गदर्शन त्यांच्यासाठी हाजिर झाले होते कार्पोव्ह हा उरल पर्वताच्या परिसरात रहाणारा, पण त्याच्या खास टॅलेन्टचा शोध लहानपणीच अशा पॅलेसमध्ये लागला व मॉस्कोत आणून त्याच्या खास शिक्षणाची सरकारी खर्चाने व्यवस्था झाली.

एकाद्या क्षेत्रात विशेष प्रावीण्य असलेल्यांसाठी 'स्पेशल स्कूल्स' ही आहेत 'स्पेशल स्कूल' म्हणजे बढ्याच्या मुलांसाठी शाळा नव्हे, तर खास टॅलेन्टसाठी शाळा आहेत. तेथे अशा मुलांना पाठविले जाते, पण तरीही त्या स्पेशल स्कूलमध्ये सर्वसाधारण दहावीपर्यंतचा अभ्यासक्रम पुरा करून घेतला जातोच. कारण आधुनिक जगातील ती किमान गरज आहे असे मानले जाते. रशियात स्पोर्टस स्कूल्स, म्युझिक स्कूल्स, सायन्स स्कूल्स अशा अनेक खास शाळा विशिष्ट टॅलेन्टच्या मुलांसाठी आहेत. 'कॅच देम यंग' अशी घोषणा आपण भारतातही ऐकतो, पण घोषणा प्रत्यक्षात कशी आणायची ते रशियात पहायला हवे.

पायोनियर पॅलेसमध्ये विशिष्ट क्षेत्रातील बुद्धिमत्तेचा शोध लागतो आणि स्पेशल स्कूलमध्ये त्या बुद्धिमत्तेचा विकास साधला जातोच. त्याशिवाय तीन महिन्यांच्या सुटीत जे कॅम्प होतात त्यात लष्करी कवायतीपासून विविध प्रकारचे कौशल्य शिकविले जाते. विविध छंद निसर्गरम्य ठिकाणी पुरविले जातात. या सान्यांचा ७५ टक्के खर्च सरकार देते काही अमेरिकन लेखकाची तक्रार आहे की, अशा कॅम्पद्वारे लष्करी तयारीही करून घेतली जाते. यामुळे रशियाला केव्हाही अल्पावधीत प्रचंड लष्कर उभे करता येईल! याचा अर्थ असा की, सरकार विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व विविध अंगांनी फुलवित आहे. भारतात क्रीडाकौशल्य विकसित करण्याचा जेव्हा विचार केला जातो तेव्हा शाळेच्या अभ्यासक्रमातच हा विषय असावा अशी सूचना सवगपणे केली जाते. पण रशियात शाळावरील बोजा असा वाढवीत नाहीत. हे काम पायोनियर पॅलेसमध्ये आणि स्पेशल स्कूलमध्ये होते. किंबहुना शाळा-पायोनियर पॅलेस-स्पेशल स्कूल-सुटीतील कॅम्प या सान्यांचे एक युनिटच विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व चौफेर फुलविते, त्याचा खास गुण हेरून शास्त्रीय मार्गदर्शनाखाली विकसित करते. म्हणजेच विद्यार्थ्यांचा फावला वेळ आणि रजाही फुकट जात नाही. माणसे जास्तीत जास्त प्रबळ आणि चौफेर ज्ञानी करून त्याचा उत्तमात उत्तम उपयोग करून घेतला जातो.

अमेरिकेला वाऱ्या करून आलेल्या तथाकथित तज्ञानी बारेमाप शालेय अभ्यासक्रम तयार करायचा आणि निम्मा अभ्यासक्रमही खऱ्या अर्थाने शिकविणे शिक्षकांना शक्यच नसायचे, असला विपरीत प्रकार भारतात आहे. तथापि रशियात अभ्यासक्रम निश्चित करताना प्रत्यक्ष शिकविणाऱ्या शिक्षकांची संमती व मान्यता घेतली जाते. जगातील ज्ञान विज्ञान अफाट वाढत आहे आणि त्यामुळे अभ्यासक्रम वाढणे अटळ आहे असे रशियन तज्ञही मानतात. पण म्हणूनच विद्यार्थ्याला कमीत कमी वेळात अधिकात अधिक चांगले शिकविण्यासाठी सतत संशोधन सुरू आहे. शिकविण्याच्या पद्धतीत त्यानुसार बदल होत असतात. शिक्षणविषयक प्रत्येक संस्थेत प्रत्यक्ष शिकविणारे शिक्षक असतात व सर्वात अधिक महत्त्व त्यांच्या म्हणण्यालाच दिले जाते. शाळेतील सर्व शिक्षकांचे एक मंडळ असते आणि या मंडळाची संमती घेतल्याशिवाय प्रिन्सिपॉलला एकाही महत्त्वाच्या प्रश्नाचा निर्णय घेता येत नाही. शिक्षकाला समाजात फार मोठे मानाचे स्थान आहे. अर्थात हा मान केवळ बोलण्यापुरता आणि 'शिक्षक उद्याची पिढी घडवितो' अशा भाषणापुरता नाही शिक्षकाला डॉक्टर आणि इंजिनियर आणि वकील यांच्याइतका पगार दिला जातो यातच त्याचे स्थान स्पष्ट होते ! त्याचबरोबर कुणीही उठावे आणि अन्य नोकरी मिळत नाही म्हणून शिक्षकाचे काम करावे असा प्रकार रशियात नाही. कारण त्यांना पाच वर्षांचा खास शिक्षणक्रम पार पाडावा लागतो शिवाय दर पाच वर्षांनी उच्च प्रशिक्षणाचा खास कोर्स अद्ययावत रहाण्यासाठी पुरा करावा लागतो.

रशियात कोणत्याही क्षेत्रात सर्वंकष नियोजन कसे साधले आहे ते या शिक्षण पद्धतीवरूनही स्पष्ट होते. शिक्षकाला डॉक्टरइतका पगार द्यावयाचा आणि त्याच वेळी विद्यार्थ्याला मोफत शिक्षण द्यायचे हे सर्वंकष नियोजनातच शक्य आहे. म्युनिसिपल शाळा, सरकारी शाळा, खाजगी शाळा, कॉन्व्हेंट, पब्लीक स्कूल अशा संमिश्र गोंधळात अशा प्रकारची सुसूत्रता शक्यच नाही.

सहाव्या वर्षी मुलाला शाळेत प्रवेश दिला जातो. त्यापूर्वी तीन ते सहा या वयाच्या मुलासाठी किंडरगार्टन आहेत, तर पहिल्या तीन वर्षांकरिता नर्सरी आहेत. वयाच्या पहिल्या सहा वर्षांत काय शिकवावे आणि कसे शिकवावे याचे शास्त्रीय संशोधन सतत सुरू असते. किंडरगार्टनमध्ये १५ ते २० मुलांचा वयानुसार गट असतो. या इतक्यां मुलांकरिता एक शिक्षक व सहाय्यक अशा दोन महिला शिक्षिका असतात काही किंडरगार्टनमध्ये एखादी विदेशी भाषाही बोलायला शिकवतात आणि त्याकरिता एक स्वतंत्र शिक्षिका असते. याखेरीज एक डॉक्टर, एक संगीत शिक्षिका, एक चित्रकला शिक्षिका आणि एक स्वैंपाकी असतो. इन्स्टीटयूट ऑफ न्यूट्रीशनच्या शास्त्रोक्त शिफारसीनतर मुलांना तीनदा जेवण दिले जाते आणि त्यांची शरीरप्रकृती उत्तम राखण्याला सर्वांत अधिक महत्त्व दिले जाते. खेळ, नाच–गाणी, झाडे लावणे, वस्तूचे रंग, आकार संख्या आदींचे ज्ञान देणे असे हसत खेळत चालते. प्रदीर्घ

सुट्टीत किंडरगार्टन निसर्गरम्य ठिकाणी हलविले जाते! या सर्व सोयींसाठी आईवडि-लांना नॉमिनल फी द्यावी लागते आणि सर्व खर्च सरकारचा असतो.

प्राचीन ग्रीसमधील एक तत्त्व रशियाने उचलले आहे. एक माता आपल्या एका वर्षाच्या मुलाला घेऊन शहाण्या माणसाकडे गेली व तिने विचारले, 'कृपा करून मला सांगा की, मी माझ्या या एक वर्षाच्या मुलाचे शिक्षण केव्हा सुरू करू?' शहाण्या माणसाने उत्तर दिले, 'बाई, तुम्हाला एक वर्ष अगोदरच उशिर झाला आहे!' या तत्त्वानुसार पहिल्या वर्षापासून वीस ते पंचवीस वयापर्यंत रशियन विद्यार्थी सरकारी खर्चाने सर्वोत्तम शिक्षण संपादन करतात. आई-वडिलांनीही घरी मुलाची उत्तम काळजी घ्यावी आणि विकास करावा यासाठी 'सेमिया इ स्कोला' या नावाचे मासिक मार्गदर्शन करते आणि त्याचा खप १५ लाख आहे. टेलिव्हीजन व आकाश-वाणी यावरही मातापित्यांना शास्त्रीय मार्गदर्शन केले जाते! हा सारा लाभ प्रत्येक मुलाला मिळतो-आईवडिलांची गरिबी किंवा श्रीमंती किंवा हुद्दा याचा मुलाच्या शिक्षणाची काही संबंध नाही!

: १० :

# सौंदर्यशालिनी वीरांगना-लेनिनग्राड !

मॉस्को–मॉस्कवा ! रशियाच्या या राजधानीची प्रशंसा अनेक जण करतात स्वच्छ सुंदर रुंद रस्ते, कलारम्य भुयारी रेल्वे [ जिला मेट्रो म्हणतात ], हिरवीगार वनराई, क्रेमलिन आणि लाल चौक, टोलेजंग टेलिव्हीजन मनोरा, गगनचुंबी नव्या इमारती अशी मॉस्कवाची अनेक आकर्षणे आहेत पण तरीही आधुनिक जगातील धावपळीची, सत्ताधाऱ्यांच्या व नोकरशहाच्या गांभीर्याची आणि अवाढव्यतेची छाया या शहरावर पसरली आहे.

पण मॉस्कोनंतर दुसऱ्या क्रमांकाचे शहर असलेल्या लेनिनग्राडचे तसे नाही. ही साक्षात कलानगरी आहे. पीटर दि ग्रेटने १६ मे १७०३ साली रशियाच्या पश्चिम किनाऱ्यानजीक लेनिनग्राड वसविण्यास सुरुवात केली तेव्हा मुंबईसारखीच तिथे बेटे होती नीव्हा नदी अवखळपणे वहात होती आणि सागराला जाऊन मिळणाऱ्या नीव्हा नदीमुळे पश्चिम किनाऱ्यावरील सागरात–फिनलंडच्या आखातात व बाल्टीक समुद्रात प्रवेश करता येत होता. नीव्हा नदी आता माणसाळली आहे आणि नदीच्या दोनही कांठावर लेनिनग्राडचे शिल्प उभे आहे. नीव्हा नदीवर बांधलेले पूलसुद्धा एक शिल्पच आहे. मुंबई शहर उत्तर-दक्षिण पसरले आहे तसे लेनिनग्राडचे नाही. नीव्हा नदी भोवती वर्तुळाकार ते वसविले आहे आणि वर्तुळ आहे वनराईचे !

पीटर दि ग्रेटने लेनिनग्राड येथे राजधानी वसवून रशियाचे बलाढ्य आरमार प्रथमच उभारले. शिस्तबद्ध लष्कर तयार केले. पश्चिम समुद्रकिनाऱ्यावर रशियाची राजधानी आल्यामुळे रशियाचा संबंध युरोपशी येऊ लागला. म्हणूनच लेनिनग्राडला

'विंडो टू दि वेस्ट' म्हणतात. पीटरने उभारलेल्या सामर्थ्यामुळे युरोपीय राजकारणात रशियाची दखल घेण्यास प्रथमच सुरुवात झाली पीटर हा आमच्या शिवाजीराजासारखाच दूरदृष्टीचा आणि काळापुढे धावणारा होता. लेनिनग्राडमध्ये पीटर ॲण्ड पॉल नामक किल्ला बांधून याने नगरी वसविण्यास सुरुवात केली. रशियाची पहिली ॲकॅडमी ऑफ सायन्सीस त्यानेच स्थापन केली. नीव्हा नदीच्या दोनही काठावर फक्त दगडी आणि कलात्मक इमारती बांधल्या पाहिजेत असा फतवा पीटरने काढला आणि अवघ्या पचवीस वर्षांत ही कलानगरी आकाराला आली. युरोपातील शहरांशी स्पर्धा करू लागली. दूरदृष्टीच्या पीटरने पहिली मरीन ॲकॅडमीही स्थापन केली. रशियातील पहिला छापखानाही सुरू झाला. रशियाचे पहिले म्युझियम, पहिले सार्वजनिक वाचनालय, पहिले इंजिनियरींग कॉलेज लेनिनग्राडमध्ये शोभू लागले. लेनिनग्राड वसविण्यास प्रारंभ झाल्यानंतर एका शतकाने अलेक्झांडर पुश्कीन हा कवि उत्स्फूर्तपणे गाऊ लागला -

I love thee, Peter's proud creation
Thy princely stateliness of line

पीटरच्या या निर्मितीचे नाव सेंट पीटर्सबर्ग असे १७१२ साली जाहीर झाले. कम्युनिस्ट क्रांतीनंतर १९१८ साली रशियाची राजधानी मॉस्कोला गेली, पण तोपर्यंत ती सेंट पीटर्सबर्ग येथेच होती. १९१५ ते १९२४ या काळात सेंट पीटर्सबर्गऐवजी पेट्रोग्राड असे नामाभिधान झाले आणि १९२४ मध्ये रशियन क्रांतीचे असामान्य नेते व्लादीमीर लेनिन मृत्यू पावल्यानंतर ही नगरी त्याच वर्षी 'लेनिनग्राड' झाली. कारण ही लेनिनची कर्मभूमी आणि रणभूमी होती. रशियातील समाजवादी क्रांती लेनिनग्राडमध्ये प्रथम झाली. लेनिन १८९३ पासून त्यासाठी लेनिनग्राडमध्ये अविरत झटत होता ही नगरी कलात्मक वसविली पीटर दि ग्रेटने आणि तिथे जगातील पहिली समाजवादी क्रांती घडविली व्लादीमीर लेनिनने! या दोघांही नेत्यांची अशी सुंदर स्मारके लेनिनग्राडमध्ये आहेत की जगातील सर्वश्रेष्ठ शिल्पकारांनी या कलाकृती घडवून आपल्या शिल्पकलेला पूर्णविराम दिला असावा असेच वाटू लागते!

१७८२ साली शिल्पकार फॅल्कोनेट यांनी पीटर दि ग्रेटचा प्रेक्षणीय अश्वारूढ पुतळा उभारला. पीटर लढवय्या आणि विजयी वीरपुरुष होता. त्याचा रणांगणातील आवेश दर्शविणारा पुतळा करावा ही राज्यकर्त्यांची सूचना फेटाळून, शिल्पकाराने आठ मीटर उंचीच्या ग्रॅनाईट खडकावर पीटर दि ग्रेटचा सामान्य पोशाखातील पुतळा उभारला. अश्वारूढ पीटरचा चेहरा त्याचाच शिष्य कॉलेट याने अप्रतिम घडविला. पीटर म्हणजे आत्मविश्वास, बुद्धीमत्ता आणि दूरदृष्टी! पीटर अत्यंत रुबाबात अश्वारूढ असून त्याचे डोळे दूरवर लागले आहेत. त्याच्या चेहऱ्यावर निर्धार, बुद्धीमत्ता आणि

आत्मविश्वास इतक्या कलात्मक रीतीने प्रकट झाला आहे की पहातच रहावे. फिनलॅन्ड स्टेशनसमोरच्या लेनिनचा कलात्मक पुतळाही असाच उचित आणि अर्थपूर्ण आहे. १६ एप्रिल १९१७ रोजी परदेशाहून परतलेल्या लेनिनने तेथेच भाषण करून समाजवादी क्रांतीचे आवाहन कामगारांना, सैनिकांना आणि नाविक दलाला केले. लेनिनची त्यावेळची कळकळ आणि तळमळ शिल्पकार श्युचको आणि हेलफ्रीच यांनी अप्रतिम साकार केली आहे. ७ नोव्हेंबर १९२६ साली या पुतळ्याचे अनावरण झाले.

आश्चर्य असे की, पुतळ्याचे अनावरण अमुक मंत्र्याने केले असा कुठेही नामफलक नसतो. पुतळ्याच्या नावामागोमाग आर्किटेक्टचे–शिल्पकाराचे नाव उच्चारले जाते आणि त्याची कलाकृतीतील कल्पना समजावून दिली जाते. याबाबतचे पुस्तक पहा अथवा मार्गदर्शकाला विचारा, शिल्पकाराचे नाव आवर्जून सादर केले जाणार. मुंबापुरीतील वानखेडे स्टेडियमचा आणि शेषराव वानखेडे यांचा संबंध काय? तर शेषराव वानखेडे यांनी त्यांचे मित्र व मुख्यमंत्री ना. वसंतराव नाईक यांच्याकडून सरकार दरबारचे वजन वापरून दुर्मिळ सिमेंट मिळविले. (जे सिमेंट न मिळाल्याने जुनी घरे कोसळत असतात.) तसेच नाव देण्याचे आमीष दाखवून उद्योपतींकडून पैसा गोळा केला! ब्रेबोर्नसारखा सुंदर स्टेडियम असताना स्वतःच्या जिद्दीसाठी ही उघळपट्टी केली! स्टेडियम उभारल्यावर शिसारी यावी असा त्याच्या नांवाचा दांडगा नामफलक त्याच्या जिवंतपणी झळकला! संपूर्ण रशियात असा प्रकार कुठेही नाही. कोणाचाही पुतळा असो किंवा वास्तू असो, कुणाच्या शिफारसीने जागा मिळाली अथवा अनावरण कुणाच्या हस्ते झाले ते सांगणारे राजकारणी नेत्याचे नाव कुठेच नसते. फक्त आर्किटेक्टची नावे! नीव्हा नदीच्या काठावरच १९७० साली बांधलेल्या हॉटेल लेनिनग्राडमध्ये मी उतरलो होतो. कुणी कोनशिला बसविली? पत्ता नाही! कुणी उद्घाटन केले? नाव नाही. पण या हॉटेलचे डिझाईन करणारे आर्कीटेक्ट एस स्पेरन्स्की, एन. कामेन्स्की व व्ही. स्ट्रम्मन यांची नावे हॉटेलचे नाव उच्चारताच सांगितली जातात या आर्किटेक्टना १९७३ साली राज्य सरकारचे खास पारितोषिक मिळाले! रशियात कलावंतांचे जसे कौतुक होते तसे अन्य कुठल्याही देशात होणार नाही, कारण इतरत्र राज्यकर्ता मंत्री व पैसा देणारा भांडवलदार यांचीच नावे झळकतात व त्यांचीच छायाचित्रे टिपून प्रसिद्ध होतात.

आणि याहूनही नवल असे की, लेनिनग्राडमधील रस्त्यांची आणि मध्यवर्ती चौकाची आखणी ज्याने केली त्या त्या आर्कीटेक्टचे नांवही मोठ्या आदराने सांगितले जाते प्रत्येक इमारतीचे डिझाईन वेगळे आणि त्याच्या आर्कीटेक्टचे नांव इमारतीशी जोडले गेलेले! विख्यात रशियन लेखक निकोलाय गोगोल यांच्या एका लघुकथेची सुरुवात अशी आहे— 'नेव्हस्की प्रॉस्पेक्टशी तुलना होईल असा एकही विभाग नाही! निदान सेंट पीटर्सबर्गमध्ये तरी नाहीच. सेंट पीटर्सबर्गमध्ये

नेव्हस्की प्रॉस्पेक्टइतके महत्त्वाचे काहीच नाही !' या नेव्हस्की प्रॉस्पेक्टवर मी खूप रेंगाळलो. प्रत्येक इमारत म्हणजे वेगळी कलाकृती आहे ! भरपूर रुंद अशा रस्त्याच्या दुतर्फा या कलाकृती उभ्या आहेत आणि रस्ता ज्या चौकाला जाऊन मिळतो त्या चौकात चहुकडे अति सुंदर दृश्य दिसते. एकेकाळच्या अमीर उमरावाचा हा विभाग होता. पण आश्चर्य असे की, इमारती जुन्या होऊन आजच्या सरकारला अद्ययावत सोयींनी युक्त असे फ्लॅट बांधण्याची वेळ आल्यावर असा खास निर्णय घेण्यात आला की, पूर्वकालीन सौंदर्यपूर्ण आर्कीटेक्चरचा नमुना असलेल्या इमारतीचा दर्शनी भाग तसाच ठेवावयाचा. बाल्कनी किंवा दर्शनी शिल्पकला पाडणे जरूरच असेल तर पूर्वीसारखीच बाल्कनी किंवा शिल्पकला किंवा दरवाजे मुद्दाम बनवून पुनः उभारायचे. त्याकरिता पंधरा हजार इमारतीचा तज्ञांनी अभ्यास केला. प्रत्येक इमारतीचा वेगळा विचार ! यामुळे गोगोलने ज्या नेव्हस्की प्रॉस्पेक्टचा उदोउदो केला तो नेव्हस्की प्रॉस्पेक्ट त्याच्या काळात जसा होता तसाच आजही पहायला मिळतो. इमारतीच्या आत अद्यावत सोयी आल्या, पण दर्शनी भाग तसेच ठेवले.

गावाबाहेर ज्या नव्या उंच इमारती निवासासाठी बांधण्यात येत आहेत त्या आधुनिक प्रकारच्या आहेत, पण लेनिनग्राडचे सौंदर्य जसे होते तसे टिकविण्यात आले आहे. ज्या इमारतीचे खास डिझाईन नाही अथवा ऐतिहासिक महत्त्व नाही अशाच इमारती पाडण्यात आल्या, पण त्या जागी सिमेंट काँक्रीटचे 'गगनचुंबी' राक्षस आले नाहीत. जागा तशीच सोडण्यात आली. मध्येच जर एकादी गगनचुंबी इमारत बांधली तर सौंदर्य नाहीसे होईल म्हणून मूळच्या लेनिनग्राडमध्ये अशा इमारती उभारण्यास तज्ञांनी आणि लोकांनी विरोध केला.

नीव्हा नदीच्या काठी गगनचुंबी 'लेनिनग्राड' हॉटेल बांधण्याचा प्रस्ताव येताच लोकांनी वृत्तपत्रांतून विरोधाचा भडीमार केला. अखेर खास डिझाईननुसार 'लेनिनग्राड' हॉटेलचा आकार लांबलचक करून उंचीमुळे येणारा विशोभितपणा टाळण्याचा निर्णय झाला. आता या हॉटेलची उंच इमारत त्या विभागाची शोभा वाढविते आणि म्हणूनच संबंधित आर्किटेक्टना पारितोषिके मिळाली.

समाजवादी देश म्हणजे निव्वळ उपयुक्ततावाद असणार या माझ्या कल्पनेला जिथे तिथे हादरा बसला ! रशियात आणि विशेषतः लेनिनग्राडमध्ये कलाप्रेम आणि कलावंतावरील प्रेम ओसंडून जात असते. पुष्कीन हा रशियनांचा आवडता कवी ! लेनिनग्राडमध्ये पुष्कीन ड्रामा थिएटर आहे, पुष्कीन आर्टस स्क्वेअरमध्ये मायखेल ॲनीकुशीन या शिल्पकाराने घडविलेला पुष्कीनचा सुंदर पुतळा आहे, पुष्कीन म्युझियम आहे आणि पुष्कीन व्हिलेजही आहे. एका कवीवर असे हे प्रेम !

नीव्हा नदीच्या काठावरून फिरताना जिकडे तिकडे कला विलास दिसतो

आणि सुखविलो. त्यातच जून महिन्यात निसर्गही या कला विलासाचे कौतुक करतो! जूनमध्ये दिवस जवळजवळ एकोणीस तासांचा असतो आणि रात्रभर कोजागिरी पौर्णिमेसारखा शीतल पण चंदेरी प्रकाश जिकडे तिकडे असतो. त्यालाच 'चंदेरी रात्री' [व्हाईट नाईटस] असे म्हणतात ११ जून ते २ जुलै 'व्हाईट नाईटस' चे दिवस असून त्यावेळी चंदेरी रात्री नीव्हा नदीच्या काठी लेनिन ग्राडचे सौंदर्य विलक्षण वेडावणारे असते. चोवीस तासांपैकी जास्तीत जास्त पाऊण तास अंधारल्यासारखे असते.

पण कलात्मकतेचा कळस म्हणजे विंटर पॅलेस! रास्ट्रेली या जगविख्यात कलाकाराला बोलावून हा २३० मीटर लांबीचा विंटर पॅलेस १७५४ ते १७६२ या आठ वर्षांत उभारण्यात आला.सोनेरी शिल्पाने मढविलेले एकेक दालन पाहताना वैभवाची आणि कलेची ही विविध रंगी उधळण थक्क करून टाकते. रशियन बादशहा झारच्या या अपूर्व निवासाने चकित व्हायला होतेच,पण १९१७च्या क्रांतीनंतर या विंटर पॅलेसचे कलाकृतींच्या अद्‌भूत म्युझियममध्ये जे रुपांतर केले आहे ते पाहून मन धुंद वेडावून जाते. विंटर पॅलेस म्हणजेच एक म्युझियम आहे आणि त्यातील जगविख्यात कलाकृतींचे म्युझियम म्हणजे सोनेरी तख्तावरील हिरेमाणकेच! समाजवादी क्रांतीमुळे हा पॅलेस केवळ बादशहाच्या व राणीच्या इतमामासाठी व चैनीसाठी राहीला नाही–तो आम जनतेला त्यातील अजोड कलाकृतींच्या म्युझियमसह खुला झाला! ७ नोव्हेंबर १९१७ च्या रात्री याच विंटर पॅलेसमध्ये क्रांतीकारी सैनिक शिरले व जगातील पहिले समाजवादी राज्य प्रस्थापित झाले. भव्य दिव्य कला आणि दैदिप्यमान इतिहास यांचा असा संगम जगाच्या पाठीवर कुठेही झाला नाही. दरवर्षी ३५ लाख लोक हा संगम पाहून जातात.

या जगविख्यात म्युझियमला 'हर्मिटेज' म्हणतात. तीस लाख कलाकृती विंटर पॅलेसमध्ये आणि लगतच्या अशाच चार सुंदर इमारतींमध्ये आहेत. इसवीसनापूर्वीच्या कलाकृतींपासून आजतागायतच्या कलेपर्यंत आस्वाद घेता येतो प्रत्येक कलाकृती काळानुसार ठेवली असून कलेतील बदल कसा होत गेला तेही नजरेसमोर उलगडत जाते. कुणाही कलाकाराने वर्षभर आनंद लुटत पहावे नि अभ्यासावे असे हे म्युझियम आहे. पश्चिम युरोपियन कलाकृतींच्या दालनात राफेल, लिओनार्दो द व्हिन्सी, टिटियन, रेम्ब्राण्ट, रेनॉयर, पिकासो, वेलान्झ आदि सर्व जगविख्यात कलाकारांच्या मूळ कलाकृती ठेवल्या आहेत एकेक कलाकृती तासन तास पहावी.

या कला वैभवाइतकेच रशियन सरकारचे कलाप्रेम अपूर्व आहे. दुसऱ्या महायुद्धात हिटलरच्या फौज २२ जून १९४१ रोजी रशियात शिरल्यानंतर विंटर पॅलेसमधील हजारो कलाकृती पूर्वेकडील सैबेरियात पाठविण्यात आल्या. रेम्ब्राण्टच्या चोवीस कलाकृतींसाठी काही खास खोके बनविण्यात आले. पण त्याची 'दि डिसेंट

फ्रॉम दि क्रॉस' ही कलाकृती कुठल्याच खोक्यात मावेना तेव्हा एक गोलाकार शाफ्ट बनवून त्याभोवती हे चित्र कॅनव्हासमध्ये लपेटून नेण्यात आले. ही चित्रे घेऊन गाड्या निघाल्या तेव्हा म्युझियमचे संचालक ऑर्बेली व इतर कलाकार प्रशासक रडत उभे होते! म्युझियमचा संभाळ करणाऱ्यांनी म्युझियम सोडून जाण्यास नकार दिला. ज्या दहा लाख कलाकृती मागे राहिल्या त्या सुरक्षितपणे तळघरात ठेवण्याचे काम ते करीत होते. बॉम्बपासून हर्मिटेजचा बचाव करीत होते. तत्काळ दुरुस्ती करीत होते. नाहीतर हिवाळ्यातील बर्फाचे पाणी गळून सर्व नासाडी झाली असती. युद्धात रशियाचा विजय होऊ लागताच 'हर्मिटेज' पुनः पूर्ववत करण्याचा विचार सुरू झाला. मूळ शिल्पकार रास्ट्रेलीने सोनेरी शिल्पकला, छतावर भव्य चित्रकला आणि विविध रंग यांनी शृंगारलेली दालने उभी केली होती. अर्थात 'हर्मिटेज' पूर्ववत करायचे म्हणजे शेकडो किलो सोने, मूल्यवान टिम्बर आदींची गरज होती. पण युद्ध संपलेही नसताना आणि हजारो कारखाने पुनः उभारायचे असताना सोविएत सरकारने 'हर्मिटेज'च्या पुनर्निर्माणासाठी प्रचंड रक्कम खास वटहुकुमाने मंजूर केली. ११ ऑक्टोबर १९४५ रोजी 'हर्मिटेज'च्या कलाकृती सैबेरियातून परत आल्या आणि ४ नोव्हेंबर १९४५ रोजी 'हर्मिटेज'ची ६९ दालने रेम्ब्राण्ट कलाकृतींच्या दालनासह लोकांना खुली केली तेव्हा तेथील सर्व कलावैभव जसेच्या तसे लोकांना परत दिसले! लेनिनग्राडच्या उपनगरात पीटर दि ग्रेटचा अत्यंत सुंदर राजवाडा आहे. लेनिनग्राडला नाझी फौजांचा ९०० दिवस वेढा होताच, पण हा उपनगरी भाग त्यांच्याच ताब्यात होता. १९ जानेवारी १९४४ रोजी नाझी फौजांचा पराभव करून त्यांना पिटाळले तेव्हा सारा विध्वंसच होता. पण पीटर दि ग्रेटचा राजवाडा आणि उद्यान (उद्यानाची निर्मिती इटालियन वास्तुशास्त्रज्ञ मास्र्हेयेव्ह, झेमसोव्ह यांनी आणि उद्यान कलाकार रुसेन व सर्मिन यांनी १७०४ मध्ये केली.) पुनः पूर्ववत उभे करण्याचा रशियन सरकारचा निर्णय होता. जिकडे तिकडे कलाकारांच्या मूळ डिझाईनचा शोध घेण्यात आला. रशियातच नव्हे तर संपूर्ण युरोपात हा शोध करण्यात आला. सुदैवाने विख्यात कलाकार रास्ट्रेली याची चार मूळ डिझाईन्स मिळाली. पीटरचा राजवाडा पुनः पूर्ववत उभा झाला. रास्टेलीची बरोक शैलीतील रचना आणि रॉकोक शैलीतील नाजुक सजावट तरुण रशियन कलाकारांना शिकविण्यासाठी खास स्टुडिओ होते आणि या तरुण कलाकारांनी समाजवादी रशियात पीटर दि ग्रेटचा राजवाडा उद्यानासह (समर पॅलेस ॲण्ड समर गार्डन्स) पूर्ववत उभा केला. कारखाने उभारण्याइतके महत्त्व कलाकृतींच्या पुनर्जन्माला देण्यात आले.

'कम्युनिस्ट म्हणजे हातोडा आणि विळा, रागीट चेहरा, राकट हात, घोगरा आवाज! कलात्मकता आणि कम्युनिस्ट हे परस्परविरोधी शब्द! जे जुने ते सोने असले

ग्रंथालय ठाणे
८७०
क्र. २७०७९
१७/९/२०१३

तरी जाळून टाकणार!' हा असा समज भारतीय कम्युनिस्टांनी निर्माण केला आहे, पण प्रत्यक्षात कलेचे खरे अप्रूप या समाजवादी देशातच पहायला मिळाले. विंटर पॅलेसमध्ये क्रांतिकारक शिरले तेव्हा त्याना पॅलेसची नासधूस रागाच्या भरात करायची होती. पण लेनिनने बजावले की, "आजपासून हे वैभव साऱ्या जनतेचे आहे! ते सुरक्षित राखणे आपले कर्तव्य आहे!' लेनिनग्राड ही अत्यंत विलोभनीय कलानगरी आहे आणि समाजवादी रशियातील कलाकारांनी युद्धानतरही राजेशाहीतील कलावैभव जसेच्या तसे निर्मिले आहे. आपल्या कलाकृतींनी कलानगरी आणखी सजविली आहे–आणि कलानगरीला निव्वळ उपयुक्ततेचे आधुनिक गालबोटही लागू दिलेले नाही! मध्येच गगनचुंबी इमारत आणि भोवती झोपडपट्टी असला बिभत्स प्रकार पहायला रशियनांना देशाबाहेर पडावे लागेल! कारण तेथे तर सुदर कलात्मक इमारतींच्या विभागातही गगनचुंबी सिमेंटी टॉवर बांधायला देत नाहीत! त्याची जागा कलात्मकतेच्या वेशीबाहेर–जेथे त्याही शोभतील अशा प्रकारे व अशा ठिकाणी! 'व्हाईट नाईटस'च्या काळात पीटर दि ग्रेट ही सुदर लेनिनग्राड नगरी पहात म्हणत असेल, "ही नगरी इतकी सुदर नि कलात्मक राहिली याचे कारण १९१७ ची क्रांती! नाहीतर भांडवलशाहीने तिचा उकीरडा केला असता!"

: ११ :

# इंडियन स्टालीनचा किस्सा

सोवियत रशियाचा जवळ जवळ पंधरवड्याचा माझा दौरा संपला होता. मॉस्कोतील अवकाश केंद्राला भेट देऊन मी परतत होतो. स्मिरनोव्ह हा इंग्रजी येणारा रशियन तरुण माझ्याबरोबर दौरा सुरू झाल्यापासून दौरा संपेपर्यंत होता. त्याशिवाय ज्या ठिकाणी आम्ही जात होतो त्या ठिकाणचा इंग्रजी जाणणारा स्थानिक मार्गदर्शक जरूर तर असायचा. मॉस्कोच्या अवकाश केंद्रात जाऊन आम्ही तेथील प्रमुखाशी बातचीत केली तेव्हा मॉस्कोची एक मार्गदर्शिका होती. त्यापूर्वी लेनिन म्युझियम पहायला गेलो तेव्हाही हीच मार्गदर्शिका होती.

कम्युनिस्टांचे सर्वात महत्त्वाचे केंद्र असलेल्या क्रेमलिनसमोर आमची मोटर थांबली. क्रेमलिनसमोरच हॉटेल रोसिया हे एकवीस मजली सुंदर हॉटेल आहे. तेथेच मी चार दिवस रहात होतो. मोटारीतून उतरून फूटपाथवर क्रेमलिनकडे पहात उभा असतानाच त्या मार्गदर्शिकेने प्रश्न विचारला, 'तुम्ही येथे येण्यापूर्वी रशियाबद्दल तुमच्या काही कल्पना असतील. रशिया तुम्हाला तसाच दिसला की वेगळा दिसला?'

'फारच वेगळा दिसला!'

'वेगळा म्हणजे काय?'

'म्हणजे असे पहा की, क्रेमलिनच्या या लाल भिंतीभोवती हातात रायफली घेऊन अनेक सैनिक उभे असतील असे मला वाटले! पण येथे तर फक्त एकाच प्रवेश-द्वारावर-जेथून युरी ॲण्ड्रोपोव्ह आणि ग्रोमिको यासारखी उच्च पदस्थ मंडळी जातात

येतात—फक्त दोन रायफलधारी आहेत.शिवाय लेनिनच्या शवागारासमोर दोन रायफल-धारी आहेत. बस्स इतकाच बंदोबस्त! जितके रायफलधारी असावेत असे वाटले तितके कॅमेराधारी टूरीस्टच दिसत आहेत आणि मस्त मजेत फिरत आहेत!' यावर स्मिरनोव्ह व ती मार्गदर्शिका भरपूर हसत राहिले त्याचवेळी मला तुर्कमेनियाची राजधानी अश्काबाद येथील मार्गदर्शिकेची आठवण झाली. अनेक प्रश्न विचारून, विशेषतः मुसलमानाबद्दल वारवार विचारून, स्मिरनोव्ह, अश्काबादचाच एक पत्रकार अलेक्झांडर आणि स्थानिक मार्गदर्शिका याना मी भडावले होते तुर्कमेनियाची सरहद्द धर्मान्ध खोमेनीच्या धर्मसत्ताक इराणला लागूनच आहे, पण तुर्कमेनियाचे मुस्लीम आता समाजवादी प्रवाहात एकरूप होऊन गेले आहेत मुस्लीमा या कडवेपणाचे समाजवादी रूपांतर कसे झाले त्याबद्दलच्या अनेक प्रश्नाना साधार आणि प्रत्यक्ष प्रमाण दाखवून या मार्गदर्शकानी उत्तरे दिली होती. अश्काबादचा दौरा सपता सपता मार्गदर्शिकेने विचारले की,

'भारतातील स्त्रिया फार सुंदर आहेत म्हणे!'

'फार म्हणजे काय फारच!'

'पण म्हणजे किती?'

'म्हणजे इतक्या सुदर आहेत की, तुम्ही आपल्या नवऱ्याला हिंदुस्थानात पाठवू नका!' आणि मग आम्ही सर्वजण खोखो हसत असतानाच मी म्हणालो की, 'अश्काबादच्या वेशीवरील हा डोंगर ओलाडला की खोमेनीच्या इराणमध्ये जाऊ असे आपण म्हणालात— तुमच्या नवऱ्याला सजा करायची असेल तर त्याला डोंगरापलिकडे पाठवून द्या!' यावर पुनः आम्ही हसत राहिलो

रशियात आणि विशेषतः रशियाच्या मध्य आशियाई विभागातील राज्यात एक प्रश्न हटकून विचारतात—

'राजकपूरची नवीन भूमिका कोणती?'

'राजकपूर आता म्हातारा झाला, त्याची मुले हिरोची कामे करतात!

यावर त्यांना अचंबा वाटतो 'मै आवारा हूँ' ही ओळ ते म्हणून दाखवितात आणि त्यांची अशी कल्पना असते की, 'आवारा' त दिसणारा राजकपूर अजून तसाच आहे! पडित जवाहरलाल नेहरू, इंदिरा गाधी आणि राजकपूर ही तीन नावे सर्वसामान्य लोकाना माहीत असतात. राजकपूरला जर रशियात भारताचा राजदूत म्हणून पाठविले तर सध्या रशियाची जेवढी मदत भारताला मिळते त्याच्या दहापट मदत तो सहजी आणू शकेल! आजची मॉस्कोतील भारतीय वकिलात अगदी निरुपयोगी आहे. एकवेळ सर्वोच्च सत्ताधारी अॅण्ड्रोपोव्ह मॉस्कोतील भारतीयाची चौकशी करतील,पण मॉस्कोतील भारतीय वकिलात ढुकूनही पहाणार नाही!

रशियात भारताविषयी अथांग प्रेमभाव आहे. अमेरिका-ब्रिटन या देशांत

भारतीयाविषयी जितकी तुच्छता दाखविली जाते तितकाच आदर रशियात भारतीयाबद्दल आहे. त्याचा अनुभव अनेकदा आला. उझबेकीस्तानची राजधानी ताश्कंदमध्ये मी पुनःपुनः मागणी करून तेथील खाजगी मार्केट पहायला गेलो. रशियात जशी सरकारी मार्केट आहेत तशीच खाजगी मार्केटही आहेत. ताश्कंदच्या खाजगी मार्केटात पाहिले तर पिस्ते-अक्रोड बदाम यांचे ढीगच्या ढीग पसरलेले होते. शेंगदाण्यासारखा पसरलेला हा महाग मेवा पाहून मी तेथील विक्रेत्यांना खुणेने भाव विचारू लागलो. स्वस्ताईबद्दल आश्चर्य वाटून पुढे जायला निघताच त्याने विचारले, 'कुठले आहात ?' मी 'इंडिया' असे म्हणताच तेथील दोनचार विक्रेते लगेच पुढे आले आणि मुठी भरभरून बदाम–पिस्ते–अक्रोड त्यांनी आग्रहाने बांधून दिले! हा झाला रशियाच्या 'आशियाई' टापूतील अनुभव, पण मॉस्को–लेनिनग्राड येथेही असेच किस्से झाले. मॉस्कोतील लिफ्टमध्ये एका रशियन महिलेने पुतळ्यांची माळ गळ्यात घातलेली होती मी स्मिरनोव्हला इंग्रजीत म्हटले, 'या लिफ्टमधील रशियन महिलेने इंडियन स्टाईल माळ घातली आहे पहा!' नेमके त्या रशियन महिलेला इंग्रजी येत होते! हसत हसत मोठ्या अभिमानाने ती म्हणाली, 'इंडियन स्टाईल नव्हे–ही इंडियातूनच आणलेली माळ आहे! मला फार प्रिय आहे!'

पण भारतीयांबद्दलच्या रशियन जनतेच्या भावना आणि रशियाचा प्रवास करणाऱ्या भारतीयाचे वर्तन प्रगट करणारा एक विलक्षण किस्सा मी या दौऱ्यात ऐकला. हिटलरने सुरू केलेल्या दुसऱ्या महायुद्धातील रशियाचा सूत्रधार म्हणून मार्शल स्टालीन भारतीयांना फार परिचित आहे जर्मनीचे हिटलर, ब्रिटनचे विन्स्टन चर्चिल, अमेरिकेचे रुझवेल्ट आणि रशियाचे मार्शल स्टालीन यांच्याविषयी शेकडो पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. पण या स्टालीनची सोविएत रशियात आता जवळजवळ नामनिशाणीही उरलेली नाही. स्टालीनने हजारो विरोधक मारले आणि त्याच्या क्रूर कृत्यांमुळे रशियनांना स्टालीनचा तिरस्कार आहे आजही रशियाबद्दल ज्या भरमसाट कल्पना आपल्याकडे आहेत त्यांचे मूळ स्टालीनच्या कारकिर्दीतील आहे. पण तो काळ आता पूर्णपणे मागे पडला आहे या पार्श्वभूमीवर तो विदारक किस्सा पाहू या.

भारताचा एक पत्रकार व अन्य दोघे रशियाच्या दौऱ्यावर गेले होते. त्यापैकी एकाचे नाव स्टालीन होते! त्या तिघांनीच बाहेर पडून रशियन व्होडक्याचा (कडक दारू) समाचार एका हॉटेलात घेतला आणि परतताना मॉस्कोच्या स्टेशनात त्याची चुकामुक झाली. माहीतगार भारतीय निघून गेले आणि नेमका हा पत्रकार स्टालीन मागे राहीला व मोठमोठ्याने रडू ओरडू लागला. लोक जमले. त्यांनी नाव विचारले की हा पत्रकार सांगायचा, 'स्टालीन!' या नामोच्चाराबरोबर रशियन माणूस डोळे विस्फारायचा व दुसऱ्यांना बोलवायचा.

तेवढ्यात एक पोलीस आला. तोही नांव ऐकून थक्क झाला. पण त्याच-

वेळी त्या पत्रकाराच्या तोंडून 'इंडिया' असे येताच त्याने प्रसंगावधान राखून लोकांना सांगितले, 'स्टालीन, पण इंडियातील आहे! त्याची आपण काळजी घेतली पाहिजे!' यावर लोक तत्काळ पांगले व त्या पोलिसाने चौकशी करून भारतीय स्टॅलीनला सुखरूप त्याच्या हॉटेलात नेले! रशियातील भारतीयाविषयीची भावना अशी आहे आणि भारतीयांचा दौरा असा असतो!

रशियाने भारताला प्रेमादरच नव्हे तर अनेक तऱ्हेने मदत केली आहे. भिलई-सारखे प्रचंड पोलाद कारखाने, भारतीय भूगर्भातील तेलाचा शोध, वीजनिर्मिती, मिग विमानाचा कारखाना, अंतराळ विज्ञानात सहकार्य आदि अगणित सहाय्य करून भारतीय औद्योगिकरणाचा मूलभूत पाया रचण्यास फार मोठा हातभार लावला आहे. भारताला रशियावर अवलंबून न ठेवता भारतीयांना तंत्रज्ञान शिकवून स्वावलंबी केले आहे. बंगला देश युद्धात आणि काश्मिरच्या प्रश्नात रशियाने भारताला पूर्ण संरक्षण दिले आहे.

विविध क्षेत्रातील अत्युच्च व्यक्तींशी माझ्या मुलाखती झाल्या त्यांच्या मनात भारताविषयी प्रेमादर ओथंबून होता चीन आणि पाकिस्तान तसेच तुर्कस्तान हे रशियानजिकचे देश आज अमेरिकेच्या दोस्तीत असून या रशियाविरोधी दोस्तीमुळे भारताशी रशियाची मैत्री रहाणे भौगोलिक दृष्टया अपरिहार्यच आहे. शिवाय भारत हा रशियाचा शेजारी नाही तर शेजाऱ्याचा शेजारी आहे, आणि राजकारणात शेजाऱ्याचा शेजारी नेहमी दोस्त असतो. पण भारतीय नेते या मैत्रीचा उपयोग भारतासाठी पुरेपूर करून घेत आहेत असे मुळीच दिसत नाही. मॉस्कोतील भारतीय वकिलात तर झोपलेलीच असते. आज जेवढी मदत होते त्याच्या अनेकपट सहाय्य सुलभपणे मिळू शकेल. या दृष्टीने खास विचार व्हायला हवा आणि खास यंत्रणा उभारायला हवी.

: १२ :

# ख्रिस्ती धर्म, इस्लाम आणि हिंदू धर्म

जगात सर्वांत अधिक प्रसार ख्रिस्ती धर्माचा झाला. हा धर्म येशु ख्रिस्ताशी व त्याच्या बायबल धर्माशी पूर्णपणे बांधला गेलेला आहे. इतका की, बायबलमध्ये जे म्हटले आहे ते खोटे पाडणारे विज्ञान सामोरे येताच ख्रिस्ती धर्मगुरू तुटून पडले आहेत. याची उदाहरणे उदंड आहेत. कोपरनिकस ( १४७३–१५४३ ) या विख्यात वैज्ञानिकाने प्रथमतःच असे सत्य साधार सांगितले की, ग्रहमालेत सूर्य स्थिर असून पृथ्वी सूर्याभोवती फिरत आहे पण ख्रिस्ती चर्चनुसार पृथ्वी स्थिर होती. अर्थात येशू ख्रिस्ताने म्हणजेच प्रत्यक्षात अंतिम ईश्वरी प्रेषिताने जे सांगितले ते असत्य ठरताच ख्रिस्ती धर्मगुरू प्रक्षुब्ध झाले. म्हणून ख्रिस्ती धर्मगुरूंनी कोपरनिकसचा अनन्वित छळ केला यानंतर गॅलिलीओने ( १५६४–१६४२ ) हेच सत्य सांगितले तेव्हा त्याच्या मुसक्या आवळण्यात आल्या.पृथ्वी फिरत नसून स्थिर आहे असे सांगण्यास त्याला फर्मावण्यात आले. छळवादाने अगतिक होऊन गॅलिलीओ म्हणाला की, पृथ्वी स्थिर आहे ! आणि मागोमाग तो पुटपुटल्यासारखे उद्गारला, ‘जरी मी काहीही म्हटले तरी पृथ्वी फिरतच आहे !’ चार्लस डार्विन याने उत्क्रांतीचा सिद्धांत मांडला. अब्जावधी वर्षांच्या प्राणिमात्रांच्या उत्क्रांतीत माकड आणि माकडाच्या उत्क्रांतीत मानव निर्माण झाला असा त्याचा संशोधनपूर्वक सिद्धांत प्रसिद्ध होताच ख्रिस्ती धर्मगुरु ‘पाखंड–पाखंड’ असे किंचाळले.कारण येशू ख्रिस्त हा ईश्वराचा अखेरचा प्रेषित आणि ‘ईश्वराने एक दिवशी मानव निर्माण केला’ असे त्याने म्हटले होते.

म्हणजे बायबलमधील ज्ञानाचा अंतिमपणा डार्विनच्या सिद्धांताने खोटा ठरला. ईश्वराने एक दिवस मानवाची निर्मिती केली असे बायबल सागत असताना अब्जावधी वर्षांच्या उत्क्रांतीतून मानव पृथ्वीवर साकार झाला हा डार्विनचा सिद्धांत ख्रिस्ती धर्मगुरुंना कसा परवडणार? डार्विनचा 'ओरिजीन ऑफ स्पिसीज' हा ग्रंथ १८५९ मध्ये प्रसिद्ध झाला, पण लोकशाहीच्या एकोणिसाव्या शतकातही ख्रिस्ती धर्मगुरु शास्त्रज्ञांना हैराण करीत होते !

अमेरिकेतील एका कोर्टात काही वर्षांपूर्वी एक मजेदार खटला आला. शाळेतील मुलांना बायबलच्या आधारे सांगितले जाते की, ईश्वराने एक दिवस मानव निर्माण केला, पण त्याच वेळी डार्विनचा सिद्धान्त शिकविताना मुलांसमोर मांडले जाते की मानव हा अब्जावधी वर्षांतील उत्क्रांतीने साकार झाला. परिणामी मुलांच्या मनाचा गोंधळ होतो! पण मुलांचाच का! सर्वांचाच गोंधळ उडत आहे. येशू ख्रिस्ताला ईश्वराचा अखेरचा प्रेषित मानल्यानंतर त्याच्यानंतरच्या दोन हजार वर्षांत जी प्रचंड वैज्ञानिक प्रगती झाली आणि वैज्ञानिक सत्ये शाबित झाली त्याचा संघर्ष चर्चेशी होणे अटळच आहे धर्म आणि विज्ञान यांची अशी टक्कर होते याचे मूळ कारण असे की, एकाच व्यक्तीला 'अखेरचा प्रेषित' प्रत्यक्षात मानले गेले आणि त्याने जे सांगितले ते 'अंतिम ज्ञान' म्हणून मानले गेले. ख्रिस्ती धर्माची ही स्थिती आहे आणि ख्रिस्ती धर्मानंतर सहाशे वर्षांनी अवतीर्ण झालेल्या इस्लाम धर्माची हीच स्थिती आहे.

## मुसलमानी धर्म

इस्लाम धर्माचे मूलतत्त्व हेच आहे की ईश्वर एकच आहे (ज्याला अल्ला असे संबोधिले जाते) आणि महमद पैगंबर (इसवी सन ५७० ते ६३२) म्हणजे ईश्वरी ज्ञान देणारे अखेरचे प्रेषित होऊन गेले अखेरचे प्रेषित महमद पैगंबर यांनी जे सांगितले ते इस्लामचा एकमेव धर्मग्रंथ 'कुराण' यात समाविष्ट आहे. इस्लाम म्हणजे 'कुराण' आणि 'कुराण' म्हणजे इस्लाम' मुस्लीम धर्मीय असे मानतात की,

**ला इलाहि इल्लील्लाह । महमद रसूल लिल्लील्लाह**

म्हणजेच एकच अल्ला असून महमद त्याचे अंतिम प्रेषित आहेत. श्री. ना. सं. इनामदार यांनी भारतातील अखेरचा मातब्बर मोंगल बादशहा औरंगजेब याच्यावर 'शहेनशहा' नामक कादंबरी लिहीली आहे. सदर कादंबरीत एका नंग्या मुस्लीम फकीराचा प्रसंग रंगविला आहे. तो इतिहास असो किंवा नसो, पण कादंबरीतील मुस्लिम फकिर दिल्लीच्या चांदणी चौकात उभा राहून सांगू लागतो की महमद पैगंबर हे अखेरचे प्रेषित नव्हते! त्याचे असे म्हणणे असते की, 'ला इलाहि इल्लील्लाह' हे योग्य आहे, कारण ईश्वर एकच आहे. पण 'महंमद रसूल लिल्लील्लाह'

( महंमद अखेरचा प्रेषित आहे ) हे खरे नव्हे !! कुराणे शरीफमध्ये अंतिम ज्ञान सांगणाऱ्या अंतिम प्रेषिताला असे आव्हान दिले म्हणून या नग्या मुस्लीम फकिराला शहेनशहा औरंगजेबासमोर उभे करण्यात येते तेव्हा तो नंगा मुस्लीम फकिर बादशहाला म्हणतो, " महमद पैगंबर हा अखेरचा प्रेषित नाही. कारण या जगात शेवटचे असे काहीच असू शकत नाही सर्व अपूर्ण आहे असे असताना एक प्रेषित तेवढा अखेरचा आणि त्यानंतर प्रेषित होणारच नाही असे समजणे कोण्या बुद्धीचे लक्षण आहे ! ' यावर जो एकमेव जबाब इस्लाम धर्म देऊ शकतो तोच देण्यात आला. शहेनशहाच्या हुकूमाने फकिरास चांदणी चौकातच ठार मारले गेले ! सांगण्याचा मुद्दा असा की, ख्रिश्चन धर्म ज्याप्रमाणे बायबलला बांधला गेला आहे त्याप्रमाणेच इस्लाम धर्म कुराणाला जखडला आहे. यामुळे ख्रिस्ती धर्माप्रमाणेच इस्लाम धर्मांची अफाट वैज्ञानिक प्रगतीशी व नवनवीन प्रगट होणाऱ्या वैज्ञानिक सत्याशी टक्कर होत राहिली आहे

त्यातही कुराण आणि विज्ञान याचा संघर्ष अधिक तीव्र आहे, कारण कुराणात सामाजिक निर्बंधही घालून दिलेले आहेत. या नियमांमुळे पुरुषाला चार विवाह करता येतात. तीनदा ' तलाक असा शब्द उच्चारुन घटस्फोट घेता येतो. स्त्रियांना गोषात रहावे लागते. या उप्पर स्त्री - पुरुष समानता कशी येणार ? औद्योगिक क्रांतीनंतरची सर्व भांडवलशाही अर्थव्यवस्था ही व्याजा-वर आधारलेली असली तरी व्याज घेणे आणि देणे कुराणे शरी-फला मुळीच मंजूर नाही भांडवल निर्मिती व्याजाशिवाय कशी करणार आणि भांडवलाशिवाय कारखाने कसे स्थापन करणार ? समान नागरी कायदा कसा जारी होणार ? कुराणात सामाजिक निर्बंध आहेतच, पण जो वेगळे बोलेल त्याला ' काफीर ' म्हणजे शत्रू मानले जाते आणि काफिराची कत्तल ही पवित्र ठरविण्यात आली आहे. कुराणानेच ' जिहाद ' म्हणजे धर्मयुद्ध सांगितले आहे. ख्रिस्ती धर्मापेक्षाही इस्लाम धर्म हा अधिक कर्मठ व कडवा आहे, कारण कुराणाच्या वचनानुसार तो हातात तलवार घेऊन उभा आहे आणि त्याने सामाजिक नियमही अंतिमतः करुन ठेवले आहेत

सारांश, ख्रिस्ती धर्म आणि इस्लाम धर्म हे अफाट आणि बेफाट वैज्ञानिक प्रगतीतही न बदलणारे आहेत. 'अंतिम प्रेषिता'च्या तत्त्वामुळे वैज्ञानिक सत्याच्या प्रका शात त्यांचे धर्मगुरु उभे रहायला कधीही तयार होऊ शकत नाहीत कर्मठपणा आणि कडवेपणा याबरोबरच हे दोन्ही धर्म 'असहिष्णू' आणि 'आक्रमक ' आहेत.संपूर्ण जग-भर अत्यंत बुद्धीमान अशा ज्युंचा गेली जवळजवळ दोन हजार वर्षे ख्रिश्चन धर्माने छळ केला आणि इस्लाम धर्मीयही त्याच्या बाईटावर टपलेले आहेत ख्रिस्ती धर्माचे मिश-नरी हे जगभर धर्मप्रसार करीत आहेत तसेच इस्लामी राज्यकर्तेही प्रत्येकाला इस्ला मची दीक्षा देण्याची संधी कधीही सोडत नाहीत. ख्रिस्ती मिशनरी प्रेमाने, परन्तु

कीने, द्रव्याने जो धर्म प्रसार करू पहातात तोच धर्मप्रसार इस्लामी राज्यकर्ते तलवारीने करीत आले आहेत. कर्मठपणा पाकिस्तानमध्ये इतका की, पाकिस्तानी हुकूमशहा प्रेसिडेंट झिया आणि इराणचे खोमेनी हे इस्लामचे राज्य म्हणजेच कुराणे शरीयचे राज्य अमलात आणत असून, स्त्रियांना उजळ माथ्याने साधी नोकरी करणेही या दोन इस्लामी राष्ट्रांत शक्य नाही! पाकिस्तानी महिला हॉकी संघ उत्तम तयारीचा असूनही त्याला पुरुष प्रेक्षकांसमोर खेळायला बंदी आहे आणि म्हणून या संघाला आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भाग घेता येत नाही! विसावे शतक संपत आले असतानाही असले निर्बंध फक्त इस्लामी धर्मसत्ताक राज्यांतच असू शकतात.

## हिंदू धर्म—अखंड परिसंवाद

या पार्श्वभूमीवर हिंदू धर्माचा विचार करता हिंदू धर्माचे स्वरुप सर्वस्वी वेगळे आहे किमान सात हजार वर्षांचा इतिहास असलेल्या हिंदू धर्माचा एकमेव असा धर्मग्रथच नाही! वेदांना धर्मग्रथ मानायचे काय? ब्राह्मणग्रथ हेच धर्मग्रंथ ठरवायचे काय? उपनिषदे हाच धर्म आहे काय? स्मृतींचे स्थान काय? श्रीकृष्णाने रणभूमीवर अर्जुनाला सांगितलेली 'भगवद्‌गीता' म्हणजेच हिंदु धर्मग्रथ आहे काय? या सर्व प्रश्नांची उत्तरे 'नाही' अशीच द्यावी लागतात, कारण हिंदुंचा एकमेव धर्मग्रथच नाही! याचे कारण हिंदुंचा 'अंतिम प्रेषित' कुणीच नाही. हिंदू धर्माचे हे सर्वात मोठे वैशिष्ट्य आहे. हिंदू धर्म हा परिवर्तनशील आहे आणि नवीन ज्ञानाचे स्वागत करणारा आहे यामुळेच हिंदूधर्मातील अनिष्ट चालीरितीही रक्तपाताशिवाय सुधारकांनी नाहीशा केल्या. श्रीकृष्णाने अर्जुनाला आपण अखेरचा प्रेषित असल्याचे सांगितले नाही किंबहुना अखेरचा प्रेषित मी नाही हेच सांगितले. 'ज्या ज्या वेळी धर्माला ग्लानी येते त्या त्या वेळी ईश्वर अवतार घेतो' असे श्रीकृष्णाने स्पष्ट करून अखेरच्या प्रेषिताची भूमिका नाकारली हा श्रीकृष्णाचा हिंदू जगतावरील सर्वात मोठा उपकार आहे! यामुळे हिंदू धर्म हा एक न संपणारा परिसंवाद आहे! अंतिम प्रेषित व अंतिम ज्ञान सांगणारा धर्मग्रंथ या कल्पना हिंदू धर्माने साफ फेटाळल्या आहेत. म्हणूनच हिंदू धर्म आणि विज्ञान तसेच हिंदू धर्म आणि पुरोगामी विचार यांचा रक्तपाती संघर्ष कधी झाला नाही आणि होणार नाही.

हिंदू धर्म हा जसा बदलणारा आणि विज्ञानाचे स्वागत करणारा आहे त्याच-प्रमाणे सहिष्णु आहे. आक्रमक तर नाहीच नाही. वेगळे मत मांडणाऱ्यांची हिंदुंनी कत्तल कधीही केली नाही, उलट त्या वेगळ्या मताचा विचार केला तसेच आदरही केला. त्यामुळेच सिद्धार्थ गौतम बुद्धाला भारतात कुठेही कसलीच आडकाठी झाली नाही गौतम बुद्धाच्या अनुयायावर हिंदू धर्मीय तलवार घेऊन धावले नाहीतच, पण हिंदू धर्मात गौतम बुद्धाच्या प्रकाशात सुधारणा करण्यात आली आणि बुद्धाला विष्णूचा अवतार ठरविण्यात आले!

## कडवेपणाचा अभाव

तथापि अंतिम प्रेषिताचा नि अंतिम धर्मग्रंथाचा अभाव, नवीन विचारांचे नि विज्ञानाचे स्वागत करणारी सहिष्णुता यामुळेच हिंदू धर्मात कधीच कडवेपणा नि कर्मठपणा आला नाही. शहेनशहा औरंगजेब दिल्लीतील सर्व वैभव सोडून आणि कुराणात सांगितलेला ' जिहाद ' पुकारून महाराष्ट्राच्या दऱ्याखोऱ्यात नि भागाभागात सत्तावीस वर्षे इस्लामचा प्रचार करीत झगडत राहिला याचे कारण कुराणातून आलेला कडवेपणा ! शिवाजीराजांच्या असामान्य नेतृत्वामुळे महाराष्ट्राचा मराठाही औरंगजेबाशी सत्तावीस वर्षे झुजत राहिला आणि अखेर औरंगजेबाचे दफन महाराष्ट्रातच झाले पण हिंदुची ही अपूर्व ताकद बचावात्मक नि अन्यायाच्या प्रतिकाराची होती. औरंगजेबानंतर एक शतकभर म्हणजे अठराव्या शतकात भारतात हिंदुंचीच सत्ता होती पण हिंदुनी कर्मठ कडवेपणाने एकदाही धार्मिक आक्रमण केलेले नाही ! ख्रिश्चन मिशनऱ्यांनी अनेक हिंदुना बाटविले आणि इस्लाम राज्यकर्त्यांनी हिंदुना मुसलमान केले. पण हिंदुची जास्तीत जास्त मजल शुद्धीकरणापर्यंतच गेली ! म्हणूनच हिंदुचा धर्म हा त्यांची घरे आणि देवळे यातच मर्यादित राहिला असून त्याने विज्ञानाला किंवा राष्ट्रीय पुरोगामी धोरणाला कधीच आडकाठी केलेली नाही. हिंदू धर्म संघटनात्मक नसून व्यक्तीच्या उद्धाराचा मार्ग दाखविणारा आहे. त्याचा राष्ट्रहिताच्या पुरोगामी धोरणांना विरोध असूच शकत नाही

कडवेपणा आणि वेगळ्या मताचा विद्वेष नसल्यामुळेच हिंदुची कर्मठ नि आक्रमक संघटना कधीही होऊ शकलेली नाही. हिंदूमहासभा सदैव नगण्य पक्षच भारतात राहिला स्वातंत्र्यवीर सावरकरांसारखा असामान्य नेता लाभूनही हिंदुमहासभा उपेक्षणीयच ठरली. याउलट महात्मा गांधींसारखे आणि पंडीत नेहरूसारखे उदारमतवादी नेते मिळूनही मुसल्मानांनी पाकिस्तान तर घेतलेच, पण भारतातही ' वंदे मातरम् ' म्हणायला भारतीय मुस्लीम तयार नाहीत समान नागरी कायद्याला तयार नाहीत कुटुंब नियोजनाला मान्यता देणार नाहीत, वगैरे वगैरे ' कारण कुराणे शरीफ !

हिंदु धर्म, मुस्लीम धर्म आणि ख्रिश्चन धर्म यांची अशी पार्श्वभूमी लक्षात घेतल्यावर, आपण भारतातील भयावह परिस्थितीकडे वळू या.

## बी. के. नेहरूंची कबुली

भारतातील सर्वोच्च सत्ताधाऱ्याच्या वर्तुळातील एक उच्चपदस्थ आणि सध्याचे जम्मू काश्मीरचे राज्यपाल श्री बी. के. नेहरू यांनी नवी दिल्लीत १७ मार्च १९८३ रोजी जे भाषण केले त्याची पुस्तिका उपलब्ध आहे ते म्हणतात की, भारतातील समिश्र अर्थव्यवस्था फलदायी ठरलेली नाही आणि म्हणून ' वेगळा विचार [illegible] [illegible] [illegible] भारताचे राष्ट्रीय उत्पन्न साडेतीन टक्क्यांनी तर लोकसंख्या अडीच टक्क्यांनी वाढत आहे. म्हणजे जास्तीत जास्त एक टक्का

विकास होत आहे,पण तोही भांडवलदाराचा श्रीमंताचा ' आहेरे वर्ग ' खिशात टाकत आहे, कारण नियोजनाचा फायदा तेच घेऊ शकतात. मग गरीब तेथेच राहिले आहेत काय ? नाही, ते अधिकच खोलवर बुडत आहेत,कारण सरासरी दरसाल साडे-पाच टक्क्यांनी महागाई स्वातंत्र्याच्या पस्तीस वर्षांत वाढली आहे ! खुद्द श्री बी. क. नेहरू असे सांगतात ! लांचलुचपत–भ्रष्टाचार इतका माजला आहे की हवेतही पसरला आहे ! श्री. बी. के नेहरू यांचा हा अहवाल आपण पाहिला, पण अशा पुराव्यांची गरजच नाही इतकी ही दुस्थिती प्रत्येक भारतीयाच्या माहितीची आहे !

श्री बी. के नेहरू यांनी भारतातील भयानक परिस्थिती मांडल्यावर अखेरीस असे सूचित केले की, नियंत्रणाचा मार्ग सोडून दिला पाहिजे. म्हणजेच भांडवल-शाहीला अधिक वाव द्यावा ! अमेरिकन भांडवलशाहीनेही प्रचंड विकास साधला आहे. हे खरे आहे, पण तो मार्ग भारताला कधीही पत्करता येणार नाही. कारण अमेरिकन भांडवलशाहीत एकेका भांडवलदाराची प्रचंड जमीन आणि प्रचंड कारखाने आहेत पण ज्या भारतात ऐंशी कोटी लोकसंख्या आहे त्या भारतात टाटा – बिर्ला – मफतलाल यांना हजारो एकर जमीन दिली तर इतरांनी काय माती खायची ? विसावे शतक सरेल तेव्हा भारताची लोकसंख्या शंभर कोटी म्हणजे एक अब्ज होईल. प्रचंड मालकीवर आधारलेली अमेरिकन भांडवलशाही भारताच्या या भूमीत रुजूच शकत नाही हाच निष्कर्ष अमेरिका तटस्थपणाने पाहिलेल्या लोकांचा आहे एके काळचे अग्रणी समाजवादी विचारवंत श्री. अशोक मेहता यांना पत्रकार श्री शि. शं. वेद्रे यांनी असा प्रश्न विचारला होता की, ' अमेरिकन भांडवलशाहीचा मार्ग आपणास का नको ? त्या मार्गानेही अफाट प्रगती झालीच आहे ! त्यावर श्री. मेहता म्हणाले होते की, ' अखंड भारताच्या जमिनीच्या दुप्पट जमीन द्या आणि फाळणीनंतरच्या खंडित भारतातील लोकसंख्येच्या निम्मी लोकसंख्या द्या ! मगच अमेरिकन मार्गाचा विचार करता येईल ! ' या एकाच उत्तरात सर्व काही सामावले आहे.

या विवेचनाचा निष्कर्ष असा की, संमिश्र अर्थव्यवस्था भारताला पुढेच नेत नाही, अमेरिकन भांडवलशाही भारतात उगवूच शकत नाही, मग उरले काय ? उरला आहे रशियन पद्धतीचा व्यवहारी आणि राष्ट्रवादी समाजवाद–ज्या समाज वादाने मार्क्सचे पोथीप्रामाण्य फेकून दिले आहे आणि स्वतःचा अनुभवसिद्ध व्यवहारी समाजवाद निर्माण करून रशियाला समर्थ व संपन्न बनविले आहे ! इतके समर्थ की, सोविएत रशियाचा पूर्वीचा सत्ताधारी निकीता क्रुश्चेव याने मर यूनोत जगाला जोडा काढून दाखविला आणि रशियाचे आजचे सत्ताधारी आंद्रेपोव यांनी समोर बसलेल्या अमेरिकन सिनेटरना ऑगस्ट १९८३ मध्ये सज्जड दमच दिला–

रशियन पद्धतीचा हा समाजवाद भारताला व बहुसंख्य हिंदू समाजाला योग्य आहे काय ? याबाबत विचार पुढील लेखात करू या.

: १३ :

# पंचमहाभूतांवर रामबाण

रशियन पद्धतीचा व्यावहारिक समाजवाद भारताचे प्रश्न सोडवील काय? त्यासाठी भारतासमोरील पाच अक्राळविक्राळ प्रश्न-पंचमहाभूते आपण विचारात घेऊ या.

१ ) भारतावरील सर्वात मोठे संकट लोकसंख्येतील अनिर्बंध वाढीचे आहे. कुटुंब नियोजन सक्तीचे केले नाही तर लोकसंख्येतील वाढ विकासाला खाऊन टाकणार नि भारताचे अफाट दारिद्र्य-अज्ञान नाहीसे होणार नाही. ज्याला हे समजत नाही असा एकही नेता भारतात नाही. पण एकाचीही कुटुंबनियोजन सक्तीचे करावे असे सुचविण्याचीही हिंमत नाही ! कारण भारतात जवळ जवळ बारा कोटी मुस्लीम आहेत आणि कुराणे शरीफला जे मंजूर नाही ते मुस्लीम मानणार नाहीत. मुस्लीम मानणार नाहीत म्हणून, संख्याबळ कमी होऊ नये या कारणासाठी हिंदू मानणार नाहीत. निवडणुकी जिंकावयाच्या असल्याने पुढारी बोलणार नाहीत. म्हणजे लोकसंख्येतील वाढ, दारिद्र्यातील वाढ आणि हिंदु-मुस्लीम यांच्यातील वितुष्टात वाढ हे एक महाभूत अधिकाधिक नाचत रहाणार.

रशियन पद्धतीच्या समाजवादातच हा प्रश्न सुटेल. कारण मुस्लीम धर्म जितका कडवा नि माथेफिरू आहे तितकाच लेनिनचा समाजवादही कडवा नि माथेफिरू आहे. एका हातात तलवार आणि दुसऱ्या हातात कम्युनिस्ट कार्यकर्त्यांचा प्रचार अशी आयुधे घेऊन लेनिनच्या समाजवाद्यांनी मध्य आशियातील महा कर्मठ

मुस्लीमांना राष्ट्रीय समाजवादी प्रवाहात आणून सोडले आहे. स्त्रियाचा गोषा नाहीसा केला. त्याना शिक्षण दिले आणि आज त्या स्त्रिया मोठमोठ्या हुद्यांवर कामे करीत आहेत. त्याची जबर किंमतही मोजली. गोषा दूर करण्याचा प्रचार ज्या कम्युनिस्ट महिला करीत त्याना ठार करण्यात आलेच, पण ज्यांनी गोषा सोडला अशाही मुस्लीम महिलांना प्रतिगाम्यानी व मौलवींनी दगडांनी जिवे मारले. लाल लष्कर पाठवून बडाळी मोडावी लागली. कर्मठांचा नि:पात करण्यात आला. आता स्त्रिया अशा निर्भय सुशिक्षित झाल्या आहेत की त्याना गोषा घ्या असे सांगितले तर त्याच तुटून पडतील रशियन समाजवादात मशिदी आहेत आणि मौल्वीही आहेत. किंबहुना कुराणाची प्राचीन प्रतही मिळवून ताश्कंदच्या म्युझियममध्ये ठेवलेली आहे. पण लेनिनची शिकवण हीच कुराणे शरीफची शिकवण आहे असेच दर मशिदीत मौलवी सागतात ! याचे कारण असे की, पाच वर्षांचा अभ्यासक्रम पुरा केला तरच मौलवी म्हणून सरकारी मान्यता मिळते म्हणजेच लेनिनचा अभ्यास केल्याशिवाय कुणालाही सोविएत युनियन मौलवी म्हणून मुळी मान्यताच देत नाही ! धर्म हा घरापुरता आणि चर्च–मशिदीपुरता झाला आहे समाजवादी राष्ट्रीय धोरणाच्या आड येणार नाही अशा प्रकारे धर्मपालनाला घरात तसेच चर्च मशिदीत पूर्ण मुभा आहे समाजवादी समाजरचनेशी विसंगत असे काहीही चर्चमध्ये अथवा मशिदीतही सांगता येत नाही आणि त्याबाबत करडी नजर ठेवण्यासाठी एका मंत्र्याच्या अधिकाराखाली खास मंडळच आहे रशियन समाजवादाने मुस्लीम व ख्रिश्चन जनतेची धर्मवेड्या मौलवींच्या नि नेत्यांच्या कचाट्यातून मुक्तता करून या जनतेचे विशेषत. मुस्लीम स्त्रियांचे प्रचंड कल्याण केले आहे

सर्व नागरिकांना समान कायदा, स्त्री पुरुष समता, प्रत्येक स्त्रीला व पुरुषाला सक्तीचे शिक्षण, प्रत्येकाला जबर राष्ट्राभिमान या सर्व गोष्टी सोविएत रशियात आहेत त्याकरिता प्रथम प्रचार आणि जरूर तेथे हत्यार यांचा वापर करण्यात आला. राष्ट्रीय समाजवादी धोरणाविरुद्ध एक शब्द कुणी वेगळा उच्चारूच शकत नाही. म्हणजे आजच्या अफाट वैज्ञानिक विकासाच्या वेगात ज्या गोष्टी पायाभूत आहेत त्या सर्वच रशियात अमलात आल्या आहेत–रशियाच्या मध्य अशियात अत्यंत कर्मठ मुस्लीम असूनही ! परिणामी अफाट प्रगती झाली आहे आणि घराघरात समता सुबत्ता नांदू लागल्याने लोक सुखी झाले आहेत केवळ दडपणाने लोक दबलेले नसून समृद्धी दारी आल्याने समाजवादात सामील झाले आहेत रशियन समाजवादाचा प्रवेश झाल्यामुळे अफगाणिस्तानात पचवीस वर्षांनी हेच दृश्य–स्त्रियाही डॉक्टर-इंजिनियर शास्त्रज्ञ-तंत्रज्ञ होऊन निर्भयपणे वावरत आहेत आणि बेकारी नष्ट झाली असून सर्वांना अन्न-वस्त्र-निवारा शिक्षण विनामूल्य लाभत आहे असे दृश्य काबुलच्या रस्त्यांवर पाकिस्तानच्या गोषातील महिलांना पहायला मिळेल !

हिंदूना आणि हिंदूमहासभेला हेच हवे ना? देशाला याचीच आवश्यकता आहे ना? समाजवादात जशा मशिदी आहेत, चर्चेस आहेत, तशीच देवळेही रहातील हिंदू धर्म हा सदैव घरापुरता आणि देवळापुरताच राहिला आहे हे आपण पाहिलेच. हिंदू धर्म आक्रमकही नाही आणि राष्ट्रीय समाजवादी धोरणाच्या आड हा धर्म येत नाही. किंबहुना समाजवादी धोरणाला हवी तितकी पुष्टी हिंदू प्राचीन ग्रथांतूनच मिळते म्हणून समाजवादात हिंदू धर्माचे काडीमात्र बिघडणार नाही आणि आजवर जे बिघडले आहे व आजही बिघडत आहे ते दुरुस्त होईल. मुस्लीम व ख्रिश्चन स्त्री-पुरुषांचीही धर्मवेड्यांच्या आणि माथेफिरूंच्या कचाट्यातून मुक्तता होऊन सर्वजण राष्ट्रीय समाजवादी प्रवाहात सामील होतील. तेच आणि तेवढेच हिंदूंना हवे आहे नि मुस्लीम-ख्रिश्चन जनतेच्याही तेच हिताचे आहे. विशेषतः मुस्लिम जनता धर्मगुरुच्या कचाट्यात असल्याने बहुसंख्य हिंदुवरून राष्ट्रवादी समाजवादी नेतृत्वाची अपेक्षा करता येते.

## बकासूर भांडवलदार

२) मूठभर मक्तेदार भांडवलदारांची प्रचड वाढती संपत्ती आणि सत्ता हे पच-महाभूतातील दुसरे महाभूत भारताच्या छातीवर बसले आहे. स्वराज्य पॉल यांनी नुकतेच सांगितले की, 'सार्वजनिक अर्थ पुरवठा संस्थानी जी सत्तावीस हजार कोटी रुपयाची गुतवणूक केली तिचा फायदा फक्त अकरा बड्या भांडवलदार घराण्यानी घेतला आहे! खुद्द त्यांचे भांडवल १४८ कोटी रुपयाचे होते.' (पहा 'नवशक्ती'तील काल-प्रवाह–२२ ऑगस्ट) जर स्वराज्य पॉलबद्दल संशय असेल तर या वर्षी महाराष्ट्र दर्शनाच्या दौऱ्यावर असलेले नेते शरद पवार काय म्हणतात ते पाहू या. त्यानी सांगितले की, 'टाटांच्या उद्योगात दोनशे कोटी भांडवल घालून तीन हजार लोकाना काम देण्यापेक्षा धरणे बांधून शेती सुधारा' म्हणजे आज नियोजनाच्या नावाखाली भांडवल-दारांना अधिकाधिक फुगविण्याचे, सरकारी नेत्यांना-अधिकाऱ्याना 'फायदेशीर' काम चालले आहे! मूठभर मक्तेदार भांडवलदार म्हणजे बकासूर असून ते गरिबांना खायला काही ठेवत नाहीतच, शिवाय अफाट काळा पैसा हाती असल्याने लाचलुच-पतीची गटारगगा संपत्तीच्या पर्वतांतून वाहू लागते. लाचलुचपतीने किडलेले सरकार व नोकरशाही, पैशामुळे खरेदी केलेले बोलणारे–लिहिणारे तथाकथित बुद्धिमत ही प्रचड भुते यांच्याच थैलीतून बाहेर पडून आज थैमान घालीत आहेत.

विख्यात उद्योगपती कमानी कुटुबिय यांच्याबद्दलच्या ऑक्टोबर १९८३ मधील बातम्या वाचा. हसमुख कमानी ४०० कोटी स्वीस फ्रँक्स [दोन हजार कोटी रुपये] घेऊन कॅनडात स्थायिक व्हायला पळाले! त्यांच्या कुटुंबियाच्याही कोट्यावधी रुपयाच्या भानगडी उजेडात आल्या रसिक आर कमानी यांना मुंबईत पकडताच बंगलोरचा वकील विमानाने आला व 'हृदयविकाराचे कारण सांगून' एक लाख

रुपयांच्या जामिनावर रसिक कमानींना सोडवून परतला! हिंदुस्थानातील ही भांडवलशाही उत्पादन वाढीसाठी नि तंत्र विज्ञानासाठी प्रयत्नशील नसून, सट्टाबाजारी भांडवलशाही आहे. त्यांचा प्रचंड काळा पैसा सर्व समाजाला पोखरत आहे.

समाजवादात एका फटक्याने या बड्या भांडवलदारांची खाजगी मालकीच नष्ट होईल आणि या थैलीतून जन्मलेली भुते भांडवलशाहीबरोबरच खतम होतील. खाजगी मालकी जरूर राहील, कामाप्रमाणे व गुणवत्तेप्रमाणे दाम मिळेल, पण कुणा एकाला इतरांची पिळवणूक व लूट करता येणार नाही.

हिंदू धर्माची याला कधी हरकत होती? 'सहनाभवतु–सहवीर्यं करवावहै' ही वाणी हिंदू धर्मानेच घुमविली ना? कुत्र्यालाही समान लेखून त्याच्यासाठी स्वर्गही झिडकारणारा धर्मराज हिंदुंचेच आदरस्थान आहे ना? कुत्र्याच्या तोंडातील भाकरीला तूप लावायला धावलेला नामदेव आमचा लाडका संत ना? जे जे वांछिल तो ते लाहो, असे पसायदान मागणारा ज्ञानेश्वर आमचा आदर्श आहे ना? गरिबांना अन्न देण्याकरिता कोठार संपविणारा दामाजीपंत हिंदुना प्रिय आहे ना? मग ज्यामुळे माणूस माणसाला राबवून आणि फसवणुकीच्या मार्गाने काळा पैसा उभारीत थैलीशहा बनतो ती उत्पादन साधनाची खाजगी मालकी संपविली तर हिंदुंनी त्याचे स्वागतच केले पाहिजे.

स्वतः राबण्यापुरते शेत, स्वतः काम करण्यापुरते दुकान यांची मालकी व्यवहारी समाजवादात नष्ट होत नाही उलट त्यांना उत्तेजन मिळते पण टाटा–बिर्लांऐवजी, भलत्या कल्पनांमुळे पन्नास पावले इतक्याच शेत जमिनीचा मालक आणि दहा बाय दहा फूट दुकानाचा मालक हेच समाजवादाचे नांव उच्चारताच घाबरून जातात! व्यवहारी समाजवादात त्याचे शेत व दुकान त्याचेच राहील, कारण स्वयरोजगाराला मदत उत्तेजनच दिले जाईल. गैरसमजाना जबाबदार झापडे घातलेले पोथीवाले भारतीय कम्युनिस्ट आहेत. अंतिम कम्युनिझम फार दूरचे उद्दीष्ट असताना त्या कम्युनिझमच्या कल्पना ग्रामीण भागात मांडणे हेसुद्धा घातक आहे असे खुद्द लेनिननेच बजावले असताही [कलेक्टेड वर्क्स, खंड ३३–पाने ४६२–४६६] आणि आजही रशियात कम्युनिझम तितकाच दूर असताही, भारतीय कम्युनिस्ट मार्क्सच्या पोथीप्रामाण्यातच डोके खुपसून बसले आहेत. वास्तविक रशियन समाजवादात व्यवहारी शहाणपणा आहे, पुस्तकी कर्मठपणा नाही! एरवी अमेरिकेला रशियाची एवढी धास्ती घ्यावी लागली नसती!

## जातीयताही जाणारच

३) हिंदू धर्मातील जातीयता हे भारताला छळणारे तिसरे पंचमहाभूत आहे. "जी जात नाही तिला जात म्हणतात' अशी व्याख्याच केली जाते. ही जातीयता आर्थिक विषमता, शैक्षणिक विषमता आणि सामाजिक विषमता या तीन पायावर

उभी राहिली आहे. समाजवादात प्रत्येकाला विद्यापीठासकट मोफत शिक्षण आणि दहावीपर्यंत सक्तीचे समान शिक्षण मिळेल. प्रत्येकाला शैक्षणिक गुणवत्तेप्रमाणे आणि कामाप्रमाणे दाम मिळेल. त्याचवेळी रशियात ज्याप्रमाणे खानेसुमारीतही धर्माची नोंद केली जात नाही त्याचप्रमाणे भारतातही धर्माची व जातीची कुठेही नोंद रहाणार नाही. मग जातीयता एका पिढीत कोसळल्याशिवाय राहील कशी? समान संधी आणि समान प्रतिष्ठा ही तत्त्वे समाजवादी नेत्यांना श्वासासारखी आहेत त्यापुढे जातीयता टिकणारच नाही आजचे नेते भारतात जातीयता आणि धार्मिक वितुष्ट निवडणुकी जिंकण्यासाठी पोसत आहेत पण समाजवादी नेत्यांना सर्वात प्रखर विरोध जातीयतेला करावाच लागेल.

शिवाय कोणत्याही सरकारी अर्जात ज्या आडनांवात जात लपलेली असते ती आडनांवेही उडविता येतील. राम, कृष्ण, भीम, अर्जुन, द्रौपदी यांना कधी आडनावे लागली नाहीत, मग आताच काय नडले आहे?

४) विकासात अनेक अडथळे आणि विकासाची मदगती हे भारतातील चौथे महाभूत असून समाजवादात या महाभूतावर सर्व दिशांनी प्रहार होतील. आजच्या अद्भूत वैज्ञानिक प्रगतीमुळे प्रचंड नियोजनाद्वारे झपाट्याने विकास केल्याशिवाय कोणत्याही राष्ट्राला गत्यंतर नाही. पण त्यासाठीच नियोजन सर्वंकष हवे आणि त्याच्या आड जे जे येईल— मग कोर्टात मनाई हुकुमासाठी धांव घेणारे खाजगी हितसंबंध असोत किंवा धार्मिक आडमुठेपणा असो—ते ते चिरडले जाईल. यामुळेच नियोजन निश्चितपणे अमलात येईल. नियोजनाचा लाभ मूठभर भांडवलदारांनी घेण्याचा प्रश्नच उरत नाही, कारण भांडवलशाही संपवूनच समाजवाद सुरू होतो.

५) फुटीरता भारतात इतकी आहे की, आकाशच फाटल्यासारखी परिस्थिती आहे. हे एक महाभूत आसाम-पंजाबपासून तामिळनाडू-कन्याकुमारीपर्यंत भूकंपच घडवित आहे. समाजवाद हा त्यावर इलाज आहे. समाजवाद हा राष्ट्रवादालाच पोसतो असे आता रशियात व चीनमध्ये सिद्ध झाले असून आंतरराष्ट्रीय कम्युनिझमचा मार्क्सवादी सिद्धांत मार्क्सच्याच थडग्यात पुरला गेला आहे. समाजवादात फुटीरता हा सर्वांत मोठा गुन्हा आहे. समाजवादात राष्ट्र समर्थ सपन्न होते आणि केंद्र सरकार हे इतके बलशाली होते की, फुटीरतेला तोंड काळेच करावे लागते. या अफाट सामर्थ्यातून निसर्गतःच राष्ट्रवाद संचार करू लागतो.

हिंदुस्थानातील तथाकथित बुद्धिमंतांचा एक वर्ग असा आहे की, त्याला 'अमेरिकन लेटेस्ट ॲथॉरिटी क्वोट करून आर्ग्यु केल्याशिवाय अपीलच होत नाही!' म्हणून केवळ त्यांच्यासाठी ॲदम श्री उलाम यांच्या 'दि अनफिनिश्ड रेव्होल्यूशन' या पुस्तकातील निरीक्षण सादर करतो. श्री. ॲदम हे अमेरिकेचे हार्वर्ड विद्यापिठात प्राध्यापक असलेले विख्यात रशिया तज्ञ आहेत. ते म्हणतात की,

'राष्ट्रप्रेम ही आजच्या रशियातील प्रचंड शक्ती आहे हा मार्क्सवाद नव्हे, पण याच राष्ट्रप्रेमामुळे दुसरे महायुद्ध रशियाने जिंकले.'( पान २३७ )

कुणाला आवडो किंवा न आवडो, पण समाजवाद या देशात आल्याशिवाय रहाणार नाही. कारण त्याशिवाय प्रचंड सामर्थ्यवान होण्याचा भारताला दुसरा मार्गच नाही हिंदू समाजाने समाजवादाला भिण्यासारखे काहीही नाही, कारण हिंदू धर्माशी समाजवादी तत्त्वे सुसंगत आहेत. धर्म ही अफू आहे असे कार्ल मार्क्सने सांगितले, पण कार्ल मार्क्सचा ग्रंथ म्हणजे बायबल किंवा कुराणे शरीफ नव्हे! रशियाने स्वतःचा व्यवहारी समाजवाद अमलात आणला आहे आणि धर्माचे स्थान घरांत व विविध प्रार्थना स्थळांत मर्यादित राखले आहे चीनमध्येही मार्क्सवाद नसून माओवाद आहे. भारतीय समाजवाद भारताशी जुळता असेल समाजवादात हिंदू धर्मातील तत्त्वेच असून ती साकार होतील, जळमटे झाडली जातील, धर्म अबाधित राहील आणि हिंदू धर्मावर इस्लामी व ख्रिस्ती धर्मवेड्यांची जी आक्रमक वाकडी नजर आहे तिचा बंदोबस्त होईल. ख्रिस्ती धर्माला अनेक राष्ट्रे आहेत, इस्लाम अनेक राष्ट्रांत आहे पण हिंदूना फक्त भारताचाच आश्रय आहे त्यांना भारतातच जगायचे आहे व भारतातच मरायचे आहे. भारत बलदंड झाला नाही तर भारताबरोबरच हिंदूना मरडून निघावे लागेल.

## हिंदूंचे ऐतिहासिक कर्तव्य

म्हणून मला असे प्रतिपादन करावयाचे आहे की हिंदूनीच हिरीरीने समाजवादाचे स्वागत का करू नये? धर्मवेड्या नेत्यांच्या प्रभावाखाली जे नाहीत त्या हिंदूंचेच हे इतिहासदत्त कार्य नाही काय? हिंदुसभेच्या विहीरीत बेडूक उड्या न मारता,स्वातंत्र्यवीर सावरकरांनी बोटीतून उडी मारली त्या पराक्रमाचे तेच तेच रसाळ वर्णन त्याच त्याच श्रोत्यासमोर व्यासपीठावर स्वतः उड्या मारीत केले म्हणजे कर्तव्य संपले असे न मानता, ज्यामुळे नैराश्य व शिथिलता झटकली जाऊन हिंदू समाज विजीगिषु बनेल असा समाजवाद का स्वीकारू नये? समाजवादाचे नेतृत्व हिंदूंच्याच हाती राहील, कारण कुराण आणि बायबल याचे समाजवादाशी जमूच शकत नाही. ज्यांच्यावर धर्मवेडाचा प्रभाव आहे ते प्रागतिक नेतृत्व देऊ शकत नाहीत याउलट समाजवादात असे काहीही नाही की, जे हिंदूना मान्य नाही. म्हणून समाजवादी चळवळीत हिंदूच अग्रणी रहाणे हे अपरिहार्य आहे समाजवादात धर्म लोप पावेल असे मानण्याचे बिलकूल कारण नाही. उलट मुस्लिमांचे व ख्रिश्चनांचे आक्रमक धर्मवेड लोप पावेल. हिंदूना तेच हवे आहे. समाजवाद हा मुस्लीम जनतेच्या, मुस्लीम स्त्रियांच्या, ख्रिश्चनांच्या विरोधासाठी नसून त्यांची कर्मठ वेडातून मुक्तता करण्यासाठी आणि त्यांचीदेखील अफाट प्रगती करून सर्वांना राष्ट्रवादी प्रवाहात आणण्यासाठी आहे पण हे कामही हिंदूच करू शक-

तील, कारण हिंदू धर्म समाजवादाशी सुसंगत असून धर्मवेड्याच्या जोखडाखाली हिंदू नाहीत भारतीय समाजवाद हा जितका समाजवाद असेल तितकाच भारतीय असेल पण हिंदू जर समाजवादाच्या आंदोलनात अग्रणी राहिले नाहीत तर ? तर राष्ट्राच्या समाजवादी उद्धाराचे तसेच मुस्लिम–ख्रिश्चन धर्मीय तमाम सामान्यजनांची मुक्तता करून त्याना राष्ट्रीय समृद्धीच्या व सामर्थ्याच्या प्रवाहात आणण्याचे ऐतिहासिक कर्तव्य हिंदूंनी पार न पाडल्याने, भारत दुर्बल राहील नि भक्ष्य बनेल. एकादा मार्क्सवादाची झापड लावलेला आणि कार्ल मार्क्सलाच प्रेषित मानणारा नेता-असे नेते भारतात अनेक आहेत–रशियाच्या किंवा चीनच्या मदतीने केव्हा ना केव्हा उरावर बसेल ! म्हणून हिंदू समाजाने गौतम बुद्धाची शिकवण जशी स्वतःलाही सुधारून पचविली त्याप्रमाणे समाजवाद स्वीकारून पचविला पाहिजे व समाजवादाचे नेतृत्व केले पाहिजे.

खुद्द स्वातंत्र्यवीर सावरकरांचा साम्यवादालाही (कम्युनिझमलाही) विरोध नव्हता, मग ज्या व्यवहारी समाजवादात घरातील देव आणि देवळातील देव याना हरकत घेतली जात नाही अशा समाजवादाचे त्यांनी स्वागतच केले असते.आधार हवा का ? तर मग श्री. श्री पु. गोखले यांच्या ' सावरकरांशी सुखसंवाद ' या पुस्तकाचे १२२ वे पान वाचा.स्वातंत्र्यवीर म्हणाले,

' ऐतिहासिक काळापासून पाहिले तर हिंदू असाच वागतोय. निद्रिस्त रहातोय. पुन्हा जरुर असेल तेव्हा उठतोय पुन्हा पुन्हा वर्षानुवर्षे हे चालू आहे. मनात कधी कधी विचार येतो की, साम्यवादी आलेच तर काय होईल ! हिंदुत्व जाईल का ? ते हिंदुत्व नष्ट करू शकतीलच का ? हिंदुत्व त्यांना निश्चितीने नष्ट करता येईलच असे वाटत नाही. किती झाले तरी भारताचा कणा असलेले हे हिंदू, हे राष्ट्र नष्ट करून त्यांचेही चालणार नाही. साम्यवाद्यांनाही कोणत्या ना कोणत्या स्वरुपात बहुसंख्य, हुषार, त्यागी म्हणून का होईना, हिंदुंच्या आणि पर्यायाने भारताच्या हिताच्या गोष्टी कराव्याच लागतील त्यांचे सर्वच मार्ग मला आवडतील असेही नाही. पण भारत एक प्रबळ राष्ट्र ते करतीलच करतील. हे जसे निश्चित होईल तसे ते आल्याने धर्माचे प्राबल्य कमी होईल हेही खरे, पण मी तुला विचारतो की, जुन्या रुढी, भोळसट कल्पना नष्ट झाल्या तर आधुनिक शास्त्रावर आधारलेला, बहुसंख्याना पोषक, म्हणजेच हिंदूंना आणि पर्यायाने हिंदू राष्ट्राला पोषक असा धर्म राहील ना ? मग हिंदुत्वाचे आपण आग्रही लोक तरी दुसरे काय मागतो ? आम्हालाही प्रगती आणि [illegible] हिंदुत्व हवे आहे ना !

आणखी आधार हवा का ? मग ' समग्र सावरकर वाङ्मय, खंड तिसरा, निबंध–पान २०६ ' पहा. स्वातंत्र्यवीर सावरकर म्हणतात–' प्रत्येक क्रांती हा एक प्रयोग असतो. आजवरच्या साऱ्या क्रांत्यामध्ये अधिक सर्वंकष, ही मानवी जीवनचे जीवनच बदलू पहाणारी रशियन क्रांति ही त्याच कारणासाठी एक अत्यंत अपूर्व,

सर्वंकष, जितक्या धाडसाचा तितक्याच धोक्याचा असा मनुष्य समाजाने केलेला एक मोठ्यातील मोठा साधिक प्रयोग होता.'

आजच्या रशियातील समाजवाद त्यांनी पाहिला असता तर? तेथे धर्माचा उच्छेद केलेला नसून राष्ट्रीय विकास व राष्ट्रवाद यांच्या मार्गात तो येणार नाही हाच कडक बंदोबस्त केला आहे म्हणजेच बंदोबस्त इस्लामी नि खिस्ती धर्मवेडाचा केला आहे! हा बंदोबस्त आक्रमक माथेफिरू अशा धर्मवेड्यांना मानवणारच नाही, पण हिंदूना नेमका हाच बंदोबस्त हवा आहे. म्हणून आजचे रशियातील व्यवहारी समाजवादी चित्र पाहिल्यावर स्वातंत्र्यवीरांनीच समाजवादी पक्ष स्थापन केला असता. श्री गोखले यांना स्वातंत्र्यवीर सावरकर असेही म्हणाले, 'मी वेदात सर्व काही आहे असे मानत नाही, मग मार्क्सने सांगितलेले सगळे बरोबर, मार्क्स वाक्य प्रमाणम! हे कसे मानणार?' मार्क्सचे वाक्य अंतिम असे रशियाच मानत नाही, चीन मानत नाही आणि अन्य साम्यवादी राष्ट्रेही मानत नाहीत! तसे मानणारे काही पोथीवादी आणि मठवादी कम्युनिस्ट पुढारी भारतातच आहेत! पण बुद्धिमान हिंदू जर समाजवादाचे नेतृत्व करण्यास पुढे सरसावले तर अशा पोथीवाद्यांना महत्त्व राहणार नाही! स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या नांवाच्या शिदोरीवर मिरविणारे हे हिंदूसभावाले झोपले आहेत काय? अन्य हिंदू नेतेही निद्रीस्त आहेत काय?

## समाजवादी पक्षच संपविला

लोकनायक जयप्रकाश नारायण यांनी आपले सळसळते तारुण्य समाजवादाच्या सेवेत घालविले, पण अखेर समाजवादी पक्ष मोडून, मोरारजींच्या आणि बाबुजींच्या तसेच चरणसिंगांच्या हाती समाजवाद सोपवून समाजवादी पक्षाची त्यांनी हत्या केली! अर्थात त्यांनी संपूर्ण क्रांतीचे दिव्य स्वप्न पाहिले होते, पण पुतना मावशीच्या हाती कृष्णाला सोपविण्याची घोडचूक केली. आता त्या भ्रांतीतून सर्वजण सावरले आहेत. भाजप, लोकदल यांची पुन्हा स्थापना झाली,पण समाजवादी पक्ष आहे कुठे? अजून ते लोकदलात किंवा जनता पक्षात कसे? समाजवादी नेते समाजवादी पक्ष आणि समाजवादी विचाराचे व्यासपीठच संपुष्टात आणून मोरारजींच्या आणि सुब्रमण्यम स्वामींच्या आणि चरणसिंगांच्या मांडीला मांडी लावून बेशरमपणे आजही वावरत आहेत याचा अर्थ काय? आपण मूठभर व फुटलेले असल्याने त्या त्या पक्षात नगण्य होणार हे माहित असूनही समाजवादासह 'विलीन' का झाले आहेत? आमचे समाजवादी नेहमीच भरकटले पण आता त्यांचे डोके कामातूनच गेले आहे काय?

अशा या दुर्दैवी परिस्थितीत विशेषतः हिंदू धर्मातील दलितांना सुवर्णसंधीच आहे. समाजवाद त्यांचे प्रश्न सोडविलच पण त्यांनीच समाजवादाचे नेतृत्व केले तर भारताचे नेतृत्व करण्याची अशक्य वाटणारी संधी त्यांना मिळू शकेल. कारण तथा-कथित उच्चवर्णीय झोपले आहेत. ते झोपले किंवा दलित भांडत राहिले म्हणून

समाजवाद यायचा रहाणार नाही ! त्याच्याशिवाय समाजवाद येईल, पण तेव्हा समाजवादाला आकार द्यायचे त्यांच्या हाती रहाणार नाही. सुवर्ण संधी निसटून जाईल.

समाजवाद जर आमच्याच नेत्यांनी आणला तर समाजवाद अस्सल भारतीय असेल. रशिया व चीन यांच्याप्रमाणेच भारत हे बलाढ्य राष्ट्र बनेल आणि अस्मितेने फुललेल्या भारतात कुणालाही यत्किंचित ढवळाढवळ करता येणार नाही. पण रशियन किंवा चिनी लष्कराच्या मदतीने समाजवाद भारतात आला तर भारताला पूर्व युरोपिय राष्ट्रांप्रमाणेच दुय्यम दर्जा राहील. आता भारतात जो आणावयाचा तो 'प्रॅक्टीकल सोशॅलिझम' म्हणजे नेमके काय ? याचे उत्तर देणे क्रमप्राप्त आहे. त्याचे विवेचन यापुढील लेखांत करू या.

: १४ :

# मार्क्सने माणसापुढे हात का टेकले? यक्षप्रश्न सोडविणारा 'षड्रिपु सिद्धांत'

ज्या कार्ल मार्क्सने (१८१८–१८८३) समाजवाद (सोशॅलिझम) व साम्यवाद (कम्युनिझम) याची शास्त्रीय मांडणी केली त्याच्या मृत्यूनंतर शंभर वर्षे उलटली आहेत. कार्ल मार्क्सच्या हयातीत कुठल्याही देशात साम्यवादी क्रांती झाली नाही. पण त्याच्या मृत्यूनंतर ३५ वर्षांनी व्लादीमिर लेनिनने मार्क्सच्या विचारांचा झेंडा फडकवित सोविएत रशियात १९१७ च्या ऑक्टोबरमध्ये क्रांती घडविली यानंतर पाच वर्षे निकराच्या निर्णायक लढ्यात क्रांतीच्या विरोधकांचा नि चौदा परराष्ट्रांच्या आक्रमणाचा पराभव करून १९२२ साली सोविएत संघराज्याची स्थापना केली त्या संघराज्याच्या स्थापनेचा साठावा वर्धापन दिन गेल्या वर्षीच थाटात साजरा झाला.

कार्ल मार्क्सने म्हटले आहे की, भांडवलशाही उलथून पडल्यानंतर प्रथम समाजवाद स्थापन होईल आणि त्यानंतर साम्यवाद येईल. समाजवादात उत्पादन साधनांची मालकी साऱ्या राष्ट्राची होते. कुणा खाजगी व्यक्तीला इतरांना यंत्रावर नोकरीस ठेवून व त्यांचे शोषण करून फायदा कमावता येत नाही. त्यामुळे बिभत्स विषमता नाहीशी होते, पण त्याच वेळी किमान विषमता उरतेच. साम्यवादात म्हणजेच कम्युनिझममध्ये त्यापुढचे पाऊल पडते. प्रत्येकजण त्याच्या कुवतीप्रमाणे काम करतो आणि प्रत्येकाला त्याच्या गरजेप्रमाणे वस्तू मिळतात. म्हणजेच समाजवादात इंजिनियरला अधिक वेतन आणि बिगाऱ्याला कमी वेतन असा फरक राहतो, पण कम्युनिझममध्ये इतपतही विषमता उरत नाही.

रशियात उत्पादन साधनांची खाजगी मालकी नष्ट झाली आहे यामुळे यंत्राच्या आणि भांडवलाच्या मालकीच्या आधारे इतरांचे शोषण कुणाही खाजगी व्यक्तीला करता येत नाही. उत्पादन साधने सर्वस्वी समाजाच्या मालकीची झाल्याने औद्योगिक क्रांतीचा सर्वच्या सर्व फायदा समाजाला मिळतो. जगात जेटच्या वेगाने विकास सुरू असून त्या आड भारतासारख्या देशात जे खाजगी मालकीचे हितसंबंध येतात त्यांचाही अडथळा रशियात होऊ शकत नाही. खाजगी मालकीतून निर्माण होणारी स्कायस्क्रेपर विषमता आणि दैनंदिन जीवनातील अनिश्चितता रशियात नाही. प्रत्येक स्त्रीला व पुरुषाला स्वतःच्या विकासाची पूर्ण संधी मिळाली आहे गरिबी त्यात अडसर बनू शकत नाही. रशियाचे हे चित्र आहे आणि यामुळे रशियात समाजवाद अमलात आला आहे यात शंका नाही.

रशियातील समाजवादामुळे विषमता किमान उरली आहे, तथापि ती नाहीशी झालेली नाही. मोफत शिक्षणामुळे गुणवत्ता संपादन करण्याची संधी प्रत्येकाला समान आहे, पण ज्याची गुणवत्ता व काम अधिक त्याला अधिक वेतन मिळते रशियात अनेकांची खाजगी मालकीची स्वतःच्या वापरापुरती घरे आहेत, घराभोवताली बाग अथवा शेत आहे. बागेतील जादा उत्पादन खाजगी मार्केटात विकण्यास मुभा आहे शिवाय स्वतःच्या खर्चाने घर बांधावयाचे असेल तर सरकार जमीन देते. फक्त स्वतः कसण्यासाठी छोटीशी बाग देते. ज्यांना अधिक वेतन मिळते त्यांना या सवलतीचा फायदा होतो. माझा पत्रकार मार्गदर्शक स्मिरनोव्ह याचा मॉस्कोत फ्लॅट होता व मॉस्कोच्या उपनगरात हिरव्यागार परिसरात त्याचे स्वत.चे टुमदार घर होते. स्वत.चे घर भाड्याने देता येत नाही आणि स्वत च्या शेतावर फक्त स्वतःला आणि कुटुंबियांनाच काम करता येते. मजूर नेमता येत नाही म्हणजेच उत्पादन साधनांच्या मालकीतून निर्माण होणारी आणि दुसऱ्याच्या पिळवणुकीवर आधारलेली नफेबाजी व भयानक विषमता रशियात इतिहासजमा झाली आहे. पण गुणवत्तेवर आधारलेली किमान विषमता आहेच उत्पादन साध नांच्या मालकी हक्काचा फायदा घेऊन गादीवर लोळत कपाटे पैशांनी भरता येत नाहीत, पण जादा कामाचे आणि अधिक गुणवत्तेचे अधिक दाम मिळतातच.

प्रश्न असा आहे की समाजवादाचा आजचा टप्पा ओलांडून कम्युनिझमचे म्हणजेच संपूर्ण समतेचे कार्ल मार्क्सचे स्वप्न साकार होईल काय ? 'जो जे वांछिल तो ते लाहो' असे ज्ञानेश्वरांनी पसायदान मागितले तसेच एक स्वप्न मार्क्सने रंगविले आहे काय ? की शक्यतेच्या कोटीतले ते अंतिम उद्दिष्ट आहे ? माणूस कारखान्यावर अथवा शेतावर जाऊन त्याच्या कुवतीप्रमाणे मन.पूर्वक काम करीत आहे आणि गच्च भरलेल्या डिपार्टमेंटल स्टोअरमध्ये जाऊन त्याला हवे ते नेत आहे असे कधी घडणार आहे काय ? साठ

वर्षांपूर्वी शियात समाजवाद आला आणि या काळात अंतिम कम्युनिझमच्या दिशेने रशियाची मंद गतीने का होईना, पण वाटचाल चालली आहे काय? रशिया पाहिल्यानंतर या प्रश्नाचे उत्तर 'नाही' असेच मी ठामपणे देईन. रशियात आजही कम्युनिझम नाही आणि उद्याही येणार नाही!

## अधिक काम-अधिक दाम

आजच्या रशियात प्रत्येक व्यक्ती कामाप्रमाणे दाम घेत आहे आणि ऐपतीप्रमाणे खरेदी करीत आहे. प्रत्येकाला समान संधी आहे, पण गुणवत्तेनुसार येणारी विषमता आहेच अशी विषमता तोडण्याचा कमलाही नवा प्रयत्न सुरू नसून या व्यवस्थेला मान्यता देणारी धोरणेच अधिकाधिक आखली जात आहेत. कारखान्यासाठी उत्पादनाचे जेवढे उद्दीष्ट सरकारने ठरविलेले असते त्यापेक्षा अधिक उत्पादन केले तर कामगारांना बोनस मिळतोच, पण कारखान्यातील ट्रेड युनियनच्या अखत्यारीत असलेल्या कामगार कल्याण निधीसाठी (सोशल कन्झम्शन फंड) अधिक रक्कम मिळते. रशियाने स्वीकारलेल्या या धोरणामुळे उत्पादनाचा तसेच कामगारवर्गाचा अमाप फायदा झाला आहे. ग्रामीण भागातील घरे बहुतेक खाजगी मालकीची आहेतच, पण घराभोवती स्वतः-पुरती लागवडीकरिता जमीन अनेकांची आहे. लेखकांना लोकप्रियतेच्या प्रमाणात कमीजास्त प्राप्ती होते. पूर्वी हॉटेलात टीप देणे व वेटरने ती स्वीकारणे हे 'अब्रह्मण्यम' गणले जात होते, पण आता सरळ टीप देतात आणि जर टीप दिली तर वेटर ती 'स्पसिबा' (आभारी आहे) असे म्हणत स्वीकारतो याबद्दल वृत्तपत्रांत खुली चर्चाही झाली आणि बहुमताचा असा अभिप्राय पडला की चांगल्या सेवेचे अधिक दाम देणे आणि घेणे यात वावगे काही नाही. रशियात लॉटरीदेखील आहे–फरक इतकाच की पारितोषिके भरमसाट नाहीत आणि ती वस्तुरुपाने मिळतात त्याही-पेक्षा महत्त्वाचे म्हणजे लॉटरीचे तिकीट काळाबाजारवाल्याला विकून अधिक रक्कम मिळविण्याची तेथे सोय नाही, कारण काळा पैसा निर्माण करणारे भांडवलदारच तेथे नाहीत!

सारांश, रशियात खाजगी मालकीची घरे आहेत, जमिनी आहेत, खाजगी मार्केटे आहेत–फक्त दुसऱ्याला नोकरीवर ठेवून शोषण करण्याचा भांडवलदारी हक्क नाही. सर्वात महत्त्वाचे म्हणजे अधिक कामासाठी आणि अधिक गुणवत्तेसाठी अधिक दाम ही प्रेरणा अधिकाधिक वापरली जात आहे आणि फलदायी ठरत आहे. कलेक्टीव्ह फार्मवरील पीक सरकार निश्चित भावाने विकत घेते पण मुक्रर केलेल्या उद्दीष्टापेक्षा अधिक पीक घेतले तर जादा पिकाची खरेदी जादा भाव घेऊन करते! रशियात प्रथम 'कम्युन' आली व तेथे समान पगार होता.पण तो मार्ग सोडावा लागला. त्यानंतर सहकारी शेती आणि 'कलेक्टीव्ह फार्म' येऊन कामाप्रमाणे दाम नि जादा

उत्पादनाचा जादा भाव हे सूत्र आज अमलात आले आहे. रशियाची गाडी मार्क्सवादी अंतिम संपूर्ण समतेच्या कम्युनिझमच्या रोखाने निघाली खरी, पण समाजवादाचे महत्त्वाचे स्टेशन येताच तिने मार्ग बदलला. जास्तीत जास्त उत्पादनवाढीसाठी मानवी प्रेरणांचा वापर करण्याच्या मार्गावर ही गाडी आता चालली आहे!

## म्हणूनच भारताला आकर्षक

कार्ल मार्क्सच्या एकूण तर्कशुद्ध मांडणीत मानवी विकारच विचारात घेतलेले नाहीत. त्यामुळे स्वतःसाठी इतराचे शोषण करणारा आणि अमाप काळा पैसा हाती आल्याने लांचलुचपतीने सरकार पोखरणारा भांडवलदाराचा वर्ग साफ निकालात काढल्यावर समाजवादाची स्थापना होईल इथपर्यंतच मार्क्सवादी गाडी नीट गेली. पण अशा समाजवादानंतर गुणवत्ता हिशोबात न घेणारी संपूर्ण समता (कम्युनिझम) येईल आणि सर्व माणसे आदर्श होऊन सरकारच आपोआप नाहीसे होईल याचे जे स्वप्न मार्क्सने रंगविले ते चुकीचे ठरत आहे. याचे कारण असे की, अंगभूत मानवी विकारच मार्क्सने हिशोबात घेतले नाहीत! मार्क्सने सिद्धान्त मांडले पण रशियाला अमलबजावणी करताना जो प्रत्यक्ष अनुभव आला त्यावरून मार्क्सच्या विवेचनातील ही उणीव रशियाच्या लक्षात आली आहे. रशियाचे आजचे सर्वश्रेष्ठ सत्ताधारी युरी आन्द्रेपोव्ह एका भाषणात म्हणतात की, 'सर्वांना समान वेतन देणे म्हणजे कामचुकारांना उत्तेजन देणे आणि कसून काम करणाऱ्यांचा उत्साह कमी करणे!' मार्क्सचे अंतिम स्वप्न भ्रामक आहे अशी उघड कबुली रशियन नेते आजही देत नाहीत, पण प्रत्यक्ष अनुभवाने त्यांना ते समजून चुकले आहे आणि त्यांची प्रत्यक्ष कृतीच कबुली देत आहे. यामुळे रशियातील समाजवाद हा भारतीयांना अधिक आकर्षक वाटणारा आहे.

श्रीकृष्णाने अर्जुनाला भगवद्‌गीता सांगताना सहा मानवी अंगभूत विकारांचा उहापोह केला. काम, क्रोध, लोभ, मद, मत्सर, मोह हे सहा विकार अर्थात् षड्‌रिपु मानवी स्वभावात सदैव असतात ते कधीही नष्ट करता येत नाहीत, कारण ते अंगभूत आहेत. पण त्याच वेळी विकार नियंत्रणात ठेवता येतात व ठेवले पाहिजेत! इतरांची पिळवणूक करून कोट्याधीश होऊ पहाणारा निर्लज्ज मानवी लोभ समाजवादाने कापून टाकला. पण मानवी लोभ अशा प्रकारे केवळ नियंत्रणातच ठेवता येतो–नष्ट करता येत नाही. जर मानवाचे अंगभूत सहा विकार संपुष्टात आणता येत असते तर समाजवादानंतर मार्क्सच्या स्वप्नाप्रमाणे कम्युनिझमकडे–संपूर्ण समतेकडे आणि सरकारच लोप पावण्याकडे वाटचाल करता आली असती. तथापि मानवी लोभ व अन्य विकार नष्ट करता येत नाहीत, फक्त काबूत ठेवता येतात आणि म्हणूनच लोभावर तसेच अन्य

विकारांवर योग्य नियंत्रण आणल्यानंतर आता त्याचा वापर उत्पादनाच्या वाढीसाठी व तुफान वेगात प्रगतीसाठी करून घेणे हीच समाजवादानंतरची योग्य वाटचाल ठरते. रशियात तीच वाटचाल सुरू आहे म्हणून मानवी लोभाची प्रेरणा वापरणारे कामाप्रमाणे दाम हे सूत्र रशियन कारखान्यांत व शेतातही अधिकाधिक अमलात येत आहे ! रशियाने पोथीनिष्ठ कर्मठपणा सोडला आहे आणि मार्क्सवाद प्रत्यक्ष अनुभवाच्या चाळणीतून चाळून घेतला आहे.

## युद्धे का होतात ?

'जगातील कामगारांनो, एक व्हा' अशी अत्यंत आकर्षक घोषणा मार्क्सने समाजवादी चळवळीला दिली आणि या भारावून टाकणाऱ्या घोषणेचा यथेच्छ उपयोगही आंदोलन करण्यासाठी झाला. तथापि एका देशातील कामगारांना दुसऱ्या संपन्न देशात आजही सामावून घेतले जात नाही आणि उपयोग संपताच हाकलण्यात येते ! मार्क्सने सिद्धांत मांडला की "यंत्रयुगातील अनियंत्रित अतिरेकी उत्पादन खपविण्याकरिता बाजारपेठ हवी म्हणून भांडवलशाही साम्राज्यवादी राष्ट्रे आक्रमण करतात. समाजवादी राष्ट्राला अशी बाजारपेठ शोधावी लागत नाही. म्हणून समाजवादी राष्ट्र कधीच आक्रमण करणार नाही." तथापि याही वेळी मार्क्सने मानवी विकार हिशोबात घेतले नाहीत. काम, क्रोध, लोभ, मद, मत्सर, मोह या सर्वच विकारांतून आक्रमणे झाली आहेत– केवळ बाजारपेठेसाठी नाहीत ! यापुढेही या कारणांसाठी होणार आहेत !

महाभारत काही संपत्तीसाठी झाले नाही. पांडवांनी राजसूय यज्ञ केला तेव्हा पांडवच नव्हे तर कौरवही संपत्तीत लोळत होते. पण पांडवांचे अधिक वैभव मत्सरी दुर्योधनाला पहावले नाही आणि त्याने कपटी द्युताचे निमंत्रण धर्मराजाला दिले अनिर्बंध सोडलेल्या सहाही मानवी विकाराच्या संघर्षातून महाभारत घडले. १९६२ साली कम्युनिस्ट चीनने भारतावर दगाबाज आक्रमण कशासाठी केले ? आशियातील सर्वश्रेष्ठ, सामर्थ्यवान देश आमचा आहे असे जगाला जाहीर करण्याच्या माओच्या अहंकारासाठीच ना ! समाजवादी राष्ट्र आक्रमण करतेच, पण दुसऱ्या समाजवादी राष्ट्रालाही त्यातून वगळत नाही. म्हणून चीनने रशियन सीमेवर जेव्हा अतिक्रमणे केली तेव्हा रशियाची प्रतिक्रिया खवळलेल्या वाघासारखी झाली. या बंधुतुल्य समाजवादी राष्ट्रांत आज बंधुप्रेमाऐवजी भाऊबंदकी आहे ! त्याचवेळी भांडवलदारांची मक्काच असलेली अमेरिका आणि धर्मवेड्याचा पाकिस्तान यांच्याशी कम्युनिस्ट चीनचे मेतकूट जमले आहे ! माओच्या व अन्य चिनी नेत्यांच्या मानवी अहंकारामुळे व कम्युनिस्ट चळवळीतील रशियाविषयीच्या मत्सरामुळे हा विपरीत परिपाक झाला आहे.

चिनी लोकांना तसेच रशियन जनतेला आपापल्या देशाचा जबर अभिमान आहे.

त्यांचा राष्ट्रवाद धगधगता आहे. 'आंतरराष्ट्रीय कम्युनिझम' अखेर मार्क्सच्या पोथी-प्रामाण्यात राहिला आहे. रशियात आज बेकारी तर नाहीच, पण मानवशक्ती अपुरी पडते आणि कुणाही दांपत्याला तिसरे मूल झाले तर खास रक्कम उत्तेजनार्थ दिली जाते मी गमतीने तिथल्या पुढाऱ्याला म्हटले, 'नोकऱ्यासाठी माणसे नाहीत हा तुमचा प्रश्न भारत सोडवू शकतो भारतीय सुशिक्षित कसबी कामगारांना रशियात का बोलावीत नाही?' त्यावर ते म्हणाले, 'आम्हाला आपली रशियन माणसे हवी आहेत!' गमतीचा भाग सोडला तर हा राष्ट्रवादच आहे. जगातील कामगारांनो, एक व्हा पण आमच्या देशात शिरू नका, असा हा राष्ट्रवाद आहे नेमका हाच राष्ट्रवाद आम्हालाही हवा आहे! 'आव जाव घर तुम्हारा असला बेबंद-वाद नको!

रशियाचे आजचे सूत्रधार श्री. यूरी आंद्रेपोव्ह यांनी कार्ल मार्क्सच्या शंभराव्या पुण्यतिथीनिमित्त लिहीलेल्या खास प्रबंधात म्हटले आहे-'भांडवलशाही उलथून पडणारच याची शास्त्रीय मांडणी कार्ल मार्क्सने केली, पण त्यानंतर जो समाजवाद अटळपणे येईल त्याची फक्त ठळक वैशिष्ट्ये मार्क्सने आपल्या तर्काची परिणती म्हणून मांडली. उत्पादन साधनांची मालकी समाजाची झाली पाहिजे हे सूत्र त्याने मांडले. रशियात असा समाजवाद आला असून उत्पादन अधिकाधिक झपाट्याने वाढविणे हाच आमच्यापुढील प्रश्न आहे त्यासाठी आपण वास्तववादी राहिले पाहिजे. सामाजिक कल्याण साधतानाच व्यक्तीचा हितसंबंध, स्थानिक हितसंबंध आणि विभिन्न सामाजिक गटांचे खास वैशिष्ट्य याकडे दुर्लक्ष करता कामा नये सदर हितसंबंधांचा वापर एक शक्ती-उत्पादन वाढविणारी शक्ती म्हणून केला पाहिजे व सामाजिक हिताशी मिलाफ केला पाहिजे'

श्री आंद्रेपोव्ह पुढे प्रतिपादन करतात: 'खुद्द मार्क्सने म्हटले आहे की, पहिला टप्पा असलेल्या समाजवादात प्रत्येकाला कामाप्रमाणे दाम मिळेल! समाजवाद म्हणजे सरसकट समता हा भ्रामक विचार कार्ल मार्क्सने नाकारला आहे आमचे असे म्हणणे आहे की, समाजवादात समता किती प्रमाणात शक्य आहे ते वाटपावर अवलंबून आहे. शक्यतेपलिकडे समता आणणे आणि प्रत्येकाच्या कामाचे मूल्यमापन न करता सरसकट समता आणणे याचे विपरीत परिणाम होऊ शकतील-किंबहुना होतातच. जर कामाप्रमाणे दाम हे समाजवादी तत्त्व नाकारले, तर ऐतखाऊ मिळकत, गलथान काम, चुकारपणा असल्या प्रमादांना तोंड द्यावे लागेल हे प्रमाद चालू देता येणार नाहीत मानवी मन जेव्हा उदात्त, सुसंस्कृत ज्ञानी होईल (म्हणजेच षड्‌रिपु प्रत्येकाच्या ताब्यात येऊन प्रत्येक नागरिक आदर्श होईल) तेव्हाच संपूर्ण समता (कम्युनिझम) येईल.

श्री आंद्रेपोव्ह यांच्या म्हणण्याचा अर्थ असा की, आमचे स्वप्न अंतिम

कम्युनिझमचे–संपूर्ण समतेचेच–आहे असेच आम्ही म्हणत रहाणार, पण मानवी विकार कायम असेतो (म्हणजेच कायमचेच) कामाप्रमाणे दाम देणारा समाजवादच रशियात नांदत राहील.

रशियात सर्व घरांचे, सर्व जमिनींचे इतकेच नव्हे तर मुलाबाळांचेही राष्ट्रीकरण झाले आहे अशा भलभलत्या कल्पना भारतीयांच्या आहेत रशियन क्रांतीनंतर टाइम्स ऑफ इंडियात म्हणजे ब्रिटीश सरकारचे तेव्हा धोरण मांडणाऱ्या वृत्तपत्रात अपप्रचारी मथळाच होता–' वुमेन आर नॅशनलाईज्ड इन रशिया '–रशियात स्त्रियांचे राष्ट्रीकरण झाले ! प्रत्यक्षात मात्र अपरात्रीसुद्धा निर्भयपणे रस्त्यांतून एकट्याने जाणाऱ्या स्त्रिया रशियातच दिसतात. त्यांना संपूर्ण समानता व अभय लाभले आहे. प्रत्येक स्त्रीला व पुरुषाला काम मिळते प्रत्येकाला मोफत शिक्षण, अल्प भाड्याने रहायला जागा आणि उत्तम मोफत औषध उपचार हक्काने मिळतात मुलांची नीट देखभाल करणे आणि त्यांना प्रेम देणे हे आईबापांचे कर्तव्य मानण्यात आले आहे. हे कर्तव्य नीट पार पाडता यावे म्हणून बाळंतपणाची प्रदीर्घ रजा दिली जाते. मूल एक वर्षाचे होईतो कामावर नाही गेले तरी मातेचा नोकरीवर हक्क रहातो. मुले एकापेक्षा अधिक असतील तर मातेला कमी तास काम करावे लागते. नर्सरी, किंडरगार्टन येथे मुलांची देखभाल इतमामात केली जाते. भारतातील मुले जशी सारखी ' आई, आई ' असा जप करतात तशीच रशियातील मुलेही आईच्या मायेत असतात. फरक इतकाच की, रशियन आईला मुलाची चिंता करावी लागत नाही. मोफत शिक्षण, हक्काने काम, हक्काने निवारा व मोफत औषधोपचार लाभत असल्याने ' बाळाचे काय होणार ? ' याची तिला चिंता नसते.

सर्वसाधारण भारतीयाची आकांक्षा कोणती असते ? आईवडील दिवसरात्र काबाडकष्ट करून मुलांना जादा फी मोजत उत्तम शाळांमध्ये शिक्षण देतात. त्यासाठी मूल जन्मल्यापासून के. जी. मध्ये प्रवेशाकरिता रांग लावतात. सकस अन्नाचा डबा घेऊन शाळेत पळतात. मॅट्रीकनंतर कॉलेज प्रवेशासाठी धावतात. आजारी पडल्यास उत्तम डॉक्टर बोलवितात. नवरा व बायको दोघांनीही नोकरी करून अखेर जर शिल्लक उरलीच तर आपल्या एकदोन खोल्या विकून उपनगरात ' फ्लॅट ' मिळवितात. त्यातही फसले नाहीत तर मिळविले फ्लॅट घेतला म्हणजे सत्यनारायणाची पूजा करून कृतकृत्यता मानतात. आम्हा सर्वसामान्य भारतीयांची ही माफक आकांक्षा असते व तीही काही भाग्यवानांच्या बाबतीत पूर्ण होते.

पण सर्वसामान्य भारतीयाच्या जीवनाची जिथे अखेर होते तिथे रशियन मुलाची जन्मतःच सुरुवात होते ! शिक्षण–औषधे–अपार्टमेंट [ फ्लॅट ] याचा हक्क जन्मतःच मुलाला प्राप्त होतो ! शिक्षण संपताच नोकरीवर हक्क आहेच !

## पोथीप्रामाण्यवादी भारतीय कम्युनिस्ट

मग रशियाबद्दल भ्रामक कल्पना का ? या कल्पनाबद्दल पाश्चात्य प्रचारक आणि समाजवादाचे भारतातील विरोधक जितके जबाबदार आहेत त्यापेक्षाही भारतातील कम्युनिस्ट अधिक जबाबदार आहेत.ते अजूनही मार्क्सची पुस्तकेच वाचत आहेत ' जगातील कामगारांनो एक व्हा,' 'समाजवादी राष्ट्र कधीच आक्रमण करीत नाही'असल्या घोषणा केस पिंजारून व घसा खरवडून देत आहेत. रशिया पहायला ते जातात, पण क्रेमलिन-समोरच्या सुंदर लाल चौकात उभे राहिले की, मक्केतील मुसलमानासारखे भारावून जातात ! आम्हा भारतीयांपेक्षा रशियाने कित्येक पटीने प्रगती केली आहे, पण रशियनाजवळ अधिक काय आहे ? ती माणसे भारतीयांपेक्षा मुळीच अधिक तल्लख नाहीत ! त्यांनी जी यंत्रणा निर्माण केली आहे त्या यंत्रणेमुळे प्रत्येक माणसाच्या आणि प्रत्येक साधनसामग्रीचा कमाल उपयोग होत आहे ! याउलट आमच्याकडे प्रचंड मानवशक्ती व साधनसामुग्री फुकट जात आहे ! कामचुकारांना जबरदस्त धाक आणि उत्तम काम करणाऱ्यांना अधिक दाम या दोन पायावर रशियन उत्पादन यंत्रणा उभी आहे. दाम आणि दंड ! रशियातील समाजवाद हा असा व्यवहारी समाजवाद आहे व्यवहाराच्या व अनुभवाच्या चाळणीतून मार्क्सवाद चाळून घेतलेला समाजवाद आहे.

रशियन नेते श्री. यूरी आंद्रेपोव म्हणतात ' मार्क्सवाद कर्मठ नाही विविध समस्या सोडविण्याची ती मार्गदर्शिका आहे मार्क्सवाद पुढे नेताना त्यात अनुभवी भर घातली पाहिजे त्यातच मार्क्सवादाचा न संपणारा ताजेपणा आहे. विज्ञानातील नवनवीन अफाट शोध आणि तत्त्वज्ञानातील अफाट प्रगती यामुळे मार्क्सवाद अनुभवानुसार ताजा राखत पुढे नेला पाहिजे.'

कार्ल मार्क्सने प्रतिपादन केले की,समाजवादानंतर संपूर्ण समता प्रस्थापित करणारा साम्यवाद कळीतून फूल उमलावे तशाच अपरिहार्यपणे येणार आणि विकासाचा क्रम त्याने गणिताप्रमाणे मांडला पण मार्क्सच्या गणितात मानवी मन नव्हते आणि खरे म्हणजे मानवी मन कुठल्याच गणितात बसणारे नसते ! मानवाचे अंगभूत सहा विकार मार्क्सने हिशोबात घेतले नाहीत, पण समाजवाद प्रत्यक्षात अमलात आणणाऱ्यांना ते हिशोबात घेण्यावाचून गत्यंतरच नाही. कामचुकार आणि मन पूर्वक काम करणारा तसेच अकुशल आणि कुशल कामगार यांच्यात वेतनची समता आणली तर सर्वच कामचुकार होतील असे वेगळ्या शब्दांत श्री आंद्रेपोव सांगतात. याच्या मुळाशी मानवाचा लोभ आहे. उत्पादन साधनाची खाजगी मालकी रद्द करून मानवी लोभ नियंत्रित केला, पण रशियन संघराज्याला साठ वर्षे होऊन रशिया अमेरिकेला आव्हान देण्याइतका बलीष्ठ झाला तरीही मानवी लोभाची आजसुद्धा दखल घ्यावी लागत आहे उद्याही घ्यावी लागणार आहे ! चीन हे समाजवादी राष्ट्र आहे. पण चीनच्या सीमेवर रशियन फौजा खड्या ठेवल्या नाहीत तर काय होईल ते

रशियन नेते मार्क्सच्या ग्रंथात पहात नसून अनुभवात पहात आहेत ! कारण मानवी अहंकार व महत्त्वाकांक्षा मार्क्सने हिशोबात घेतली नसली तरी राज्यकर्त्यांना हिशोबात घ्यावीच लागते ! चिनी सैनिकांच्या तुकड्या रशियन भूमीवर शिरताच रशियन नेत्यांचा गोंधळ झाला नाही. साम्यवादी देश कधीच आक्रमण करीत नाहीत व म्हणून चिनी सैनिक आपल्याला मिठ्या मारायलाच आले असणार असे मार्क्सच्या पोथीनुसार त्यांनी मानले नाही ! रशियन सैनिकांनी या चिन्यांना ठार करण्यासाठी शस्त्रे चालविली आणि सारे राष्ट्र त्वेषाने गरजले.

गोंधळ भारतातील कम्युनिस्टांचा झाला. १९६२ साली चीनने भारतावर हल्ला केला तेव्हा मार्क्सची पोथी सांगणारे एक बडे प्रस्थ म्हणाले, 'समाजवादी राष्ट्र कधी आक्रमण करीत नाही ! वाट चुकून वासरे दुसऱ्याच्या शेतात शिरतात तसे झाले असावे !' पण वाट वासरे चुकलेली नव्हती, तर मार्क्सवादाची पोथी वनविणारे भारतीय कम्युनिस्ट नेते वाट चुकले होते ! भारतीय कम्युनिस्ट मार्क्सला अंतिम सत्य सांगून गेलेला 'प्रेषित'च समजतात. याउलट रशियात त्याच मार्क्सला 'मार्ग-दर्शक' मानतात भारतीय कम्युनिस्ट अजूनही मार्क्सच्या घडग्यातच बसले आहेत आणि भारतात कम्युनिझमबद्दल भलभलत्या आणि खोट्या कल्पना माजा-यला जितके पाश्चात्य विरोधक कारणीभूत आहेत तितकेच डोळ्यांना दिसते ते न पाहता व मान्य न करता मार्क्सचे ग्रंथ पोथीप्रमाणे वाचून दाखविणारे भारतीय कम्यु-निस्ट जबाबदार आहेत.म्हणूनच रशियाच्या अनेक वाऱ्या करूनही रशिया जसा आहे तसा त्यांनी सांगितला नाही किंवा जसा आहे तसे पाहण्याचे त्यांच्याच पोथीनिष्ठ मनाला धैर्य झाले नाही.

रशियातील समाजवाद प्रचंड यशस्वी झाला आहे. रशियात मार्क्सचा पुतळा एखादाच दिसतो, पण जिकडे तिकडे लेनिनचे पुतळे व लेनिनचा उदो उदो आहे. कारण लेनिनने मार्क्सवाद व्यवहाराच्या चाळणीतून चाळून घेऊन रशियात अमलात आणला. यामुळे रशियाच्या व्यवहारी समाजवादात माणूस म्हणजे यंत्र किंवा यंत्रातील खिळा झालेला नाही.

मार्क्सवादाच्या चरकातून माणसाला नेले नसून माणसाच्या अनु-भवाच्या चरकातून मार्क्सवाद नेला आहे ! रशियात फिरताना मला असे स्पष्ट झाले की, मार्क्सने अंतिम स्वप्नाच्या बाबतीत माणसापुढे हात टेकले आहेत.रशियन नेत्यांना अनुभवाने हे स्पष्ट झाले आहे व समाजवादानंतर मार्क्सवादाच्या दिशेऐवजी उत्पादनासाठी मानवी प्रेरणा वापरण्याच्या दिशेने गाडी नेऊन रशियन नेत्यांनी हे सत्य मान्य केले आहे! त्यामुळेच रशियन व्यवहारी समाजवादात माणसाचे प्रचंड भले झाले आहे. अधिक भले होणार आहे !

बर्फाळ थंडी असो किंवा कडक ऊन असो, मॉस्कोत क्रेमलिनसमोर लेनिनच्या

शवाचे दर्शन घेण्यासाठी लाल चौकात टूरिस्टच नव्हेत तर हजारो रशियन उभे असतात! क्रांतीच्या काळात लेनिनग्राडच्या ज्या छोट्याशा इमारतीत लेनिन लपून काम करीत होता ती ' स्मॉलनी ' पहाण्यास सतत गर्दी लोटते. रशियन लोकांचे कल्याण झाले आहे असे लाल चौकातील व स्मॉलनीसमोरची न संपणारी रांग सांगत असते! लेनिनने भांडवलशाहीतील पिळवणूक व स्कायस्क्रेपर विषमता जमिनीत गाडलीच, पण मार्क्सवादाचीही पोथी न करता मार्क्सवादही व्यवहारानुसार व अनुभवानुसार चालून घेतला लेनिनच्या शवपेटीखाली भांडवलशाहीच नाही तर मार्क्सवादी कर्मठाचे पोथीप्रामाण्यही आहे!

## स्वातंत्र्यवीर म्हणाले असते–

भारतातील हिंदू मनाची वेव्ह लेंथ मार्क्सवादी पोथीप्रामाण्याशी जुळणार नाही, पण रशियात जे घडले आहे त्याच्याशी तत्काळ जुळणारी आहे इस्लाम आणि ख्रिश्चन धर्मवेडाचा मात्र त्याच्याशी रक्तपाती संघर्षच होणार व तसा रशियात झालाच. गाय ही गोमाता नसून पशु आहे, वेदात जे सांगतले आहे तेही मला विज्ञानाच्या कसोटीवर तपासून घ्यावे लागेल अशा गर्जना हिंदूसमोर करणाऱ्या स्वातंत्र्यवीर सावरकरांनी आजचा दाम व दंड यावर उभारलेला समाजवादी, प्रचंड सामर्थ्यशाली रशिया पाहिला असता आणि मशिदीतील मुस्लीम मौलवीही लेनिनची शिकवणूक सांगत आहेत हे ऐकले असते तर तेही उद्‌गारले असते–' मला हेच घडवायचे आहे! मी रशियापेक्षाही कमी काळात भारत असाच सामर्थ्यशाली घडविन!' ही काही कल्पना नव्हे. मी साधारच सांगितले आहे.

: १५ :

# प्रॅक्टीकल सोशॅलिझम म्हणजे काय? अकारण माजविलेला गोंधळ

समाजवाद म्हणजे नेमके काय? हा प्रश्न हजारो, लाखो लोकांच्या मनात असतो, पण जे स्वतःला सोशॅलिस्ट म्हणवितात किंवा कम्युनिस्ट म्हणवितात असे भारतीय विद्वान नेते या प्रश्नाचे उत्तर देऊ लागले म्हणजे आणखीनच गोंधळ उडवितात. कठीण विषय सोपा करून मांडणे आणि नेमक्या स्वरुपात मांडणे हे काम नेत्याचे असते, पण बहुतेक भारतीय नेते सोपा विषय कठीण करून मांडतात आणि कठीण विषयात गोंधळच उडवून देतात

माझी आजी–नाट्याचार्य काकासाहेब खाडिलकर यांची पत्नी चरख्यावर सूत कातत असे आणि त्या सुताचा पंचा बनवून वर्षातून एकदा महात्मा गांधींना पाठवित असे मधुमेहामुळे माझ्या आजीचे दोन्ही पाय कापावे लागले होते त्यावेळी तिची विचारपूस करायला महात्मा गांधी आले असता त्यांना आजीने विचारले, 'सोशॅलिझम– सोशॅलिझम ऐकते– पण म्हणजे काय हो?' आणि महात्मा गांधी अर्धा तास सोशॅलिझम समजावून देत होते!' याला अर्ध शतक उलटून गेले, तथापि 'समाजवाद म्हणजे नेमके काय?' हा प्रश्न कायमच आहे.

समाजवादाबाबत खुद्द सोशॅलिस्टांनी व कम्युनिस्टांनी घातलेला गोंधळ कमी पडला म्हणूनच की काय, अन्य पक्षांनीही विड्याने तोंड रंगवावे त्याप्रमाणे समाजवादाची घोषणा ओठांवर खेळवून, सामान्य माणसाला दिग्मूढ करून टाकले ना यशवंतराव चव्हाण संयुक्त महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले तेव्हा त्यांनी जाहीर केले

की, भारतात समाजवादाचा पाळणा सर्वप्रथम महाराष्ट्रात हलेल ! पण म्हणजे नेमके काय होईल ? त्याबाबत कुणी सांगितले नाही !

## समाजवाद व कार्ल मार्क्स

अठराव्या शतकात यंत्रे मोठ्या प्रमाणात आली आणि या यंत्रांमुळे अनेकपट उत्पादन होऊ लागले. ही यंत्रे ज्याना विकत घेता आली आणि त्या यंत्रांवर कारखान्यात काम करण्यासाठी कामगार नेमता आले ते भांडवलदार झाले ! अनेकपट उत्पादनाचा सर्व फायदा भांडवलदार खिशात घालू लागले आणि कामगाराना जेमतेम जगण्यापुरते देऊ लागले. म्हणजेच कामगार वर्गाचे शोषण व पिळवणूक सुरू झाली. औद्योगिक क्रांतीने अशा प्रकारे भांडवलदार आणि कामगार असे दोन वर्ग निर्माण झाले. भांडवलदार प्रचंड संपत्ती कमावू लागला आणि कामगार वर्ग कंगाल राहिला यामुळे भांडण सुरू झाले. यंत्रामुळे जे प्रचंड उत्पादन होऊ लागले व अमाप फायदा मिळू लागला तो भांडवलदार आणि कामगारवर्ग यांच्यात वाटायचा कसा ? या प्रश्नावरून भांडवलदार व कामगारवर्ग या दोन वर्गांचा संघर्ष सुरू झाला. त्यालाच वर्ग संघर्ष म्हणतात.

त्यातूनच 'समाजवाद' हा विचार अठराव्या व एकोणिसाव्या शतकात मूळ धरू लागला. इंग्लंडचा रॉबर्ट ओवेन [१७७१–१८५३] फ्रान्सचे सेंट-सायमन [१७६०–१८२५] आणि चार्लस फॉरिअर [१७७२–१८३७] आदि समाजवादी विचारवंत म्हणाले की, यंत्रे, जमीन आदि उत्पादन साधनांची मालकी भांडवलदाराची असते आणि त्यामुळे माणूस माणसाचे शोषण करू शकतो. ही मालकी समाजाची झाली तर शोषणच नाहीसे होईल आणि सर्वांचेच भले होईल. तथापि विचाराच्या प्रसाराने हे परिवर्तन संघर्षाशिवाय करता येईल असे मानणाऱ्या या पहिल्या समाजवाद्यांना 'स्वप्नाळू समाजवादी' असे मानून त्यांची बोळवण करण्यात आली. जे कधीही साकार करण्यात येणार नाही असे स्वप्न रंगविणाऱ्या विचारवंताला 'युटोपियन' म्हणतात आणि पहिल्या समाजवाद्यांना 'युटोपियन सोशॅलिस्ट' ठरविण्यात आले. भांडवलदारांनी व श्रीमंतांनी आपली संपत्ती ही समाजाची असून आपण 'विश्वस्त' आहोत असे मानावे असे महात्मा गांधी सांगत तशाच धर्तीचा हा युटोपियन प्रकार होता

कार्ल मार्क्स (१८१८ ते १८८३) याने समाजवाद हा युटोपियन अर्थात स्वप्नाळू नसून भांडवलशाही अपरिहार्यपणे मरणार आहे व समाजवाद तितक्याच अपरिहार्यपणे प्रस्थापित होईल असे सर्वप्रथम शास्त्रीय मांडणी करून जगासमोर मांडले. भांडवलशाहीत शोषण कसे होते, किती होते याचे अर्थशास्त्रीय गणितच सादर केले म्हणून कार्ल मार्क्सचा गौरव 'शास्त्रशुद्ध समाजवादाचा जनक–' फादर ऑफ सायन्टिफिक सोशॅलिझम म्हणून केला जातो. आपल्या पुराणात गोष्टी असतात.

त्यातील एखाद्या राजाला ज्योतिषी सांगतो, 'तुझ्या पोटी जन्माला येणारा मुलगाच तुला ठार करणार आहे. कार्ल मार्क्सने भांडवलशाहीला बजावले की, 'तुझ्या पोटी जन्माला येणारा आणि तुझ्या हातून पिळला जाणारा कामगारवर्गच तुला खतम करील व तुझ्या जागी समाजवाद आणील.' पण कार्ल मार्क्सने ज्योतिषाप्रमाणे भविष्यवाणी उच्चारली नाही आणि ऋषीप्रमाणे शापवाणीही उच्चारली नाही. जगात सर्वप्रथम त्याने अर्थशास्त्रीय मांडणी करीत असे सिद्ध केले की, मानवी विकासाच्या वाटचालीत सरंजामशाहीनंतर भांडवलशाही आणि भांडवलशाहीनंतर समाजवाद अपरिहार्य आहेत ही कालगती आहे व कुणाला थोपविता येणार नाही.

कार्ल मार्क्स आणि फ्रेडरिक एंजल्स यांनी १८४८ साली 'कम्युनिस्ट मॅनिफेस्टो' प्रसिद्ध केला. कार्ल मार्क्सने 'दास कॅपिटल' हा आपला प्रचंड ग्रंथ १६ ऑगस्ट १८६७ रोजी पहाटे दोन वाजता शेवटचे प्रूफ तपासून हातावेगळा केला. समाजवादाच्या या शास्त्रीय मांडणीने विचारवंत भारावून गेले, दिपले. एकदा एका भाषणात समाजवादी नेते श्री. नानासाहेब गोरे म्हणाले की, 'एकदम दिव्य प्रकाश फाकून दिपून जावे त्याप्रमाणे मार्क्सवादी विचारांनी आमची स्थिती झाली.'

कार्ल मार्क्सचे असे म्हणणे होते की, भांडवलशाहीत कामगार वर्गाची पिळवणूक होऊन, कारखान्यांच्या आवारात संघटित होणारा हा कामगारवर्ग एक दिवस भांडवलशाहीला मोडीत काढणार आहे कामगारवर्गाचे ते इतिहासदत्त कार्यच आहे. इंग्लंडमध्ये यंत्रप्रधान औद्योगिक क्रांतीचा जन्म झाला आणि अर्थातच भांडवलशाही तेथेच सर्वांत वेगाने वाढत असल्यामुळे कामगार क्रांती इंग्लंडमध्येच सर्वप्रथम होईल अशी मार्क्सची गणिती खात्री होती. तथापि जबरदस्त मंदीचा तडाखा बसूनही इंग्लंडमधील भांडवलशाही कोलमडली नाही आणि फ्रान्स-जर्मनी येथील क्रांतीचे उठावही अपयशी झाले हे पाहून एक प्रकारच्या निराश मनःस्थितीत कार्ल मार्क्स १८८३ साली मरण पावला. त्याच्या मृत्युनंतर चौतीस वर्षांनी १९१७ साली व्लादीमीर लेनिनच्या नेतृत्वा-खाली रशियात भांडवलशाही उलथून टाकून समाजवाद साकार झाला. पण तेव्हा रशियात इंग्लंड-जर्मनीप्रमाणे भांडवलशाही फोफावलेली नव्हती!

## त्या ग्रंथांची 'पोथी' करू नका

कार्ल मार्क्सने समाजवादाला शास्त्रीय प्रतिष्ठा दिली आणि भांडवलशाहीतील पिळवणुकीविरुद्ध उभे राहण्याची कामगारवर्गाला व समाजवाद्यांना प्रेरणा दिली याबद्दल प्रत्येक समाजवाद्याने कार्ल मार्क्सचे ऋणी असले पाहिजे तथापि त्याचवेळी मार्क्सने जे जे सांगितले ते ते अंतिम प्रमाण मानण्याचे काहीच कारण नाही. भारता-तील अनेक सोशॅलिस्ट व कम्युनिस्ट नेते मार्क्सच्या ग्रंथांची पोथी बनवून सभोव तालच्या परिस्थितीबद्दल डोळ्यांना झांपडे लावून, सर्व प्रश्नांची उत्तरे त्या पोथीतून

काढून दाखवितात. झापडे लावलेल्या या नेत्यांमुळे ‘समाजवादा’ बद्दल भारतात भलभलत्या कल्पना पसरल्या आहेत. कम्युनिस्ट चीनने १९६२ साली भारतावर आक्रमण केले तेव्हा एक अग्रगण्य मार्क्सवादी नेते उद्गारले,‘ छे छे, हे शक्य नाही. कारण समाजवादी देश कधीच आक्रमण करीत नाही असे मार्क्स लिहून गेला आहे! गाई चुकून दुसऱ्या शेतात शिरतात तसा हा प्रकार असावा.’ खरे म्हणजे असले हे नेतेच चुकून एकोणिसाव्या शतकाऐवजी विसाव्या शतकात जन्माला आले आहेत! त्यामुळे ते डोळे उघडे ठेवून पहात नाहीत व जवळजवळ दीडशे वर्षांपूर्वीची पोथी वाचत राहून समाजवादाची कमालीची बदनामी करतात. म्हणून तर ‘समाजवाद म्हणजे नेमके काय?’ ते आज सांगायचे असेल तर मार्क्सवादी पोथीप्रामाण्य समुद्रात बुडवूनच सुरुवात करायला हवी. त्याची कारणे अशी—

१) समाजवाद साकार झालेला कार्ल मार्क्सने पाहिला नाही, पण आज समाजवादी अमलबजावणीचा प्रत्यक्ष अनुभव निम्म्या जगातील अनेक राष्ट्रांत लाभत असताना, पोथीत डोके खुपसून रहाणे चुकीचे ठरेल. मार्क्सचे शास्त्र हे संपूर्ण नाही, अंतिम नाही आणि मार्क्सने समाजवादी शास्त्राची फक्त कोनशिला बसविली असे लेनिन छातीठोक सांगतो ते योग्यच आहे. भारतीय स्वातंत्र्यासाठी जे लढले त्यांचा शब्द स्वातंत्र्यानंतरचा विकास प्रत्यक्ष साधताना अंतिम मान्यता येतच नाही. उदाहरणार्थ लोकमान्य टिळक म्हणत असत की एकदा का भारताला स्वातंत्र्य मिळाले म्हणजे सामाजिक सुधारणा सहजी अमलात आणता येतील. पण स्वातंत्र्यानंतरचा प्रत्यक्ष अनुभव निराळा असताना तो लक्षात घ्यायचा की महापुरुषाचा शब्द म्हणून लोकमान्य टिळकांचा विचार अंतिम प्रमाण मानायचा?

२) समाजवादात भक्कम केंद्र सरकार असते. गुणवत्तेप्रमाणे व कामाप्रमाणे दाम दिले जाते म्हणजेच किमान विषमता असते. कामचुकारांना सजा करण्यात येते. सापाने कात टाकावी त्याप्रमाणे ही समाजवादी अवस्था वर्गसंघर्ष संपल्यामुळे गळून न पडता, खुंटा हलवून अधिकच बळकट केली जाते! असेच रशियात घडत आहे, कारण मानवी विकार (काम, क्रोध, लोभ, मद, मत्सर, मोह) हे अंगभूतच असतात आणि माणूस आहे तोपर्यंत विकार रहाणारच हे अनिवार्य सत्य मार्क्सने लक्षात घेतले नाही यामुळे समाजवादानंतरचा टप्पा कल्पनेने सांगताना, माणूस हा विकारमुक्त आदर्श नागरिक होत जाईल व जेथे सरकारच नाही, कामचुकारपणा नाही, गुणवत्तेप्रमाणे विषमताही नाही, जो तो कुवतीप्रमाणे काम करील व गरजेप्रमाणे वस्तू त्याला दिल्या जातील असे भरमसाट स्वप्न-ज्याला कम्युनिझम म्हणतात—मार्क्सने रंगविले. माझ्या मते खुद्द कार्ल मार्क्सच या दृष्टीने ‘युटोपियन कम्युनिस्ट’ (अशक्य स्वप्न रंगविणारा कम्युनिस्ट) होता! आपल्यापूर्वीचे सोशॅलिस्ट हे युटोपियन सोशॅलिस्ट आहेत असे सांगून कार्ल मार्क्सने आपली शास्त्रीय मांडणी सुरू केली व

अखेरीस स्वतःच 'युटोपियन कम्युनिस्ट' झाला हा एक अपूर्व प्रकार आहे म्हणून मार्क्सच्या पोथीत आजही डोळे झाकून, जे घडले आहे ते नाकारणे घातकी आहे.

३) घातकी अशासाठी की, मार्क्सने अंतिम टप्प्याबाबत जो कविकल्पनेचा खेळ प्रत्यक्ष अनुभवाच्या अभावी केला तोच सत्य असे मानून भारतीय मार्क्सवादी नेते लोकासमोर साम्यवाद मांडतात. त्यातून भलभलत्या कल्पना अशा थराच्या पसरतात की, 'साम्यवादात मुलेदेखील स्वतःची रहात नाहीत, मग घर जमीन आदीचे सोडाच! धर्म तर साफ बुडतो.' परिणामी अकारण सार्वत्रिक विरोध होतो रशियातील समाजवाद जसा आहे तसा न सांगता, उगीच मार्क्सची पोथी शब्दजंजाळ उभे करीत मांडणारे मार्क्सवादी नेते अशा अपप्रचाराला खतपाणीच घालतात

## हेगेल आणि मार्क्स

४) मार्क्सने समाजवादानंतर अशक्य अशा साम्यवादाचा टप्पा का सांगितला? याचे पहिले कारण असे की, अत्यंत अभ्यासू अशा कार्ल मार्क्सला समाजवादी क्रांती पहायला मिळाली नाही. दुसरे कारण खुद्द मार्क्सनेच स्विकारलेल्या जर्मन तत्त्वज्ञानी हेगेल याच्या तत्त्वज्ञानात सांपडते. हेगेलचे म्हणणे असे होते की, मानवी प्रगती किंवा विकास मानवी विचारधाराच्या विरोधातून होतो. म्हणणे असे की, एक विचार अमलात आलेला असतो. त्याला हेगेल थिसिस म्हणतो याची अगदी दुसऱ्या टोकाची प्रतिक्रीया किंवा त्याला विरोध सुरू होतो त्याला हेगेल अॅन्टी–थिसिस म्हणतो मूळ विचार आणि टोकाची प्रतिक्रिया यांच्यात संघर्ष होऊन उत्क्रांती किंवा विकास होत जातो आणि मध्यम मार्गावर गाडी येते–ज्यात दोनही टोकांचे गुण असतात व अतिरेक टाळलेला असतो. त्याला सिन्थेसिस किंवा समन्वय म्हणतात.

कालांतराने या सिन्थेसिसचीच अतिरेकी प्रतिक्रीया पुढे येते आणि पुनः संघर्ष सुरू होतो. म्हणजेच थिसीस, अॅन्टी थिसीस व सिन्थेसिस अशा विरोधाच्या वाटचालीतून विकास होत राहतो. कार्ल मार्क्सने हेगेलचे हे विरोधातून विकासाचे तत्त्वज्ञान स्विकारले, पण मानवी विचाराचा असा संघर्ष होत नसून 'आहे रे' वर्ग आणि 'नाही रे' वर्ग यांचा संघर्ष होत विकास घडत राहतो असे मार्क्सने प्रतिपादन केले. म्हणजेच हेगेलने महान विचारवंताच्या विचारांना व पराक्रमी पुरुषाच्या कर्तृत्वाला महत्त्व दिले तर मार्क्सने अपरिहार्य कालगतीला व त्या त्या कालखंडातील अपरिहार्य अशा वर्गसंघर्षाला महत्त्व दिले. एकप्रकारे हेगेलने 'राजा कालस्य कारणम्' असे सांगितले तर मार्क्सने 'कालो एव कारणम्' असे बजावले.

मार्क्सच्याच सिद्धान्तानुसार माझे असे प्रतिपादन आहे की, भांडवलदारांची मालकी ही क्रिया अर्थात थिसीस होता. मार्क्सचे समाजवादानंतरच्या कम्युनिझमचे

अंतिम स्वप्न ही अतिरेकी प्रतिक्रीया अर्थात ॲन्टी थिसीस होता ! व्यवहारी समाजवाद–ज्यात भक्कम केंद्र सरकार आहे, राष्ट्रवाद आहे, व्यक्तीपुरता धर्म आहे, गुणवत्तेनुसार व कामानुसार विषमता आहे आणि उत्पादन साधनांची मालकी समाजाची असली तरी स्वतःपुरते घर,जमीन, तसेच मोटर, टेलिव्हिजन आदि ग्राहकी मालाची खाजगी मालकी आहे–हा सिन्थेसिस आहे कारण त्यात भांडवलशाहीतील पिळवणूक आणि मानवी विकाराचा बेफाटपणा नाही, आणि त्याचवेळी मार्क्सच्या युटोपियन कम्युनिझममधील स्वप्नाळूपणाही नाही ! हा सिन्थेसीस म्हणजेच 'प्रॅक्टीकल सोशॅलिझम' –जो आज रशियात आहे आणि भारताला स्वागतार्ह आहे.

## मार्क्सवादही डोक्यावर उभा

५) आता मार्क्सवादी परिभाषेतील काही शब्दांचा परिचय करून घेऊ या. हेगेलच्या तत्त्वज्ञानानुसार विचारवंतांच्या परस्परविरोधी विचारधारांच्या संघर्षातून विकासाची वाटचाल सुरू आहे. यालाच डायलेक्टीक म्हणतात. डायलेक्टीक म्हणजे वाद आणि वादातून तत्त्वबोध होतो [ वादे वादे जायते तत्त्वबोधः ] असे आपण म्हणतोच. मार्क्स म्हणाला की संघर्षातून विकास (डायलेक्टीक) हे बरोबर आहे. पण हा संघर्ष कुणाचा ? मार्क्स म्हणतो की, हा संघर्ष मानवी विचारधारांचा नसून 'आहे रे' वर्ग आणि 'नाही रे' वर्ग या दोन वर्गांमध्येच सतत संघर्ष (क्लास कॉन्फ्लीट) सुरू असतो. त्यातूनच विकासाची वाटचाल होते म्हणजे काळापुढेही धावणाऱ्या मानवी विचारधारेचे आणि मानवी नेतृत्वाचे महत्त्व मार्क्सने दुय्यम मानले म्हणूनच मार्क्सची संघर्षातून विकासाची मांडणी ही जडवादी आणि मानवनिरपेक्ष (मटेरिॲलिस्टीक डायलेक्टीक्स) मानली जाते. मार्क्सचा असा दावा होता की, संघर्षातून विकासाचे हेगेल तत्त्वज्ञान बरोबर होते, पण ते डोक्यावर उभे होते. कारण त्यात मानवी विचारधारांचा संघर्ष [ आयडीऑलॉजिकल डायलेक्टीक ]होता. मी ते पायावर उभे केले. म्हणजेच संघर्ष हा वैचारिक नसून वर्गसंघर्ष आहे असे मार्क्सने मांडले.

पण समाजवादी देशातील समाजवादाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीचा अनुभव पाहिला म्हणजे असे दिसते की मानवी विकार नि मानवी कर्तृत्व यांची उपेक्षा करणारा मार्क्सवादही डोक्यावर उभा राहिला ! कार्ल मार्क्सच डोक्यावर उभा राहिल्यामुळे विकासाचा कम्युनिझमचा स्वप्नाळू टप्पाही त्याला दिसू लागला ! मार्क्स म्हणाला की, वर्ग संघर्षातूनच विकास होतो. समाजवादात भांडवलदार वर्ग संपल्यामुळे वर्गसंघर्षच नष्ट होतो, पण वर्गीय विचारसरणी शिल्लक उरते. तिचाही निमोड झाला की, माणसाचा देवमाणूस होतो आणि संघर्ष लोप पावून कम्युनिझम येऊन अब्जावधी वर्षांचा विकासही थांबतो. विकासाचे हेच परमोच्च शिखर !

# आमचा भारतीय सिद्धांत

दुर्दैवाने मार्क्सच्या गणितात बसण्याइतके जग सरळ सीधे नाही ! कारण या जगात मानव आहे त्याचे विकार आहेत. त्याचे नवनवीन विचार आहेत. चित्त-थरारक शोध आहेत. मानवी बुद्धिमत्तेचा प्रवाह कोणताही प्रेषित धरण बाधून थाबवू शकत नाही. वर्गसघर्ष संपला तरी मानवी विचारधारांचा आणि मानवी विकारांचा संघर्ष सुरूच रहातो.

म्हणून मार्क्सचे डोक्यावर उभे राहिलेले तत्त्वज्ञान आम्ही भारतीयांनी पुनः पायावर उभे केले पाहिजे. कार्ल मार्क्स अधिक हेगेल अशी बेरीज केली पाहिजे व त्यात भर टाकली पाहिजे.

**माझा सिद्धांत असा की, विचारवतांच्या विचारांचा संघर्ष, आहे रे विरुद्ध नाही रे यांचा संघर्ष,मानवी विकारांचा [षड्‌रिपु] संघर्ष आणि मानवी असामान्य नेतृत्व या चारही कारणांनी विकासाची वाटचाल घडत असते.**

भांडवलशाहीत जेव्हा ही चारही कारणे एकाच दिशेने आपला प्रभाव टाकतात तेव्हा भांडवलशाही उलथतात आणि समाजवाद प्रस्थापित करतात. पण मानवी विकार समाजवादानंतर साम्यवादाकडे जाऊ न देता 'प्रॅक्टीकल सोशॅलिझम' कडे जाण्यास भाग पाडतात. मार्क्सने फक्त एकच कारण पायाभूत मानल्याने त्याचे गणित चुकले तर्कशास्त्रातील विख्यात पंडीत मिल म्हणतो की, कारण सपूर्ण असले पाहिजे ! म्हणजे असे की ते संपूर्ण कारण जर अस्तित्वात आले तर परिणाम झालाच पाहिजे. ऑक्सिजन मानवी जीवनासाठी आवश्यक आहे, पण ते मानवी जीवनाचे सपूर्ण कारण नव्हे यामुळेच ऑक्सिजन असला तर माणूस असेलच असे नाही ! त्या प्रमाणेच वर्गसंघर्ष असेल तर केवळ त्या एकमेव कारणाने भांडवलशाही उलथत नाही. नाहीतर इंग्लंड-जर्मनी फ्रान्स येथे रशियापूर्वी क्रांती झाली असती. वर्गसंघर्षाला क्रांतिकारी दिशा देणारा लेनिनही हवा—जो त्यासाठीच क्रांतिकारी पक्षाची निकराने आणि हिरीरीने आवश्यकता मांडतो त्याचा हा आग्रह 'व्हॉट इज टू बी डन' या पुस्तकाच्या पानावर आहे. ब्रिटन व अमेरिकेत भांडवलशाही विकसित होऊनही तिथे क्रांती न होता मागास रशियात क्रांती का झाली त्याचे मर्म माझ्या सिद्धातातूनच तर्कशास्त्रीय उलगडू शकते.

मानवी विकार असल्यानेच कम्युनिस्ट चीनचा माओ स्वत.च्या व राष्ट्राच्या अहंकारापायी आक्रमण करतो ! स्वतःचा माओवाद मांडतो आणि सोविएत रशियाला 'रिव्हीजनिस्ट' असल्याची मार्क्सवादी शिवी देतो इंग्लंडमध्ये सर्वप्रथम समाजवादी क्रांती न होता रशियात होते, कारण रशियाला लेनिनचे असामान्य नेतृत्व मिळाले ! चीनमध्ये कामगारवर्ग क्रांती घडवित नाही तर माओच्या नेतृत्वा-

मुळे शेतकरी क्रांती करतो. जेथे भांडवलशाहीची कधी सुरुवातही झालेली नाही अशा मध्य अशियातही भांडवलशाहीचा टप्पा न घेताच समाजवाद फुलतो, कारण लेनिनचे उत्तुंग व व्यवहारी नेतृत्व तसे घडविते! मानवी विचार नि विकार यांचा संघर्ष सुरूच राहतो म्हणून आजही रशियन सर्वोच्च नेत्यांत सतत वैचारिक संघर्ष आहे आणि नेतृत्वासाठी विकारी चुरसही सुरूच राहिली आहे!

६) यासाठीच समाजवादाचा निम्म्या जगातील प्रत्यक्ष अनुभव आणि स्वदेशातील विशिष्ट परिस्थिती याचा विचार करून, त्या त्या देशातील सोशॅलिस्ट व कम्युनिस्ट नेत्यांनी लोकांसमोर मांडले पाहिजे की, आमचा समाजवाद म्हणजे नेमके काय? रशियात जो व्यवहारी समाजवाद मी पाहिला त्या धर्तीचा पण स्वदेशी घाटणीचा समाजवाद भारतात जर अमलात आणला तर भारतातील नव्याण्णव टक्क्यांहून अधिक जनतेचा हमखास लाभ होईल. तोटा होईल तो फक्त बेफाम पैसा कमावणाऱ्या भांडवलदारांचा! टाटा बिर्ला-मफतलाल-कमानीसारखे भांडवलदार, अमिताभ बच्चनसारखे नट, स्मगलर, काळाबाजारवाले व्यापारी, लाचखोर राजकारणी नेते, उच्च सरकारी अधिकारी आणि तत्सम लोकांचा तोटा होईल. हा वर्ग एक टक्कासुद्धा असू शकत नाही. तथापि मार्क्सची पोथी जे वाचून दाखवितात आणि त्याच्या युटोपियन कम्युनिझमचा प्रचार करतात ते पोथीनिष्ठ मार्क्सवादी नेते नव्याण्णव टक्के लोकांना भलभलत्या कल्पनांनी भेदरवून टाकतात. ‘ खऱ्याखुऱ्या समाजवादाला पोथीनिष्ठ मार्क्सवाद्यांपासून वाचवा ’ असे एखाद्या दिवशी खुद्द कार्ल मार्क्सच थडग्यातून बाहेर येऊन म्हणाला तरी आता हे पोथीनिष्ठ मार्क्सवादी ऐकायचे नाहीत!

७) म्हणून मार्क्सचा ग्रंथ आता लायब्ररीत अर्थशास्त्र विभागात अभ्यासाकरिता ठेवायला हवा—त्या पलिकडे अखेरच्या प्रेषिताचे स्थान नाकारले पाहिजे पोथीप्रामाण्यवाद समुद्रात बुडविला पाहिजे. आता भांडवलशाहीत शोषण व पिळवणूक होते याची शास्त्रीय मांडणीही आंदोलनाकरिता जरूरच नाही. आपले शोषण होते असे सांगत, आता घरगडीही रस्त्यावर उभे ठाकले आहेत। युरोपीय व अमेरिकन भांडवलशाहीनेही स्वतःला तात्पुरते वाचविण्यासाठी आपला चेहरा मोहरा शक्य तितका बदलला आहे. मार्क्सची शास्त्रीय मीमांसा आता आंदोलनात आवश्यक नाही आणि त्याचा युटोपियन कम्युनिझम तर फेटाळलाच पाहिजे, कारण समाजवादाच्या प्रचारात तोच एक अडथळा झाला आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर, ‘ ब्रिटिश साम्राज्यात भारतासारख्या वसाहतीचे कसे शोषण होते? ’ त्याची दादाभाई नौरोजी यांनी पारतंत्र्य काळात जी मीमांसा केली ती इतिहासजमा झाली ना? त्याच न्यायाने समाजवाद निम्म्या जगतात अमलात आला असल्यामुळे मार्क्सच्या ग्रंथांनाही आता अर्थशास्त्रीय ग्रंथाच्या

संग्रहालयात स्थान दिले पाहिजे. लेनिन आणि यूरी ॲन्ड्रोपोव्हसारखे त्याचे शिष्य यांचे ग्रंथ टेबलावर भारतीय ग्रंथासोबत ठेवले पाहिजे.

अर्थात मी असे म्हटले तर मला ' अति शहाणा म्हणून विरोधक मोकळे होतील. पण पुस्तकाची प्रुफे तपासतानाच मला जबरदस्त आधार मिळाला आहे. यूरी ॲण्ड्रोपोव्ह काय म्हणतात ते इंग्रजीतच पहा–

A person does the right thing today when, after asking to know socialism turns for an answer, above all, to the works of Marx, Engels and Lenin But one can no longer limit oneself to this Today the notion of socialism can be apprehended only bytaking into account the very rich experience of the people of theSoviet union and other fraternal countries... To chek one's current activities with Marxism-Leninism does not at all mean mechanically to compare on-going processes in life with particular formulas-- Marxism is not a dogma, but a living guide to action [ Yuri Andripov's artice on " The teaching of KarlMarx and some questions of building socialism in the USSR', 1983 ]

याचा मराठी तर्जुमा असा– ' समाजवाद म्हणजे काय ? याच्या उत्तरासाठी मार्क्स, एन्जल्स, लेनिन यांच्या लिखाणाकडे वळणे अगदी बरोबर आहे. पण आता मात्र स्वत:ला एवढ्यानेच मर्यादित करता येणार नाही. रशियन जनतेचा आणि बंधु राष्ट्रांतील जनतेचा प्रचंड समृद्ध अनुभव घेतल्यावरच समाजवादाच्या कल्पनेचे नीट आकलन होईल आपली आजची धोरणे मार्क्स लेनिनशी तपासून घेणे याचा अर्थ वहात्या जीवनातील प्रक्रिया यांत्रिकपणे विशिष्ट फॉर्म्युल्यात तपासणे असा बिलकूल नाही मार्क्सवाद म्हणजे पोथीप्रामाण्य नव्हे ते कृतीसाठी जिवत मार्गदर्शन आहे ' ( यूरी ॲण्ड्रोपोव्ह याचा ' कार्ल मार्क्सची शिकवण आणि रशियातील समाजवादाच्या उभारणीचे काही प्रश्न ' हा लेख पहा–१९८३)

आता बोला यूरी ॲण्ड्रोपोव्ह ' अति शहाणे ' आहेत काय ?

८) आणि भारतात कोणता समाजवाद अंमलात आणणार ? ते भारतातील सोशॅलिस्ट नेत्यांनी नेमके सांगितले पाहिजे. विशिष्ट भारतीय परिस्थिती लक्षात घेऊन, भारतात अमलात आणावयाचा समाजवाद नेमका सांगितला तर नव्याण्णव टक्के भारतीय लोक हा विचार उचलून धरतील.कारण नव्याण्णव टक्के जनतेचे हित होणार आहे.

## समाजवादी भरकटले

पण तसे करण्याऐवजी भारतीय सोशॅलिस्ट नेत्यांनी आपला पक्षच नाहीसा केला. मोरारजींच्या माडीला माडी लावून सोशॅलिस्ट नेते जॉर्ज फर्नांडीस भारताचे उद्योग-

मंत्री झाले. आपण उद्योग मंत्री असताना मक्तेदार भांडवलदाराची संपत्ती अफाट वाढली याची त्यांना खंतही वाटत नाही. केवळ इंदिरा गांधींचा पराभव करून समाजवादाचे एक पाऊलही पडत नाही हे जॉर्ज फर्नांडीस, मधु लिमये, नानासाहेब गोरे, एसेम जोशी, मधु दंडवते या नेत्यांना अजून समजायचे आहे काय?

निश्चित कार्यक्रम मांडून सत्ताधाऱ्यांचा पराभव करतील तेव्हाच समाजवादी वाटचाल होईल. पण असे काही करता येईल याबाबत या समाजवादी नेत्यांची निराशा झालेली दिसते. यामुळे लोकांचीही या नेत्याबाबत निराशा झाली आहे!

९) 'समाजवाद म्हणजे नेमके काय?' त्याची रुपरेषा मार्क्सचे पोथीप्रामाण्य समोर ठेवून नव्हे तर देशातील परिस्थिती समोर ठेवून आखली पाहिजे. नवीन तरुण पिढीने स्वागत केल्यानंतर कोणतेही पोथीप्रामाण्य व जुन्यापुराण्या नेत्यांचे नेतृत्व समुद्रात बुडवून नव्या दमाने 'प्रॅक्टीकल सोशॅलिझम' पुढे सरसावू शकेल.

'१०) आम्हाला असे निराधार वाटत नाही रशिया दर्शन घडविणारे आठ अग्रलेख 'नवाकाळ' मध्ये प्रसिद्ध झाल्यानंतर शिवसेना प्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे यांनी जाहीर सभांतून सांगितले की, 'हे आठही अग्रलेख प्रत्येकाने वाचले पाहिजेत रशियातील समाजवाद जर असा असेल तर आम्ही स्वीकारण्यासारखे त्या सिस्टीममध्ये बरेच काही आहे. पण भारतीय कम्युनिस्ट नेते व सोशॅलिस्ट नेते यांना असे रशिया दर्शन कधी घडविताच आले नाही आणि भरमसाट काहीतरी सांगत राहिले!' ज्यांचे मत विरोधी होते अशा बाळासाहेबांसारख्या कर्तबगार नेत्याला 'व्यावहारिक समाजवादा' चे निःपक्ष, डोळस दर्शन जर फेरविचार करावयास लावत असेल तर 'समाजवाद म्हणजे नेमके काय?' त सांगायलाच हवे. तेच अखेरच्या लेखात सांगू या.

: १६ :

# ९९ टक्के जनतेला लाभ देणारा प्रॅक्टीकल सोशॅलिझमचा कार्यक्रम

मॉस्कोतील क्रेमलिनच्या मनोऱ्यावर जसा लाल तारा चमकत असतो तसाच भारतीय व्यवहारी समाजवादाचा तारा ( स्टार ) भगव्या रंगाचा असावा. कारण भगवा रंग हा निर्लोभतेचा आणि निर्धाराचा प्रतिक आहे. असे निर्लोभ नेतृत्व व असा निर्धारी अनुयायी वर्ग लाभल्याखेरीज समाजवाद साकार होणार नाही.

भारतीय भगवा तारा दशकोनी असावा. त्याचा पहिला कोन असा—

## भांडवलशाही नष्ट होणार—

१ ) उत्पादनाची साधने म्हणजेच गिरण्या-कारखाने तसेच शहरी जमीन व इमारती यांची खाजगी मालकी रद्दबातल करून सर्व उत्पादन साधने समाजाच्या मालकीची केली जातील. स्वतः व कुटुंबिय यांना रहाण्यासाठी ज्यांची जागा असेल त्याच्या जागेचा ताबा त्याच्याकडेच राहील, पण जागा भाड्याने दिलेली असेल तर ती सरकारच्या मालकीची होईल.

यामुळे विषमतेचे आणि पिळवणुकीचे मूळच नाहीसे होईल. यंत्रामुळे उत्पादन शेकडो पटीने जास्त होते व यंत्रांवरील मालकीमुळेच गिरणी कारखाना याचे तोंडही न पहाता भांडवलदार गडगंज नफा कमावू शकतात. ही मालकी रद्द झाली की, विषमता व पिळवणूक नष्ट होईलच, पण गडगज संपत्तीच्या जोरावर भांडवलशाहीने मंत्री, सरकारी अधिकारी आणि नोकरशाही याना लाचलुचपतीने पूर्ण भ्रष्ट केले आहे त्या भ्रष्टाचाराचे मूळही उखडले जाईल.टाटा बिर्ला मफतलाल याना कोट्यावधी

रुपयांची अमाप संपत्ती स्वतःच्या चैनीसाठी हवी असते का ? त्यांची रहाणी तर साधीच असते आणि त्यानी चैनच करायचे ठरविले असते तरीसुद्धा काही लाखाची संपत्ती निश्चित पुरेशी आहे. त्याना अमाप संपत्ती हवी असते ती इतर माणसाना विकत घेण्यासाठी, लाचार व मिंधे बनविण्यासाठी, स्वतःची नफेबाजी मोकाट चालविण्यासाठी, सारे सरकार भ्रष्ट करण्यासाठी आणि बुद्धिमंत बोलता व लिहीता वर्ग वृत्तपत्रासहित पदरी बाळगण्यासाठी ! उत्पादन साधनांची मालकी समाजाची झाली म्हणजे बिभत्स विषमता, कामगार वर्गाची पिळवणूक, पोखरणारा भ्रष्टाचार आणि बुद्धिमंताची खरेदी या साऱ्यांचेच पेकाट मोडेल.

## सर्वंकष नियोजन

२) उत्पादन साधने समाजाच्या मालकीची झाल्यामुळे सर्वंकष नियोजन विना अडथळा आणि धडाक्याने पार पाडण्यासाठी पंचवार्षिक योजना तपशीलवार तयार केल्या जातील.

अशा योजनेत शहरात कोणताही नवीन कारखाना काढावयाचा नाही आणि मागस विभागावर सत्तर टक्के खर्च करावयाचा अशी दोन सूत्रे असावीत. नियोजन हे केंद्रीयच असेल, पण नियोजन मंडळाच्या तालुकानिहाय शाखा रहातील व त्यांच्याशी सर्वांगीण चर्चा करूनच केंद्रीय नियोजनाचा अंतिम आराखडा तयार होईल. एकदा आराखडा जाहीर केला की, कोणतीही अडचण कठोरपणे दूर केली जाईल प्रचंड कारखाने आणि प्रकल्प या बाबतीत समाजवादी समाजरचना भांडवलशाहीच्या दुप्पट वेगाने यश मिळविते हे साधार सिद्ध झाले आहेच.

## कामगारांचा फायदा

३) संपूर्ण देशासाठी राष्ट्रीय वेतनश्रेणी ठरविण्यात येईल. प्रत्येक कारखान्यात तेथील कामगारानी त्याच्यातून निवडून दिलेला ट्रेड युनियन नेता असेल. मॅनेजरची जबाबदारी उत्तम दैनंदिन कारभाराची, पक्ष नेत्याची जबाबदारी मॅनेजरशी सल्ला-मसलतीने समाजवादी धोरणानुसार कारखान्याच्या विकासाची आणि ट्रेड युनियन नेत्यावर कामगाराकडून चोख काम करून घेण्याची जबाबदारी राहील.

वेतनश्रेणी ठरविताना कामानुसार आणि गुणवत्तेनुसार दाम हे तत्त्व राहील. किमान वेतन व कमाल वेतन यात सातपट जास्तीत जास्त फरक राहील. कारखान्यातील उत्पादनाचे उद्दीष्ट ठरवून देण्यात येईल आणि त्यापेक्षा जितके अधिक उत्पादन होईल त्यासाठी खास बोनस दिला जाईल. एकुण नक्त फायद्यापैकी २५ टक्के कामगाराना, २५ टक्के विकासासाठी आणि ५० टक्के सरकारला कररुपाने जातील. कामगाराची २५ टक्के रक्कम त्याच्या ट्रेड युनियनकडे दिली जाईल. त्यापैकी निम्मी रक्कम सुविधांकरिता खर्च करून निम्मी रक्कम बोनस म्हणून दिली जाईल वेतनाचा प्रश्न राष्ट्रीय पातळीवरील असल्याने त्याबाबत मागणी कारखान्यातील ट्रेड युनियनला करता

: १६ :

# ९९ टक्के जनतेला लाभ देणारा प्रॅक्टीकल सोशॅलिझमचा कार्यक्रम

मॉस्कोतील क्रेमलिनच्या मनोऱ्यावर जसा लाल तारा चमकत असतो तसाच भारतीय व्यवहारी समाजवादाचा तारा ( स्टार ) भगव्या रंगाचा असावा. कारण भगवा रंग हा निर्लोभतेचा आणि निर्धाराचा प्रतिक आहे. असे निर्लोभ नेतृत्व व असा निर्धारी अनुयायी वर्ग लाभल्याखेरीज समाजवाद साकार होणार नाही.

भारतीय भगवा तारा दशकोनी असावा. त्याचा पहिला कोन असा—

## भांडवलशाही नष्ट होणार—

१ ) उत्पादनाची साधने म्हणजेच गिरण्या-कारखाने तसेच शहरी जमीन व इमारती याची खाजगी मालकी रद्दबातल करून सर्व उत्पादन साधने समाजाच्या मालकीची केली जातील. स्वतः व कुटुंबिय यांना रहाण्यासाठी ज्यांची जागा असेल त्याच्या जागेचा ताबा त्यांच्याकडेच राहील, पण जागा भाड्याने दिलेली असेल तर ती सरकारच्या मालकीची होईल.

यामुळे विषमतेचे आणि पिळवणुकीचे मूळच नाहीसे होईल. यंत्रांमुळे उत्पादन शेकडो पटीनें जास्त होते व यंत्रांवरील मालकीमुळेच गिरणी कारखाना यांचे तोंडही न पहाता भांडवलदार गडगंज नफा कमावू शकतात ही मालकी रद्द झाली की, विषमता व पिळवणूक नष्ट होईलच, पण गडगंज संपत्तीच्या जोरावर भांडवलशाहीने मंत्री, सरकारी अधिकारी आणि नोकरशाही याना लाचलुचपतीने पूर्ण भ्रष्ट केले आहे त्या भ्रष्टाचाराचे मूळही उखडले जाईल.टाटा बिर्ला मफतलाल यांना कोट्यावधी

येणार नाही. तसेच बाहेरील धदेवाईक ट्रेड युनियन नेतृत्व बरखास्त केले जाईल.

प्रत्येक कामगाराला कार्ड दिले जाईल. त्यावर त्याची सर्व माहिती व छायाचित्र असेल. कामचुकारपणाबद्दल काढून टाकले असेल तर तशी नोंद कार्डावर होईल आणि कार्ड पाहिल्यशिवाय नवी नोकरी दिली जाणार नाही. एकदर नोकरी तीस वर्षांची होताच हे कार्ड पेन्शन ऑफिसात नेऊन द्यायचे व त्यानतर एका आठवड्यात शेवटच्या पगाराच्या पन्नास टक्के तहहयात पेन्शन सुरू होईल. या कार्डाखेरीज आणखी कोणत्याही कागदपत्राची जरूरी नाही.

## शहरातील लोंढे बंद

४) प्रत्येक प्रौढ नागरिकाजवळ ओळखपत्र असेल आणि त्याला परवानगी-खेरीज अन्य शहरात किंवा अन्यत्र कायम वस्तीसाठी जाता येणार नाही. रेल्वेपास जसा जवळ ठेवायचा तसेच हे कार्ड जवळ ठेवावे लागेल.

## समान मोफत शिक्षण

५) शिक्षण सर्वत्र समान आणि मोफत केले जाईल. हप्त्या हप्त्याने एस. एस. सी. पर्यंतचे शिक्षण सक्तीचे केले जाईल. त्यासाठी सर्व शाळांचे राष्ट्रीयीकरण केले जाईल. विशिष्ट विषयात ज्यांची खास बुद्धीमत्ता प्रगट होईल अशा मुलासाठी आठव्या इयत्तेपासून खास शाळा (क्रिडा, कला, गणित, तत्रज्ञान, विज्ञान आदि) रहातील आणि त्यात प्रवेशासाठी खास परीक्षा असतील. तेथे समान अभ्यासक्रमातील एक विषय कमी करून खास विषयाकरिता अधिक तास व खास सोयी असतील

यामुळे जातीय विषमता आणि आर्थिक विषमता यांचे मूळच उखडले जाईल आणि मुलांचे भावी जीवन केवळ गुणवत्तेवर व अभ्यासावर अवलंबून राहील. गळ्यात गरिबीचा धोंडा बांधून गरिबाच्या मुलांना धावावे लागते तशी स्थिती नाहीशी होईल. लहानपणापासूनच प्रत्येकाला आत्मविश्वास प्राप्त होईल. श्रीमंताची मुले लाडावतात व गरिबांची मुले कोमेजतात ही मानव शक्तीची उधळपट्टी नाहीशी होईल. केवळ गुणवत्तेचाच मानसन्मान राहील, देणगीदाराचा नव्हे!

अभ्यासक्रम ठरविताना प्रत्यक्ष शिकविणारे शिक्षक आणि शिक्षण तज्ञ यांची कमिटी जवळ जवळ एकमताने निर्णय घेईल.

एस. एस. सी. नतर पदवीचा अभ्यासक्रम पाच वर्षांचा राहील आणि या अभ्यासक्रमात साठ टक्के स्पेशलायझेशन व चाळीस टक्के सर्वसाधारण ज्ञान राहील. यामुळे विशेष ज्ञानाबरोबरच व्यक्तिमत्व समतोल राहील. पदवीधरांची गरज लक्षात घेऊन तितक्याच जागा त्या त्या शाखेत रहातील व पदवी परीक्षा उत्तीर्ण होण्यापूर्वीच सहा महिने त्यांची नोकरीवर नेमणूक केली जाईल. पदवी अभ्यासक्रमासाठी एम.

एस. सी. नंतर प्रवेश देताना पुनः परिक्षा घेतली जाईल व फलकावर गुणवत्ता लावून त्यानुसारच जितक्या जागा आहेत तितक्या भरल्या जातील.

## धर्म व्यक्तीपुरता

६ ) धर्म हा घरात व प्रार्थनास्थळातच राहील. त्यात हस्तक्षेप होणार नाही. पण त्याच वेळी हिंदू समाजातील पुजारी आणि मुस्लिमातील मुल्ला-मौलवी किंवा अन्य धर्मप्रमुख यांनी स्वतःचे प्रस्थ माजविण्यासाठी धर्माच्या नांवाखाली समतेला हरताळ फासणारे जे अन्यायकारक नियम केले आहेत त्यांचा मुलाहिजा ठेवला जाणार नाही. त्याचप्रमाणे किमान तीन वर्षांचा समाजवाद, तत्त्वज्ञान, विज्ञान याचा परिचय करून देणारा अभ्यासक्रम पार पाडील त्यालाच पुजारी किंवा मौलवी किंवा ख्रिस्ती पाद्री म्हणून मान्यता दिली जाईल. जन्मजात किंवा पिढीजाद नेमणुका रद्द केल्या जातील कुठल्याही विकास योजनेच्या आड धर्माला येऊ दिले जाणार नाही.

यामुळे प्रत्येकाला धर्माचे पालन करता येईल, पण धर्म घरापुरताच व प्रार्थनास्थळापुरताच राहील. पुरोगामी समाजवादी चळवळीच्या आड तो येऊ शकणार नाही. बालविवाह, विधवाचे केशवपन, विधवा विवाहाला बंदी, स्त्रियाना शाळेत जाण्यास मनाई, शुद्रांची गुलामी असला बेशरमपणा हिंदूच्या वेदात किंवा भगवद्‌गीतेत सांगितलेला नाही. स्त्रियाना गोषातच ठेवावे, त्यांना घराबाहेर जाऊ देऊ नये असा सर्वशक्ती मान अल्लाने कधीही आदेश दिलेला नाही. समतेविरुद्ध किंवा राष्ट्रीय धोरणाविरुद्ध कोणताही धार्मिक नियम सांगणे हा गंभीर गुन्हा मानला जाईल दारू पिऊ नये असे कुराण सांगते, पण हजारो मुसलमान दारू पितातच ! सारांश धर्माचा फक्त हितसंबंधी सोयीसाठी स्वार्थी नेत्याना आणि धर्मवेड्याना उपयोग करून दिला जाणार नाही.

प्रत्येकाला शिक्षण सक्तीचे द्यायचे म्हणजे प्रत्येक मुला मुलीला शाळेत गेलेच पाहिजे. या आड जे येतील किंवा अशाच प्रगतीपर वाटचालीचे आड जे येतील त्याना जन्मठेप सजा दिली जाईल. कारण एरवी स्त्रियांची, शूद्रांची जन्मठेप चालू राहिल ! एकदा सर्व स्त्रीपुरुष शिक्षित झाले व समाजवादी अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेले मुल्ला मौलवी व पुजारी धर्म सांगू लागले की प्रत्येक धर्म समाजवादाचा पुरस्कारच करील.

मात्र घरापुरता व प्रार्थनास्थळापुरता धर्म प्रत्येकाला पाळता येईल हे समाजवादी तत्त्व भारतात ठासून सांगितले पाहिजे. यामुळे अकारण विरोध नाहीसा होईल व फक्त कडव्या प्रतिगामी धर्मवेड्यांचा विरोध राहील. तो तोडून टाकावा लागेल.

## छोटी दुकाने ज्याची त्याचीच

७ ) भारतीय परिस्थितीत स्वत. आणि स्वतःच्या कुटुंबातील व्यक्ती यांनीच चालवलेली छोटी दुकाने खाजगी मालकीचीच रहातील. त्यांची दुकाने घेणार नाहीतच, पण त्यांच्याकडे जाऊन सरकारी अधिकारी मदत करतील.

इतरांचे शोषण करता येणार नाही आणि भरमसाट कमविता येणार नाही असा बंदोबस्त केल्यानंतर छोटी आणि स्वत:च्याच श्रमावर चालविलेली दुकाने खाजगी मालकीचीच असतील. सर्वंकष नियोजनात छोटी दुकाने चालविणे कठीण जाते व फक्त मोठमोठी डिपार्टमेंटल स्टोअर्स काढावी लागतील. प्रत्येक गोष्टीच्या खरेदीसाठी दूरवर जाणे हे जिकीरीचे होते. रशियातील वाटप व्यवस्थेत हा दोष राहिला आहे, शिवाय ही प्रचंड दुकाने उशिरापर्यंत उघडी नसतात हाच दोष इंग्लंड अमेरिकेसारख्या बड्या भांडवलशाही देशातही आहे. तिथेही आपल्यासारखी छोटी दुकाने जवळ जवळ नसतात.

रशियातील वाटप व्यवस्थेबद्दल तेथील अधिकाऱ्यांना मी म्हणालो, "भारतात छोटी दुकाने शेकडोंनी असतात मी रहातो तेथून पधरा मिनिटांच्या अंतरात घड्याळ टी. व्ही -कपाटे-कापड-औषधे यापासून दूध-चहा, पाव खाद्य पदार्थ-भाजी-पाला विडी काडी-स्टँप-पुस्तके काहीही मिळेल या सर्व जिन्नसांसाठी मला रशियात दूरवर प्रचंड डिपार्टमेंटल स्टोअरमध्ये जावे लागेल. तुमचे रस्ते इतके रुंद आहेत—पण तेथे क्वचितच छोटा स्टॉल ( लॅरीओक ) दिसतो. तुम्ही विविध जिन्नस विकत देण्यासाठी असे स्टॉल का टाकत नाही ?" ते उत्तरले, "त्यावर काम करायला माणसे कुठून आणणार ? रहाण्याची जागा, शिक्षण, औषधे या मोफत सोयींखेरीज विक्रेत्याला किमान दोन हजार रुपये पगार द्यावा लागणार. छोट्या स्टॉलने त्यांच्या-वरील अशा खर्चाची भरपाई कुठून होणार ? शिवाय उत्तम पगारामुळे व विनामूल्य सोयींमुळे स्वतःच्या मालकीची दुकाने चालवायलाही माणसे मिळत नाहीत."

## समान नागरी कायदा

८ ) संपूर्ण देशात समान नागरी कायदा अमलात येईल.

देशात समान नागरी कायदा अंमलात आणल्याशिवाय समतेला अर्थच रहाणार नाही. राष्ट्रीय समाजवादी धोरणाच्या आड धर्म येता कामा नये, या तत्वाची कसोटी येथेच लागेल. सदर तत्व अमलात आणण्यासाठी कोणतीही किंमत जास्त मानली जाणार नाही.

## नवीन न्यायदान पद्धती

९ ) नवीन तीन पदरी न्यायदान पद्धती अमलात आणली जाईल आणि गुन्हेगाराला संशयाचा फायदा देण्याचे तत्व झिडकारले जाईल.

नेताजी सुभाषचंद्र बोस म्हणत असत की, भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पहिली किमान दहा पधरा वर्षे हुकूमशाहीच हवी. कारण त्याशिवाय या देशाच्या शेकडो वर्षे हाडीमासी खिळलेली बेशिस्त, जातीयता, बेपर्वाई, राष्ट्रप्रेमाचा अभाव आदि दोष नष्ट करता येणार नाहीत तथापि हुकूमशाहीला समाजकल्याणाचे निश्चित धोरण हवे. नाहीतर ती जुलमशाही होते. समाजवादी राजवटीत निश्चित धोरण

असतेच नेताजींनी म्हटल्याप्रमाणे हाडीमासी खिळलेले दोष व बेशिस्त दूर कर ण्यासाठी प्रारभी पधरा वर्षे 'गुन्हेगार सुटता कामा नये आणि निकाल लाबता कामा नये' यालाच सर्वाधिक महत्व दिले गेले पाहिजे.

आपण ब्रिटीश ससदीय लोकशाहीचा एकदम स्वीकार केला आणि न्यायदान पध्दतीही ब्रिटीशानीच निर्मिलेली जशीच्या तशी चालू राहिली आहे. पण ब्रिटनमधील शेकडो वर्षे विकसीत होत गेलेली प्रगतीशील लोकशाही व उदारमतवादी न्यायदान पद्धती मागास भारताला समर्पक नव्हती. त्याहीपेक्षा महत्वाचे म्हणजे खुद्द ब्रिटन हेच आज जगात एक दुय्यम राष्ट्र झाले आहे. त्यांची पद्धतीही तुफान वेगाने विकसित होणाऱ्या विज्ञानापुढे व तत्रज्ञानापुढे अपुरी आणि थिटी पडत आहे. प्रचंड गती हे आजच्या जगाचे वैशिष्ठ्य आहे आणि समाजवाद या अफाट गतीशी सुसगत ठरला आहे.

म्हणून प्रचलित न्यायदान पद्धती मोडीत काढली जाईल. या पद्धतीचे सूत्र असे की शभर गुन्हेगार सुटले तरी चालतील, पण एका निष्पाप माणसाला सजा होता कामा नये. या पद्धतीत अति विलब आहेच पण फसवा न्याय आहे. समजा, शभर खुनी या तत्वाने सोडले तर ते बाहेर पडल्यानंतर दोनशे निष्पाप जीवांचा बळी घेतात म्हणजे एका निष्पाप माणसाला सजा होऊ नये म्हणून खुनी माणसे, दरोडेखोर, स्मगलर मोकाट सोडून दोनशे निष्पाप जीवांचा खून होऊ द्यायचा हा कुठला न्याय! रगा आणि बिल्ला हे असेच कोर्टातून सुटत राहिले व अखेर त्यानी प्रतिष्टीत चोपडा कुटुंबातील एक मुलगा व एक मुलगी यांचाही क्रूरपणे खून केल्यावरच सहजच होऊन ते फासावर गेले. शिवाय ज्याचा क्रूरपणे खून झाला, त्यांना आमचे सुप्रीम कोर्ट विचारातही घेत नाही, पण दोरखडाने फांशी देताना खुन्याना फार त्रास होत नाही ना, याचा विचार करीत तीनचार महिने गमावण्यास तयार असते. न्यायदान पद्धतीत असा भ्रामक न्याय, जखमेवर मीठ चोळणारा तमाशा, विलब आणि श्रीमंतांनाच परवडणारा खर्च आहे परिणामी गुन्हेगार, समाजकंटक, काळाबाजारवाले, खुनी, दरोडेखोर यांना सोयिस्कर आणि उत्तेजनपर अशी आजची न्यायदान पद्धती असून ती मोडीत काढली जाईल.

एका निष्पापाला सजा होऊ नये म्हणून दोनशे निष्पापाचा खून होऊ देणारी, 'पुरेशा पुराव्या अभावी' गुन्हेगाराला आणखी गुन्हे करण्यास मुभा देणारी आणि बलात्काराचा बळी असलेल्या स्त्रीचेच कोर्टात धिंडवडे काढणारी न्याय पद्धती समाजवादात नष्ट केली जाईल. या दृष्टीने एका निष्पापाला सजा झालेली परवडेल पण त्यामुळे शभर गुन्हेगार समाजवादी न्याय पद्धतीत सुटू शकणार नाहीत! 'प्रत्येक गुन्हेगाराला सजा झालीच पाहिजे, मग एखादा निष्पाप जीव सजेवर गेला तरी नाईलाज आहे' असे सूत्र अगिकारले जाईल. त्याचप्रमाणे शभर माणसांच्या हिताला

जर एका व्यक्तीचे 'व्यक्तीस्वातंत्र्य' धोका व बाधा आणत असेल तर ते व्यक्तीस्वातंत्र्य अमान्य केले जाईल.

न्यायदान तीन पदरी राहील

( अ ) खून बलात्कार, स्मगलिंग यासारखे गंभीर गुन्हे आणि समाजवादाविरुद्ध संघटना करणे, किंवा राष्ट्रीय योजनेच्या अमलबजावणीत अडथळे आणणे–अशा प्रकरणी एका वर्षात निकाल दिलाच पाहिजे. तोवर जामिनावर सुटका होणार नाही

( ब ) मारहाण, दोन गटातील दंगल, लुटणे अशा प्रकारचे मध्यम तीव्रतेचे खटले–अशा प्रकरणी सहा महिन्यात निकाल दिला पाहिजे. संशयाला भळकट जागा असेल तरी सजा केली जाईल आणि जामिनाचीही पद्धत रहाणार नाही. यामुळे कोणा वकिलाला किंवा समाज कार्यकर्त्याला पोलीस स्टेशनावर येण्याची परवानगी रहाणार नाही

( क ) रस्त्यावर कचरा टाकणे, झिंगून आरडाओरड करणे, धाकदपटशा, बेफाम वाहने चालविणे–अशा प्रकरणी मोबाईल कोर्टे आणि पोलीस स्टेशनातील कोर्टे तडकाफडकी निर्णय देतील या खटल्यांत अपील राहणार नाही आणि वकील देता येणार नाही

( ड ) संसदेने केलेला कोणताही कायदा हा अंतिम राहील. त्याला आव्हान देता येणार नाही.

## छोटी शेती ज्याची त्याची

स्वतः आणि स्वत.चे कुटुंबिय यांनाच कसता येईल अशी छोटेखानी शेती ज्याची आहे त्याचीच राहील.

शेती उत्पादनात समाजवादी राष्ट्रांना सर्वत्र अडचणी आल्या आहेत. कारखाना विशिष्ट क्षेत्रात असतो आणि त्यामुळे नियन्त्रित करता येतो यंत्रावर किती उत्पादन केले पाहिजे तेही निश्चित करता येते व काम संपताना उत्पादन मोजून घेता येते पण शेती अफाट पसरलेली असते सध्याकाळी लगेच उत्पादन मोजून घेता येत नाही त्यामुळे सर्व शेतजमिनीचे राष्ट्रीकरण मार्क्सवादी पोथीप्रामाण्याच्या नादी लागून ज्यानी केले त्यांना फेरविचार करावा लागला आहे.

म्हणून शेतकऱ्याला किंवा कुणालाही शहरी विभाग नसलेल्या भागात स्वतःचे घर आणि घराभोवती किंवा पाच किलोमिटर अंतरात स्वत.ला कसता येईल इतकी जमीन स्वतःच्या मालकीची ठेवता येईल मात्र त्यांना घर अथवा जमीन सरकार-

खेरीच कुणालाही विकता येणार नाही. त्यांना आपला माल खाजगी मार्केटला किंवा सरकारला स्वेच्छेनुसार विकता येईल.

याशिवाय दहा शेतकऱ्यांना एकत्र येऊन रितसर 'सहकारी शेती' करता येईल. त्यांना मजूर कामावर ठेवता येणार नाहीत आणि उत्पादन सरकारलाच द्यावे लागेल. त्यांना सरकार सर्व प्रकारची मदत करील.

सामुदायिक शेती ही मोठ्या प्रमाणातील शेती असेल. तिचा कारभार एखाद्या कारखान्याप्रमाणेच चालेल उत्पादनाचे उद्दीष्ट ठरवून दिले जाईल. उत्पादन सरकारलाच विकावे लागेल. सामुदायिक शेतीवर उद्दीष्टापेक्षा जास्त उत्पादन झाले तर जादा भावाने जादा उत्पादन सरकार विकत घेईल. ही आर्थिक प्रेरणा आजच्या रशियात अमलात आली आहे.

सरकारी शेती अर्थात अतिप्रचंड प्रमाणात असेल. तेथे सर्व आधुनिक तंत्रज्ञान, संशोधन, अवजारे उपलब्ध असतील. हे सर्व तंत्रज्ञान व अवजारे याचा प्रचार सहकारी शेतीवर व सामुदायिक शेतीवर केला जाईल.

कुटीरोद्योग, पशुपालन, छोटा उद्योगधंदा ग्रामीण भागात कुणालाही करता येईल, पण स्वतः आणि स्वत.चे कुटुंबिय यानाच काम करावे लागेल. त्यांना आपला माल खाजगी मार्केटात विकता येईल.

भारतातील शेतकऱ्यांचे आपल्या जमिनीवर आईप्रमाणे प्रेम असते. समाजवादातील या निश्चित धोरणामुळे छोट्या शेतकऱ्याना, जे बहुसंख्य आहेत, अभय राहीलच पण उत्पादन विकत घेणारा दलाल गेल्यामुळे त्यांचा उत्साह वाढेल. समाजवादाला विरोध फक्त मोठ्या मूठभर जमीनदारांचा राहील.

अशा स्वरुपात 'प्रॅक्टीकल सोशॅलिझम' माडला तर विरोध कमीत कमी होईल. निश्चित विचारसरणीमुळे पक्षाचे कडवे केडर बांधता येईल. तसेच समाजवादी पक्ष आणि समाजवाद बिल्ल्याप्रमाणे ओठावर रंगविणारे पक्ष याच्यातील फरक स्पष्टपणे लोकांच्या नजरेसमोर येईल

भारतातील सद्यपरिस्थिती पाहिली तर लष्करी हुकूमशाही डोकाडी बसण्याचा धोका आहे पण कुणा तरी खोमेनीसारख्या किंवा पाकच्या प्रेसिडेंट झियांसारख्या पुराणमतवादी लष्करशहाची हुकूमशाही भारताला आणखीनच खोड्यात टाकील. निश्चित समाजवादी विचारसरणी आणि निर्धारी कार्यकर्त्यांचे जाळे नसल्यामुळे लष्करशहाची हुकूमशाही कोलमडेल-तो अनुभव पाकिस्तानने उभा केलाच आहे. ज्या भारत देशाची लोकसंख्या ऐंशी कोटी आहे तिथे अमेरिकन भांडवलशाहीमुळे यादवीच माजेल. त्याऐवजी देश समर्थ आणि

संपन्न करण्याची निश्चिती देणारी आणि गरिबांच्या उद्धाराची हमी असलेली प्रॅक्टीकल समाजवादी राजवट येणे कितीतरी अधिक श्रेयस्कर ठरणार आहे किंबहुना अशी राजवट अटळ आहे. जर अशी अटळ राजवट पध्दतशीर आणि तयारीनिशी भारतीयांच्या स्वतंत्र नेतृत्वाखाली आली तर तत्काळच फार मोठी लाभदायक होईल. म्हणून हा प्रपंच आणि उच्चारवाने प्रार्थना करून ही विचारधारा संपवितो.

उत्तिष्ठत जाग्रत ।

प्राप्य वरान्निबोधत ।

REFBK-0024071

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६७०
दा. क्र. 270069
क्र. 9019263
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)